# महाभारत

## खंड १४ : तीर्थयात्रापर्व २

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे



# महाभारत

## खंड चौदावा : तीर्थयात्रा पर्व खंड दुसरा

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० मार्च २०१९**

## – अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याचवेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना ते गद्यात केले आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसापेक्षां जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे

जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा चौदावा खंड आपण आता वाचणार अहात, तीर्थयात्रा पर्वाचा हा दुसरा व शेवटचा भाग आहे.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्याआधीची असती तर त्याचा उल्लेख त्याकाळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्यानंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –

ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

## – महाभारत तीर्थयात्रा पर्वाचा खंड दुसरा –

ह्या खंडातील विषयांची यादी – तीर्थयात्रा पर्व पुढे चालू मागील खंडापासून,

## तीर्थयात्रा पर्वातील छत्तीसावा भाग

वैशंपायन बोलतात, पुढे असें झाले जनमेजया, पंडूची मुलं त्यांची तीर्थयात्रा पुढे सुरु करतात. ते कौसिका नदीपासून इतर तीर्थयात्रांकडे निघतात. शत्रूघ्न राजा युधिष्ठीर, त्या वाटेने जेथे गंगा समुद्राला मिळते तेथे पोहोचतात. तेथे ज्या ठिकाणी पांचशे नद्या एकत्र होतात व समुद्रात मिळण्या आधीच्या कुंडात , तेथे ते सगळे यात्रीकरू स्नान करण्यासाठी उतरतात. ते नंतर चालत त्या समुद्र किनार्याने कलिंग जमातीची वस्ती आहे तेथे जाऊ लागतात. लोमस सांगतात, "ती पहा कुंतीपुत्रानो , कलिंग लोकांची भूमी. त्या प्रदेशातून वैतरणी नदी वहात आहे. तिच्या किनार्यावर साक्षात देव येऊन स्नान करतात. त्या नदीचा हा उत्तरेकडील किनारा आहे तेथे संत मंडळींनी मोठी वस्ती केलेली आहे. ते त्यांच्या तपस्या तेथे करत असतात. त्यामुळें येथे पुण्याचा प्रभाव असल्याचे जाणवते. तो प्रदेश पहाण्यासारखा आहे. त्याच्या सौंदर्याचे कौतुक किती करावे ते कमी ठरेल. तेथे ऋषी वेळोवेळी येत असतात. ज्यांना मृत्यूनंतर स्वर्गात जावयाचे आहे असें सगळे तपस्वी येथे त्यांच्या तपस्या करण्यासाठी वस्ती करून असतात". लोमस ऋषी यात्रेकरूना अशी माहीती देत असतात. फार प्राचीन काळापासून तपस्वी येथे येऊन साधना करत असतात. म्हणून हे तीर्थक्षेत्र झाले आहे. ह्या ठिकाणी साक्षात इंद्राने यज्ञात बळी देण्याचा बैल पकडला होता. तो पकडल्यावर तो बोलला होता, "हा माझा हिस्सा आहे". तरी जेव्हां त्या बैलाला शिव घेऊन जातो. तेव्हा तोच महेश पुन्हा सांगतो, "दुसर्याच्या कुवतीबद्दल द्वेषाने बोलू नये. त्यानंतर तो महेश शक्राचे कौतुक करतो. त्यानंतर तो महादेव इंद्राचा सन्मान करण्यासाठी कांहीं भेटी देतो. त्यानंतर इंद्र त्या बैलावरील त्याचा हक्क सोडतो अशी कथा आहे. ह्यात असें नेमके काय झाले ते आता युधिष्ठीरा, मी तुला सांगितले. पुढे तो ऋषी सांगतो, "शक्राच्या धाडसामुळें देवांनी जास्त प्रगती केली होती. त्यामुळें जो हे आठवून येथे अर्घ्य वाहतो त्याचा स्वर्गाचा रस्ता सोपा होतो".

वैशंपायन सांगतात, त्यानंतर सगळे पांडव तसेंच त्यांची भार्या द्रौपदी त्या वैतरणी नदीत उतरतात स्नान करण्यासाठी. तेथे ते त्यांच्या पूर्वजांसाठी पुजा करतात. युधिष्ठीर विचारतो, "अहो लोमस गुरूवर्य, तो पावित्र्याचा जोर किती असावा लागतो"? "रीतसर येथे स्नान केल्यानंतर मला असें वाटते किं, मी मर्त्य लोकातून बाहेर आलो आहे. येथे दयाळू संत महंत जे वनात रहातात, त्यांच्या स्तुतीची गाणी गाऊ लागतो. लोमस पुढे युधिष्ठीराला सांगतात, येथे जो आवाज तुला ऐकू येतो तो तीन हजार योजने इतक्या दुरून येत असतो. ते आवाज गुपचुप राहून ऐकत रहा. जेव्हा विश्वकर्माने एक यज्ञ ह्या जागी केला होता त्या वेळी, अरे राजा, हे अरण्य साक्षात ब्रह्माचे आहे. ते सगळे त्यांनी सगळ्या पृथ्वी बरोबर ऋषी काश्यपांना दान केले आहे. कारण काश्यप त्या यज्ञाचे मुख्य पुरोहित होते. पृथ्वीचे दान केल्यामुळें पृथ्वीदेवी ब्रह्मावर नाराज होते व तक्रार करते किं, तिला ते दान होणे आवडलेले नाही. ती ब्रह्माला बोलते कीं, एका मर्त्याला तिचे दान झाले हे तिला अजिबात आवडलेले नाही. ती पुढे ब्रह्माला बोलते अशा दानामुळें कांहीं उपयोग होणार नाही हे तुला दिसेलच. कारण मी आता तुझ्या समक्ष पाताळात शिरणार आहे. काश्यपाला समजते की, पृथ्वीदेवी, तिला काश्यपाला केलेल्या दानामुळें नाखूष आहे, काश्यप पृथ्वीला खूष करण्यासाठी कांहीं करू लागतो. त्याच्या पुण्यप्रभावाने पृथ्वी संतुष्ट होते आणि ती पाताळात जाण्याचा विचार सोडून देते.

लोमस त्यांना दाखवतात, तेथे एक यज्ञवेदी दिसते. त्यावर युधिष्ठीर चढतो. ऋषी लोंमस त्याला बोलतात, आता तुझी ताकद जास्त झालेली आहे. तो पुढे सांगतो, "ही यज्ञवेदी पार समुद्रात शिरते. ती समुद्राच्या तळापर्यंत पसरलेली आहे. त्यावर तू उभा आहेस तेव्हां तुझे भाग्य उजळून येणार हे निश्चित. आता तू त्याच्यावर उभा आहेस तेव्हां मी कांहीं विधी करतो ज्यामुळें तुझे दुर्दैव तुझ्यापासून दूर पळेल. कारण जेव्हां त्याला एकादा मर्त्य स्पर्श करतो, ती यज्ञवेदी तत्क्षणी पाण्यात बुडते. एवढे सांगून तो ऋषी प्रार्थना करू लागतो, ती अशी, "जगाच्या निर्मात्याला शतशः वंदन, तुला, जो ह्या विश्वाच्या बाहेर असून ह्या विश्वाला चालवतो, त्याला माझा नमस्कार आहे. देवांच्या देवा तू ह्या सागराला शुचिर्भूत करत आहेस". एवढे बोलल्यानंतर ऋषी युधिष्ठीराला सांगतात, "आता मी जे बोलतो ते

तुम्ही पुनः बोला. ते सत्य आहे, ते बोलत असतांना त्वरीत तू त्या वेदीवर आणखीन वर चढशिल".

"अहो अग्नीदेवा, अहो सूर्यदेवा, अहो प्रजनन विधी, अहो जलदेवा, अहो विष्णूदेवा, अहो अमृता, अहो समुद्र देवा, आपणच सर्वकांहीं अहात"?. असे मोठ्याने बोलून युधिष्ठीर त्या कुंडात उडी मारतो . तसे जर करावयाचे नसेल तर त्या पाण्यात जाऊ नये असें ते सांगतात. युधिष्ठीर तो विधी उरकतो.

वैशंपायन सांगत असतात, अशारितीने दुर्भाग्य टाळण्याचा तो प्राचीन विधी संपन्न होतो, त्यानंतर तो दयाळू राजा समुद्रात जातो. तेथे तो विधी जसें ऋषीने सांगितले तसे करतो. तेथून ते सगळे महेंद्र पर्वताच्या पायथ्याशी येतात. तेथे ते सगळे यात्री एक रात्र रहातात.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील छत्तीसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग सदोतीसावा

वैशंपायन सांगतात, तो राजा तेथे महेन्द्र पर्वताच्या पायथ्याशी एक रात्र रहातो. तेथे असलेल्या संताना तो मोठा सन्मान देतो. लोमस ऋषी तेथे असलेल्या सगळ्या संतांचा परिचय करून देतात. ते होते, भृगु, अंगिरस, काश्यप, वसिष्ठ आणि इतर बरेच. त्यानंतर ते राजर्षी त्या यात्रींच्या तळावर जाऊन सगळ्या यात्रींना दर्शन देतात. सगळे त्यांचे स्वागत नमस्कार करून करतात. तेथे अकृतावर्ण जो परशुरामांचा पट्ट शिष्य होता, त्याला विचारतात, "आपले गुरु आम्हाला केव्हां दर्शन देणार आहेत? आमची त्यांचे दर्शन घेण्याची फार इच्छा आहे". अकृतावर्ण सांगतो, "तुमची यात्रा येथे येणार आहे ते त्यांना माहित आहे. त्यांच्या आत्म्याला सगळे चटकन समजते. ते तुमच्यावर प्रसन्न आहेत. ते आपल्याला केव्हांही दर्शन देतील. येथे जे संन्याशी तपस्या करत आहेत त्यांना ते दर महिन्याच्या कृष्ण पक्षातील अष्ठमी व चतुर्दशी ह्या दोन दिवशी दर्शन देत असतात. उद्याच्या नंतर कृष्ण पक्षातील चतुर्दशी येते, त्यावेळी आपल्याला त्यांचे दर्शन होईल. ते हरणाच्या कातड्याचे वस्त्र नेसतात. डोक्यावर जटा असतात".

युधिष्ठीर विचारतो, "आपण त्यांचे पट्ट शिष्य अहात, त्यामुळें आपल्याला त्यांच्या सर्व महान उपलब्धींचा चांगलाच परिचय असेल. म्हणून मी आपल्याला विचारू इच्छितो किं, त्यांनी प्राचीन काळी क्षत्रियांचा संहार कसा व कां केला ते सांगाल कां"?

अकृतावर्ण सांगू लागतात, मला ते सगळे तुम्हाला सांगवयाला आवडेल. तो महान इतिहास मी तुम्हाला सांगतो, जमदग्नींच्या मुलाच्या कारवाया देवांच्या सारख्या होत्या. ते त्यांच्या वंशाची संबंध थेट भृगुंशी लावतात. तो इतिहास सांगतांना मी तुम्हाला त्या थोर राजाचीसुद्धा माहिती सांगणार आहे ज्याचे नांव होते अर्जुन, तो हैहय टोळ्यांचा राजा होता. त्या अर्जुनाचा वध परशुरामांने केला होता. असें समजतात कीं, तो वध करणे हे त्यांच्या अवतारातील एक महत्वाचे उद्दीष्ट होते. त्या राजाकडे हजार लढवय्यांचे सैन्य होते. त्याच्यावर दत्तात्रेयाची कृपा होती म्हणून त्याच्याकडे त्यांचा रथ होता. जो सोन्याचा होता. त्या अर्जुनाचे साम्राज्य चौफेर पसरलेले होते. त्याचा रथ असा होता किं ते कोठेही

जाऊ शकत असें. दत्ताच्या आशिर्वादामुळें त्याची सत्ता अशी झाली होती कीं,तो रथातून जाताना देव, ऋषी आणि राक्षस अशा सगळ्यांना त्या खाली तुडवत जात असें. त्याच्या सत्तेच्या माजापुढे कोणाचेच चालत नसें. ते फार झाले तेव्हां, सगळे देव, ऋषी जे तपश्चरण करत असतात असे एकत्र झाले, विष्णूला विनंती करतात किं, ह्या अर्जुनाचे कांहीं केले पाहिजे. त्यांची तक्रार समजल्यावर तो सदैव अजिंक्य असा देवाधिदेव त्यांना बोलतो, "अहो पवित्र लोकांनो, तुम्हा सगळ्यांना जर संरक्षण द्यावयाचे असेल तर ह्या दत्ताच्या कृपेवर माजलेल्या अर्जुनाला ठार मारावेच लागेल". तो हैहय जमातीचा सामर्थ्यवान राजा एकदा त्याच्या दैवी शक्ती असलेल्या रथात बसून इंद्राला आव्हान देतो. त्यावेळी इंद्र त्याच्या पत्नी बरोबर असतो. असें वेळोवळी होत होते. तेव्हां विष्णू इंद्राबरोबर विचार विनिमय करतो. ते दोघे ठरवतात कीं, तो कार्तवीर्यांचा मुलगा अर्जुन, जो दत्ताच्या कृपेमुळें माजला आहे त्याला मारण्या शिवाय दुसरा मार्ग नाही. ती माहीती इतर ऋषी व देव ह्यांना समजते. ते सर्वांच्या भल्यासाठी करावे लागणार होते. एकदा विष्णू त्याच्या आवडत्या बदरी वनात जेथे तो तपोश्चरण करण्यासाठी नेहमी जातो तेथे गेला होता. त्या सुमारास आणखीन एक श्रेष्ठ राजाचासुद्धा विचार आपल्याला करावा लागेल कारण अशा बर्याच गोष्टींचे एकत्रित परिणाम स्वरुप अशा गोष्टी पुढे घडणार असतात. तो महाबली राजा ज्याचे नांव आहे, कन्यकुज्व होते तो त्याच्या कडे असलेल्या बलशाली सैन्यासाठी ख्यातनाम होता. त्याला गधी म्हणून सगळे ओळखत होते. परंतु, तो वानप्रस्थाक्षम स्वीकरतो. तो वनात रहात असतांना त्याला एक अतिसुंदर लावण्यवती अशी कन्या होते. ती मोठी होते तेव्हां तिला भृगुचा मुलगा ऐशिक मागणी घालतो. तेव्हां गधी त्या ब्राह्मणाला बोलतो किं, "अहो कठोर तपोश्चरण करणार्या ब्रह्मणा, आमच्यात जमातीने ठरवलेले कांही रिवाज आहेत त्यांचे पालन करावेच लागते, जेव्हां मुलीचे लग्न होते. ती आमची अति प्राचीन काळापासूनची प्रथा आहे. आपण पुरोहीत वर्गाचे अहात. म्हणून मी तुम्हाला सांगतो कीं, आमची ती रीत तू पूर्ण करू शकणार नाहीस. ती रीत अशी आहे कीं, नवर्या मुलाला मुलीच्या बापाला हुंडा द्यावा लागतो. माझ्या योग्यते नुसार तुला एक हजार उमदे घोडे ज्यांचा रंग तांबट आहे, त्या प्रत्येकाचा एक कान काळा असला पाहिजे. ते हुंडा म्हणून तुला द्यावे लागतील. आता सांग, असा हुंडा तुझ्यासारखा कफल्लक ब्रह्मण देऊ

शकेल कां"? "आपल्या सारख्या उच्च दर्जाच्या ब्राह्मणाकडून आम्ही अशी अपेक्षा करू शकत नाही. त्याचवेळी, मी माझे कन्यारत्न तुझ्यासारख्या तेजस्वी तपस्व्याला नाकारू सुद्धा शकत नाही. मोठ्या धर्मसंकटात मला आपण टाकत अहात". असें गधी त्याला सांगतो. ते ऐकून ऐशिक बोलतो, "मी आपल्याला एक हजार अश्व जसें तुम्हाला हवे आहेत तसे देऊ शकतो. जर ते झाले तर तुम्ही तुमची कन्या मला दान कराल कां"?
अकृतावर्ण पुढे सांगतो, "ऐशिक गधीला वचन देऊन वरुणदेवाकडे जातो. त्याला भेटून बोलतो कीं, मला एक हजार घोडे हवे आहेत ज्यांचा रंग तांबट असून त्यातील प्रत्येकांचा एक कान काळा असला पाहिजे. ते घोडे मी हुंडा म्हणून माझ्या लग्नात माझ्या सासर्याला देणार आहे. ते ऐकल्यावर वरुणदेव त्याला तसे हजार घोडे त्वरित देतो. ते घोडे गंगा नदीतून बाहेर येतात. म्हणून तसे नांव त्या तीर्थक्षेत्राला पडले आहे. ते होत असतांना कन्यकुज्व नगरीत गधीची कन्या जिचे नांव होते सत्यवती ऐशिकाला लग्नात दिली जाते. त्या विवाहात देव सुद्धा आमंत्रित होते. त्या लग्नाने ऐशिक जो पुरोहित जातीचा होता, त्याला क्षत्रिय जातीतील कन्या पत्नी म्हणून अधिकृत मार्गाने मिळते. त्या नाजुक, सुंदर पत्नी बरोबर तो सुखाने राहू लागतो. त्याच्या इच्छा संपन्न झाल्या होत्या. त्यांना भेटण्यासाठी भृगु स्वतः आले होते, त्यांनी त्यांचा सुखी संसार पाहून समाधान व्यक्त केले. भृगु स्थानापन्न झाल्यावर तो उभयता नमस्कार करून त्याच्या पुढे उभे रहातात. तेव्हां तो आनंदात असलेला ब्राह्मण आपल्या सुनेला बोलतो, "माझ्या गोड मुली, मी तुला कांहींही देऊ इच्छितो म्हणून तुला काय पाहिजे ते मांग". ते ऐकल्यावर ती त्याची सून एक विचित्र वर मांगते, ती बोलते कीं, ती व तिची आई अशा दोघींना प्रत्येकी एक पुत्र व्हावा". त्यावर तो ऋषी तिला सांगतो, "तुम्हा दोघींची पाळी संपल्यावर योग्य वेळी तुम्ही दोघी स्नान कराल व त्यानंतर दोन वेगवेगळ्या झाडांना मिठी माराल. तू उंबराच्या झाडाला मिठी मारशिल व तुझी आई पिंपळाच्या झाडाला मिठी मरील. त्यानंतर मी येथे दोन भांडी ठेवली आहेत, एकामध्ये भात आहे व दुसर्यात दूध आहे. हे मी फार काळजीपूर्वकपणे तयार केले आहेत. मी जगाची पहाणी करून मोठ्या मिनतवारीने कांही औषधी मिळवली आहे, ती ह्या दोन भांड्यात असलेल्या भातात व दूधात मिसळलेली आहे. ते तुम्ही दोघी खावयाचे आहे". एवढे सांगून तो महर्षी अंतर्धान पावला. परंतु, त्या दोनही बायका त्यांच्या

वेंधळेपणामुळें त्यात अदला बदल करतात, झाडाबाबत व भांड्या बाबत सुद्धा, असें होते. बराच काळ त्यानंतर जातो व एकदा भृगु त्यांना भेटावयास येतात. त्याना तेथे आल्यावर त्यांच्या दिव्य दृष्टीमुळें काय चूक झाली ते समजते. भृगु त्याच्या सुनेला बोलावतो व सांगतो, "माझ्या प्रिय मुली, तू चुकीचे भांडे घेतलेस व त्याच प्रमाणे चुकीच्या झाडाला मिठी मारली होतीस. त्यामुळें तुझ्या मातेने सुद्धा त्या चुका केल्या आहेत. तशा चुकी मुळे तुला जो पुत्र होईल तो जन्माने जरी ब्राह्मण असला तरी प्रवृत्तीने क्षत्रिय असेल. त्याच्या उलट तुझ्या आईला होणारा जन्माने क्षत्रिय परंतु, प्रवृत्तीने ब्राह्मण पुरोहित असेल. तो एक महान ऋषी म्हणून ओळखला जाईल". सत्यवती ते ऐकून फार खजिल होते. ती पुन्हा पुन्हा भृगुला विनंती करते किं कांहीं करा व दुरुस्ती होऊ द्या परंतु, ते आता शक्य नव्हते. शेवटी ती सुचवते कीं, "अहो मामंजी, एवढे करा किं माझा नातु तसा हो परंतु, माझा मुलगा ब्राह्मण पुरोहीतच वर्णाचाच हो". ती पुन्हा पुन्हा केलेली विनंती भृगु ऐकतात व तसा बदल ते घडवून आणतात. त्या प्रमाणे योग्य समयी सत्यवतीला जमदग्नी होतो. भृगुचा तो नातु मोठा ब्राह्मण होतो व त्याचे वैदिक परंपरेचे ज्ञान सर्वोच्च दर्जाचे ठरते. त्याचे तेज साक्षात सूर्यापेक्षा जास्त प्रभावी ठरत होते. त्याला सगळी क्षात्र विद्या आपसुकपणे प्राप्त झाली होती. सगळ्या अस्त्र व शस्त्रांचे मंत्र त्याला उपजतपणे माहीत होते. त्याला कांहीं वेगळे शिकावे लागले नव्हते.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील सदोतीसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग अडतीसावा

अकृतावर्ण पुढे सांगत असतो, जमदाग्नी लहानपाणापासून वेदाचा अभ्यास करत असें. त्याशिवाय तपोश्चरणात त्याचा सगळा समय जात असें. सर्वच ज्ञान उपजत असल्यामुळें त्याला वेगळे कांहीं शिकावे लागलेच नाही. लवकरच त्याला सर्व वेदांत प्राविण्य मिळाले. वयात आल्यावर तो जमदाग्नी प्रसेंजिताच्या कन्येचा रेणुकाचा हात लग्नासाठी मांगतो. राजा प्रसेंजित ते मान्य करतो व त्यांचा विवाह संपन्न होतो. लग्नानंतर तो आपल्या बायकोला घेऊन आपली पर्णकुटी बांधतो व ते उभयता तेथे राहू लागतात. तेथे त्या दोघांचे तपोश्चरण सुरु होते. त्या काळात त्यांना त्यांच्या गृहस्थाश्रमाच्या नियमात पांच पुत्र होतात. परशुराम हा त्यातील सर्वात छोटा असतो. छोटा असला तरी तो त्याच्या सगळ्या भांवात जास्त तीक्ष्ण होता. एकदा असं होते किं, ती भावंड वनात फळं गोळा करण्यासाठी जातात. त्यावेळी त्यांची आई स्नानासाठी गेली होती. आंघोळ उरकून ती परत येत असतांना तिची नजर पडते मर्तिकावत नांवाच्या राज्याच्या राजावर. त्या राजाचे नांव असते, चित्ररथ. तो राजा त्याच्या बायकांबरोबर तेथे नदीत स्नान करत असतो. त्याच्या गळ्यात कमळाच्या फुलांचा हार होता. तो त्याच्या बायकांबरोबर खेळत होता. त्याचे देखणेपण पाहून रेणुकाच्या मनात त्याच्या बद्दल वासना उत्पन्न झाली. अशी वासना उत्पन्न होणे अनैतिक होते. परंतु, ती स्वतःला आवरू शकली नाही. तरी तिचे अंतरमन तिला सावध करण्याचा प्रयत्न करत असते व ती घाबरलेल्या अवस्थेत तिच्या पर्णकुटीत धावत गेली. तिच्या नवर्याला जमदाग्नीला ते समजते. त्याला त्याचा राग आवरता आला नाही जसें ते त्याच्या लक्षात आले व तो ओरडतो, "तूं छिनाल", नेमके त्यावेळी त्यांचा मोठा मुलगा तेथे येतो. तो सर्वात मोठा बुमवन, त्या मागोमाग येतो सुशेना, त्या मागून असतो वसु मग विश्ववसु. त्यांचा रागावलेला बाप त्यांना आज्ञा करतो किं त्या मुलांनी त्यांच्या आईला मारून टाकावे. ती चार मुलं काय प्रकार आहे ते समजत नाहीत व कांहीं न करता तसेंच उभे रहातात. आपला बाप आपल्या आईला ठार मारण्याची आज्ञा कां देतो ते त्यांना समजत नाही. प्रचंड गोंधळ झाला त्यांच्या मनाचा व ते एकाद्या हिंस्त्र

पशुप्रमाणे वागू लागले. तेवढ्यात छोटा राम येतो. तो आल्यावर त्याचा संतापलेला बाप त्यालासुद्धा त्याच्या आईला ठार मारण्याची आज्ञा करतो. ती आज्ञा होताच तो छोटा राम बाजूला पडलेली कुर्हाड उचलतो व क्षणात त्याच्या आईचे डोके धडापासून वेगळे करतो, ते पाहिल्यावर त्या रागीट ब्राह्मणाचा राग निवळला. तो रामाच्या आज्ञाधारकपणावर इतका खूष होतो किं, त्याला जवळ बोलावून विचारतो, "बोल माझ्या लेकरा मी तुझ्यासाठी काय करावे"? ते ऐकल्यावर राम त्याच्या बापाला बोलतो, "माझ्या आईला पुन्हा जीवंत करा. माझ्या ह्या पापकर्मातून माझी सुटका व्हावी व माझी भावंड जी वेडीपिशी झाली आहेत ती पुन्हा पूर्ववत व्हावीत. शेवटी मांगतो किं, तो युद्धात नेहमी अजिंक्य राहील. जमदाग्नी ज्याची तपस्या इतक्या उच्च दर्जाची होतीं कीं, तो ते सगळे मान्य करतो. त्यामुळें त्यांची आई रेणुका पुन्हा जीवंत होते. असेंच दिवस जातात. एक दिवशी त्यांच्या पर्णकुटीकडे एक राजा येतो. त्याचे नांव होते अर्जुन जो कार्तवीर्यचा पुत्र होता. त्याचे स्वागत रेणुका करते परंतु, आपल्या क्षात्र मस्तीत अर्जुन त्या पाहुणचाराने संतुष्ट न झाल्यामुळें तो त्यांची एकुलती एक दुभती गाय खेचून नेऊ लागतो. त्या गाईचं बछड जोरात हंबरत असते. त्या शिवाय रागाच्या भरात तो त्या जागेतील झाडे मोडून तोडून टाकून बरेच नुकसान करतो. जेव्हां राम घरी परतला तेव्हां त्याच्या बापाने जे घडले ते सांगिलते. राम पहातो ते छोटे बछडं दुःखाने रडत होते. ते रामला सहन होत नाही. त्या राग अनावर होतो. तो कार्तवीर्याच्या मुलाला अर्जुनाला पकडतो. त्यांच्यात युद्ध होते. भाले, बरच्या. बाण अशा हत्यारांनी ते युद्ध होते. अर्जुनाचे हजार सैनिक तो कापून काढतो. त्यानंतर तो अर्जुनाचे नातेवाईक जे अर्जुनाला मदत करण्यासाठी येतात त्यानासुद्धा ठार मारतो. त्यानंतर ते कार्तवीर्य कपटानें राम घरी नाही हे पाहून त्याच्या घरी जातात व त्याच्या पित्याचा खून त्याला असंख्या बाणाने छिन्नभिन्न करून ठार मारतात. जमदाग्नी जरी मोठे तपस्वी होते, जेव्हां ते समाधीत होते तेव्हां त्याचा खून केला जातो. मरत असतांना जमदाग्नी रामाचा धावा करत होते. त्यांची केविलवाणी अवस्था पहाण्यासारखी होती. अरे युधिष्ठीरा, जमदाग्नीच्या शरीरात त्यांचे बाण घुसलेले होते व तो मृत देह तसांच टाकून ते निघून गेले. ते सर्व गेल्यानंतर राम घरी येतो व पहातो, त्याच्या बापाची निर्घृणपणे हत्या झालेली आहे. रामाने यज्ञासाठीचे सरपण आणलेले होते. रामाला असीम दुःख होते. एवढ्या मोठ्या

ऋषीचा अंत असा होणे हे चांगले लक्षण नव्हते.

*महाभारतातील दुसर्या एका प्रतित जमदाग्नीची जीवंत झालेली पत्नी रेणुका नंतर तपस्या करण्यासाठी अरण्यात जाते व तेथे ती ज्ञान प्राप्त करून मुक्त होते असें दिले आहे. तिची रेणुकादेवी म्हणून आज पुजा होत असते.*

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील अडतीसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व
## भाग एकोणचाळीसावा

ते सगळे पाहून दुःख व क्रोध अशा मिश्र प्रभावात स्वताशी बोलतो, "ह्याला मी जबाबदार आहे. मी नसतांना व तुम्ही समाधीत असतांना ते नीच कार्तवीर्य येऊन तुमचा अशारितीने खून करतात, ज्यांनी कधी कोणाही प्राण्याला कधीही त्रास दिला नाही. ज्यांनी फक्त तत्त्वनिष्ठ, व्रतस्थ जीवन आचरले ज्यांनी कधी कोणाशी वैर केले नाही अशा माझ्या पित्याची अशाप्रकारे हत्त्या होते हे निंदनीय आहे. भाग्यात असें कसे लिहीले होते त्यांच्या, हे समजत नाही. कांहीतरी भयंकर पाप माझ्या बापाकडून झाले असेल. *(रेणुकाच्या स्वाभाविक वागण्यामुळे जमदाग्नी क्रोधीत होऊन तिला ठार मारण्यासाठी त्यांच्या स्वतःच्याच मुलांना आज्ञा देतो, त्यामुळें जे पाप त्याला लागते त्याचे परिणाम स्वरुप असा मृत्यू त्याला मिळतो असें एका प्रतित दिले आहे.)* एका समाधीत असलेल्या वृद्ध ऋषीचा अशाप्रकारे खून करणारे महापापी आहेत. माझ्यावरील राग माझ्या पित्यावर काढणार्यांना शासन झालेच पाहिजे. निरपराधी, शस्त्रविहीन, वृद्ध, तपस्या करणारा, समाधीत असलेला अशा पुण्यवान व्यक्तीवर वार करणे व त्याला ठार मारणे कुलिन क्षत्रियांचे काम नाही. म्हणजे हे करणारे कार्तवीर्य कुलिन क्षत्रिय नाहीत, ते भ्रष्ट क्षत्रिय आहेत म्हणून त्यांचा नाश केलाच पाहिजे. असें विचार त्याच्या मनांत येत असतात. राम विचार करतो, असें निर्घृण हत्त्या करणारे आपल्या पूर्वजांना कोणत्या तोंडाने ह्या कृत्याचे समर्थन करणार"? आपल्या पित्याच्या अशा मृत्यूमुळें राम फार दुःखी झाला तसेंच क्रोधीतसुद्धा झाला. त्यानंतर त्याने त्याच्या पित्याचे अंत्यकर्म उरकले. त्याच्या पित्याच्या जळत्या चितेपुढे तो राम अशी प्रतिज्ञा करतो किं, तो सगळ्या क्षत्रिय कुळांचा सफाया करील. राम त्याच्या नेहमीच्या आयुधामुळें त्या नांवाने पुढे ओळखला जाऊ लागला ते होते कुर्हाड. युद्धशास्त्राचे त्याचे ज्ञान उपजत होते त्यामुळें केवळ सरावाचाच प्रश्न होता, तो त्यांने सुरु केला. त्याचे रुद्र स्वरुप असें होत गेले जणूकाय साक्षात यमदेवच आहे अशा प्रकारे त्याचे वागणे होत होते. पहिला तो कार्तवीर्याच्या इतर मुलांना पकडतो व मारून टाकतो. तेवढ्याने त्याचे समाधान होत नाही. त्यानंतर त्या कार्तवीर्याचे समर्थक इतर

क्षत्रिय तो एक एक करून पकडतो व त्यांच्याशी द्वंद्वात लढतो व त्या सगळ्यांना एकटा मारून टाकतो. असें तिनदा तो मारतो. त्यानंतर तो सात वेळा पृथ्वीवरील सगळे भ्रष्ट क्षत्रिय ठार करतो. समंतपंचक नांवाच्या प्रदेशात ते होते. तेथे पूर्वीपासून पांच तलाव होते. त्याच्या त्या संहारामुळें इतके क्षत्रिय मारले जातात कीं, त्याच्या रक्तामुळें त्या पांचही तलावातील पाणी लाल होते. आपल्या पित्याच्या हत्त्येचा तो अशारितीने वचपा काढतो. त्यानंतर राम, जो आता त्याच्या हत्त्याराच्या (परशु) नांवाने ओळखला जात होता, म्हणून परशुराम, त्याच्या पितरांना त्या तलावात रक्ताने लाल झालेल्या पाण्यानेच अर्घ्य देतो. त्यावेळी त्याचे पूर्वज. भृगु व रिचिका त्याला दर्शन देतात. त्या संहारामुळें रामाचे अध्यात्मिक स्थान उतरलेले होते. त्यातून बाहेर येण्यासाठी तो एक मोठा यज्ञ करतो. क्षत्रियांना ठार मारल्यामुळें जी पृथ्वी त्याच्या ताब्यात आलेली होती ती तो ब्राह्मणांना वाटून टाकतो. त्या विजया प्रित्यर्थ तो एक सोन्याची वेदी उभी करतो. त्याचा आकार होता, दहा व्याम रुंद व नऊ व्याम उंच अशी ती वेदी होती. ती वेदी तो आपल्या मूळ पूर्वजाला, काश्यप मुनीना अर्पण करतो. काश्यपाच्या सांगण्यानुसार त्या वेदीचे बरेच भाग केले जातात. त्या तुकड्यांना खंड व्याम असें नांव पडले. त्यानंतर तो योद्धा आपले गेलेले पुण्य पुनः मिळवण्यासाठी फार कठोर अशा तपोश्चरणात जातो. आता तो महामुनी महेंद्र पर्वतावर रहातो. जेव्हां जेव्हां क्षत्रियांच्या गैर वागणूकीमुळें सज्जनांना पिडा झाली तेव्हां तेव्हां परशुराम त्या त्रास देणार्या भ्रष्ट क्षत्रियांचा पाडाव करण्यासाठी येत असतो. अकृतावर्ण त्याचे परशुराम आख्यान संपवतो. युधिष्ठीर अकृतावर्णाला विचारतो, "आपण क्षत्रियांबद्दल दोन संज्ञा वारंवार वापरल्या आहेत त्याचा अर्थ मला समजून घ्यावयाचा आहे. आपण कुलिन क्षत्रिय व भ्रष्ट क्षत्रिय असें क्षत्रियांचे दोन प्रकार सांगितले आहेत त्या बद्दल सांगाल तर बरे होईल कारण आम्ही स्वतःला क्षत्रिय समजतो परंतु आम्ही कोणत्या प्रकारात येतो ते समजण्यासाठी ती माहीती मला वाटते आवश्यक आहे". अकृतावर्ण त्यावर सांगतो कीं, "ज्या क्षत्रियांत चार दोष असतात किंवा त्यापैकी एक जरी असला तर ते भ्रष्ट क्षत्रिय म्हणून वेदांत सांगितले आहेत व ते दोष ज्यांच्यात नसतात ते कुलिन क्षत्रिय समजले जातात. ते चार दोष उत्पन्न होणार नाहीत अशासाठी त्या व्रताची योजना असते व जो क्षत्रिय त्या व्रतात राहून आपले क्षत्रिय कर्म करतो तो कुलिन क्षत्रिय समजला जातो.

त्या व्रतात ते चार दोष टाळण्याचे वचन असते. पहिला दोष सांगितला आहे, व्रात्यक्रिडा, दुसरा आहे अर्वाच्य वाचा, तिसरा आहे अपेयपान आणि चौथा आहे, दुष्टता. व्रात्य क्रिडा म्हणजे उनाडकी करणे. क्षत्रियात शारिरीक सामर्थ्य असल्याने कमी ताकदीच्या लोकांची चेष्टा मस्करी करण्याची इच्छा होते हा दोष समजला जातो. (मराठीत ह्याला मवालीगिरी असें आपण म्हणतो.) दुसरा दोष आहे अर्वाच्य वाचा, म्हणजे शिवीगाळी करून बोलणे. बोलण्यात अपशब्दांचा वापर करणे हे भ्रष्टतेचे प्रतिक मानले गेले आहे. तिसरा दोष आहे अपेयपान, त्याप्रमाणें नशापाणी अथवा कोणतेही व्यसन करणे निषिद्ध समजलेले आहे. चौथा दोष सांगितलेला आहे तो दुष्टपणा बाबत आहे. क्षत्रिय दुष्ट असतां कामा नये. ज्या क्षत्रियात हे चार दोष नाहीत तो कुलिन क्षत्रिय समजला जातो व राज्य करण्यासाठी क्षत्रिय कुलिन असणे अनिवार्य समजले आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, त्यानंतर येणार्या चतुर्दशीच्या दिवशी परशुराम प्रकट होतात. त्या तेथे जमलेल्या ब्राह्मणाना व संन्याशाना आणि पांडवांना ते दर्शन देतात. ते त्याची पुजा करतात. परशुराम त्यांना त्यांच्या भ्रष्ट क्षत्रियांच्या (कौरव) विरोधातील युद्धाला आशिर्वाद देतात. त्यानंतर त्याची यात्रा तेथून पुढे दक्षिण दिशेने निघते.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील एकोणचाळीसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व
## भाग चाळिसावा

वैशंपायन सांगतात, तो दयाळू राजा त्याची तीर्थयात्रा त्याच्या बरोबरच्या लोकांसह चालू ठेवतो. त्या पूर्व किनार्याच्या समुद्राच्या कडेने त्यांची यात्रा जात असते. तेथे असलेल्या पाण्यात ते स्नान करत असतात. तेथे त्यांना अनेक संन्याशी व पौरोहित्य करणारे भेटतात. जनमेजया, तुझे पूर्वज त्याच्या सगळ्या परिवारासह तेथे येणार्या सगळ्या तीर्थक्षेत्री विधी पूर्वक पुजापाठ करत त्याची तीर्थयात्रा करत असतो. तेथे तो राजा ब्राह्मणांना मोठे दानं करतो. ते सगळे एका थोर नदीच्या किनार्याला येतात. तिचे नांव आहे **गोदावरी नदी**. तेथे स्नान केल्याने त्याची सगळी पापं धुतली जातात. त्यापुढे द्रविड देश सुरु होतो. तेथे ऋषी अगस्त्यांच्या नांवे एक तीर्थक्षेत्र आहे तेथे ते जातात. ते तीर्थक्षेत्र अति पवित्र समजले जाते. तेथे अर्जुनाने केलेल्या पराक्रमाच्या गोष्टी त्यांना ऐकावयाला मिळतात, त्यामुळें त्या सगळ्या यात्रेकरूना फार संतोष होतो. त्या अप्सरांना त्याने कसे शापमुक्त केले त्याच्या त्या कथा होत्या. तेथे असलेले सगळे पौरोहित्य करणारे अर्जुनाची स्तुती करत होते. ते पाहून सगळ्या पांडवांना खूप आनंद झाला. कृष्णाला त्या तिच्या नवर्याच्या करामती ऐकून जो हर्ष होत होतो त्याचे वर्णन करता येणार नाही. जणू प्रत्यक्ष अर्जुन भेटला असें त्या सगळ्यांने त्या कथा ऐकून वाटत होते. त्या निमित्ताने नंतर तो युधिष्ठीर अनेक गाई दान करतो. त्यानंतर ते सगळे त्या सगळ्या तलावांना भेट देतात जेथे त्यांच्या भावांने त्या अप्सरांना मुक्त केले होते, त्यानंतर ते सगळे तेथील समुद्र पहातात. त्यामुळें त्यांना फार समाधान मिळते. त्यानंतर तो यात्री समुह फार जास्त पवित्र समजल्या गेलेल्या तीर्थक्षेत्री येतात. त्या स्थानाचे नांव आहे, **शुरपरका**. तेथून कांहीं किनार्यावरील प्रदेश ओलांडून ते त्या प्राचीन अरण्यात जातात जेथे मोठे ऋषी आणि देव स्वतः तपस्या करत असतात. त्याप्रमाणे युधिष्ठीर सुद्धा तेथे सर्व विधी पूर्वक करतो. तेथे परशूरामाने उभी केलेली ऋचिकेची वेदी पहातो. त्याच्या भोवती अनेक साधू संत गोळा झालेले तो पहातो. तेथे असलेल्या सगळ्या देवांच्या मंदिरांना तो भेट देतो. त्यात यमदेवाचे मंदीर असते, त्याशिवाय वसु, अश्विनी, सूर्य, चंद्र, कुबेर, वरुण, इंद्र, विष्णू, शिव अशांची मंदीरं

असतात. त्याशिवाय ब्रह्म आणि साध्य देवांची सुद्धा मंदीर होती. एक मंदीर पूर्वजांचे प्रतिकात्मक होते. रुद्राचे वेगळे मंदीर होते ज्यात सगळे गण पुजले जात होते. त्या सगळ्या मंदीरातून तो राजा पुजा करत जातो. तेथे उपवास करून ध्यान साधना सुद्धा ते सगळे पांडव करतात. ते विधी करून तो राजा परत शुरपरका कडे जातो. तेथून तो त्याच्या मावस भावाच्या प्रदेशात, पवित्र तीर्थ **प्रभास** मध्ये येतो. तेथे सुद्धा तो त्याच्या सगळ्या भावंडांसह विधीपूर्वकपणे पुजापाठ करतो. त्याप्रमाणे त्याच्या बरोबर असलेले सगळे ब्राह्मण, कृष्णा व लोमस ऋषी पूर्वजांची श्राद्ध उरकतात. तेथे केवळ हवा व पाणी ह्यांवर तो बारा दिवस रहातो. त्याच्या भोवती आग पेटवलेली आहे असा बैठकीवर तो बसला होता, अशा प्रकारचे अघोर तप तो तेथे करतो. महान पवित्र मुनी जसे तप करतात तसे त्याने ते केले होते. ते त्याचे तप चालू असतांना जवळच रहाणार्या बलरामाला व दामोदराला त्यांच्या येण्याची खबर लागते. युधिष्ठीर असें अघोरी तप करत आहे ते त्यांना समजते. ते समजल्यावर वृश्नीचे लोक त्यांच्या फौजफाट्यासह तेथे येतात. अजमिदा वंशाच्या राजास, युधिष्ठीराला ते भेटतात. ते तेथे पहातात किं, राजा तपस्येच्या क्रियेत असतांना मातीत पडला आहे व त्याच्या बरोबर द्रौपदीची सुद्धा अवस्था तशीच झालेली आहे त्यांना फार वाईट वाटते. ते पाहून ते दुःखी होतात व रडू लागतात. त्या परिस्थितीत तो हिम्मतवान राजा त्यांना भेटतो. ते सगळे त्याच्या भोवती बसतात जसें देव इंद्राभोवती बसतात. तेथे तो त्याना आलेले पाहून आनंदी होतो. त्याना तो त्याच्या तीर्थयात्रेतील विविध अनुभव सांगतो. अर्जुन शस्त्र विद्या स्वर्गात शिकत आहे त्याबद्दल त्यांच्यात चर्चा होते. ते ऐकून सगळे वृश्नी समाधान दाखवतात. ते पहातात किं, त्याचे प्रिय पांडव फार कृश झाले आहेत. पांडवाची ती परिस्थिती पाहून त्यांच्या बद्दलच्या प्रेमामुळें सगळे वृश्नी त्यांचे दुःख व्यक्त करतात.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील चाळीसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व
## भाग एकेचाळीसावा

जनमेजय विचारतो, अहो मुनीवर, जेव्हां पांडव व वृश्नी प्रभास मध्ये भेटले तेव्हां त्यांच्यात काय संवाद झाला तो माहित असेल तर मला सांगा. माझ्या कल्पने प्रमाणे, ते सगळे मोठे तेजस्वी लोक होते, त्यांचे प्रस्थापित शास्त्रांचे ज्ञान पूर्ण होते आणि दोनही लोक एकमेकांचे चाहते होते.

वैशंपायन त्याला सांगतात, जेव्हां प्रभासला वृश्नी पोहोचले, जेथे ते पवित्र ठिकाण समुद्र किनारी आहे, त्यांनी पांडवांना घेराव घातला. त्याची काळजी घेऊ लागले. मग गौर वर्णी बलराम त्याच्या गळ्यात फुलांच्या माळा घातलेला, हातात त्याचे आयुध औत घेऊन पुढे झाला. तो कृष्णाला (द्रौपदी) बोलतो, "ह्या जगात चांगुलपणाची काय किंमत आहे हे तुमच्या ह्या परिस्थितीवरून चांगलेच समजते तरी लोकं त्या चांगुलपणाची नेहमी तारीफ करत असतात. पापबुद्धी जर अशा प्रकारे चांगुलपणाचा पराभव करत असेल तर कोण चांगुलपणाची जडफदारी करेल व कां करेल"? तो बोलत रहातो, "हा पहा चांगुलपणाचा पुतळा, त्याची अवस्था काय झाली आहे ते पहा, डोक्याचे केस बटा झाल्या आहेत, जंगलात रहावे लागत आहे, झाडाच्या सालीचे कपडे घालावे लागत आहेत. रानात मिळेल ती फळं व कंदमुळं आणि शिकार करून आणलेले व शेकोटीवर भाजलेले मांस जमिनीवर बसून खात आहेत आणि तो दुर्योधन पहा कसा मजेत राज्य करत आहे. त्याच्या अंगावरील कपडे पहा. छप्पन भोग खात आहे. ते पाहून कोणता शहाणा माणूस चांगुलपणाची पाठराखण करील"? बलराम आश्चर्य करीत बोलतो, "हा युधिष्ठीर, त्याचे राज्य, वैभव, संपत्ती, उपभोग सगळे सोडेल पण सच्चाई नाही सोडणार"! "त्याला ह्या जगापेक्षां नंतरच्या जगातील त्याचे स्थान कसे असावे त्याची पडली आहे". पुढे तो रागीट वृश्नी विचारतो, "ते वृद्ध कुरु लोक भिष्म, कृपाचार्य, द्रोणाचार्य कसे मजेत रहात आहेत जेव्हां त्यांच्या पंडुची मुलं अशी हालाखीच्या स्थितीत रहात आहेत? मी त्यांचा धिक्कार करतो. ते सगळे आपमतलबी नीच लोक आहेत". तो हलकट धृतराष्ट्र व त्याची मुलं मेल्यावर त्यांच्या पितरांना काय सांगतील, त्यांच्या अशा कर्माचे ते कसे समर्थन

करतील"? "त्या तुमच्या घरातील लोकांना तो अध्यात्मिक दृष्टिकोन नाही. ती दूरदृष्टी नाही, ते फक्त आजचे भले पहातात. आजचे भले करतांना उद्याचे सुद्धा भले कसे साधावयाचे त्याची त्यांना पडलेली नाही. किंबहूना तो विचारच नाही. पंडुची मुलं सुद्धा चूक आहेत माझ्या दृष्टीने, कारण तेसुद्धा दोनही कडचे भले साधावयाचे असते ते त्याना जमत नाही. जो आजचे व उद्याचे असें संपूर्ण भले साध्य करतो तो खरा धार्मिक माणूस असतो. पांडवांना घरातून हाकलून देण्यामुळें पुढे जे वाढलेले आहे तेसुद्धा ते पहात नाहीत. कशा प्रकारचा हा अंधपणा समजावयाचा"? त्या पांडवाना त्यांनी हकलवले जे त्यांच्या आयुधांनी सज्ज आहेत. जर युधिष्ठीर हुकूम करील तर कौरवांचा नाश होण्यास फार वेळ लागणार नाही. ते पांडव एक एक त्या सगळ्या कौरवांना भारी आहेत. त्यांच्या शौर्याच्या व हिम्मतीच्या आणि धाडसाच्या किती कथा सांगावयाच्या"? राजसूय यज्ञाच्या वेळी सर्व जगाने त्यांचे युद्ध कौशल्य पाहिले आहे. हे कौरव जाणत नाहीत असें नाही पण मुद्दा असा आहे किं, तरी हे धाडस त्यांने केले कारण, त्या लोकांनी कुंतीपुत्राचे पाणी चाखलेले आहे, ते जाणून आहेत कीं, हा तत्त्वशिल माणूस आपल्यावर हल्ला करणार नाही! आणि तींच ह्या पांडवांची कमजोरी आहे. परंतु हि परिस्थिती तशीच रहाणार नाही. जेव्हां युद्ध छेडले जाईल तेव्हां हे पांडव वीर त्यांना ज्या यातना कौरवांनी दिल्या त्या आठवून त्या युद्धात कौरवांचा नाश कसा करतील त्याची नुसती कल्पनासुद्धा मला करवत नाही. कसे कौरवांचे मुडदे धारातीर्थी पडलेले असतील त्याची मी कल्पना करू शकतो. तरीसुद्धा ह्या त्यांच्या मोठ्या भावाच्या भोंगळपणामुळें ते जगज्जेते रानावनात वल्कल नेसून फिरत आहेत. हा युधिष्ठीर म्हणजे सैतानाचे गोंडस रुप आहे असे कांहींवेळा मला वाटते कारण, ह्या त्याच्या वागण्यामुळें कौरवांची पापप्रवृत्ती वाढत गेली आहे. धर्म, शांती, वैराग्य, अहिंसा, संयम आणि क्षमा ह्या तथाकथित सात्त्विक गुणांचा सैतान गैर वापर करून न्यायी शक्तिना गोंधळवून टाकण्याचे काम करत असतो. नेमके तेंच येथे होत आहे. सात्त्विक गुण केव्हां सत्याचे काम करतात व केव्हां ते असत्याचे शस्त्र बनून सत्याचा नाश करतात ते ज्याला समजते तोंच खरा ज्ञानी असतो. युधिष्ठीराकडे ती पोंच नाही हे निश्चित. तरी ते पांडव त्याचे ऐकतात कारण काय तर त्या चौघानी त्यांच्या मातेस तसा शब्द दिला आहे किं ते त्यांच्या मोठ्या भावाच्या आज्ञेत रहाणार. ह्या त्यांच्या मातेशी असलेल्या

आज्ञाधारकपणाचा युधिष्ठीर गैर उपयोग करत असतो. नाहीतर जर भिम अधिकारी असता तर हे कौरव कोठल्या कोठे फेकले गेले असते". बलराम ठासून सांगतो, "हा युधिष्ठीर हांच ह्या सगळ्या पांडवांच्या दुर्दैवाचा मूळ आहे. त्याला भिकार्या सारखे रहायला आवडते म्हणून तो सगळ्या पांडवांना व त्या बरोबर कृष्णालासुद्धा तसे रहावयाला लावत असतो. त्यानी कधी कोठला निर्णय स्वतः घेतला आहे असें मला आठवत नाही. युधिष्ठीर भिकारडा आहे म्हणून ते सगळे दुर्दैव भोगत आहेत. असे असूनही ते सगळे मोठ्या गुण्यागोविंदाने रहात आहेत, त्याच्या आईवरील त्याच्या आदरामुळें ते होत आहे. म्हणून मी सांगतो ह्या पांडवांच्या दुर्दैवाला युधिष्ठीरा एवढीच त्यांची माता कुती, आमची आत्या सुद्धा तितकीच जबाबदार आहे. राजवाड्यात रहाणारे रानावनात हिंडतात हे कुंती आत्येला दिसत नाही कां"? स्वतः हस्तिनापुरात आरामात रहाते आहे विदूरा कडे. असत्याचा एवढा मोठा विजय होत गेला तर कलीयुग अवतरण्यास विलंब लागणार नाही. सत्याची लक्षणं (धर्म, शांती, वैराग्य, अहिंसा, संयम आणि क्षमा) असत्यासाठी वापरली गेली कीं, काय होते, आम्ही पहात आहोत. पृथ्वीने सगळी जमीन गिळून टाकावयाला पाहिजे होती.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील एकेचाळीसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व
## भाग बेचाळीसावा

ते बलरामाचे संतापजनक बोलणे ऐकून सत्यकी बोलतो. "अरे बलरामा, ही वेळ दोषारोप करण्याची अथवा दुःख व्यक्त करण्याची नाही. आपण येथे आलो आहोत ते ह्यांना मदत करण्यासाठी, अडचणीत असलेले कधी स्वतः कांहीं मागत नाहीत, आपण न मांगता ते करावयाचे असते. जसें सैवाने ययातिला मदत केली. पांडवांच्या भल्याची जबाबदारी आपल्या कृष्णावर आहे व म्हणून आपल्याला कृष्णाच्या वतीने ते सहाय्य करतां येईल ते केले पाहिजे. त्यांना सावरण्यासाठी दुसर्या बाजूने प्रद्युम्न आणि संम्व आहेत. ते एकटे नाहीत. द्युतातील कराराच्या वचनात तो बंदिस्त झाला आहे. म्हणून तो युधिष्ठीर कौरवांना अद्दल घडवणार नाही पण आपण ते करू शकतो, क्षत्रिय त्यांच्या राज्याच्या उद्धारासाठी व सत्याच्या संरक्षणासाठी कोठेही युद्ध छेडू शकतो, त्या न्यायाने आपण दसरथ व आपले साथी वृश्नी एकत्र येऊन हस्तिनापुरावर चाल करून जाऊ शकतो व त्या हलकट कौरवांना त्याची खरी जागा दाखवू शकतोच". त्या सगळ्या कौरवांना आपण यमाच्या घरी पाठवूनच शिक्षा करावी असें मला वाटते. जसा इंद्रने वृत्राचा वध केला तसा तू दुर्योधनाचा करून पांडवांना ह्या अरिष्टातून मुक्त करावे असें मला वाटते. ते उत्तेजक बोलणे ऐकून बळराम त्याला सांगतो, "पांडवातील अर्जुन माझ्या भावासारखा, कृष्णासारखाच आहे मला. मलासुद्धा असं वाटते किं, तू म्हणतोस तशी वेळ येऊन ठेपलेली आहे. मी त्या नीच कौरवाला, दुर्योधनाला माझ्या विलक्षण आयुधांच्या मदतीने पराभूत करू शकतो. त्याचे डोकेच कापून टाकतो. त्यानंतर परशुरामा प्रमाणे त्याचे सगळे सैन्य मारून टाकतो. मला खात्री आहे ते आमचे गदायुद्ध भिमाला फार आवडेल. आपल्या बरोबर असलेल्या प्रद्युम्नच्या तीक्ष्ण बाणांपुढे कृपाचार्य, द्रोणाचार्य आणि कर्ण फार काळ टिकाव धरू शकतील असें वाटत नाही. आपला सम्व दुःशासनाला भारी जाईल. जेव्हां जम्ववतीचा मुलगा लढतो, त्याच्या समोर कोणीही टिकत नाही. जेव्हां तो लहान होता तेव्हां तो अश्वचक्राला मारून टाकतो, त्याची काय वर्णावी शक्ती. तो सम्वाच्या पुढून जाईल व सम्वाचा मार्ग सोपा करील. त्यांच्याशी जे दोन होत करतात ते सगळे यमाच्या घरी जातात

हे ठरलेले आहे. वसुदेवाचा मुलगा आपला कृष्ण, त्याच्या शस्त्र विद्येने सगळे सैन्य जाळून टाकू शकतो त्यात भिष्म व द्रोण सुद्धा येतील. सोमदत्ताची मुलं त्याला घेर घालून जरी संरक्षण देण्याचा प्रयत्न करतील तरी, कृष्णाच्या चक्रापुढे ते काय करू शकतात"? ह्या जगात कृष्णाशी कोणीही बरोबरी करू शकत नाही. अनिरुद्ध कौरवांच्या सगळ्या भावांना वेढा घालेल. त्यांच्या मुंड्या उडवत जाईल. सगळे धारातीर्थ त्यांच्या मुंडक्यानी व धडांनी भरलेले दिसणार आहे". पुढे तो बोलतो, "आपले अनेक योद्धे जसें, गद, द्लूक, वहूक, भानू, निथा, तरुण रक्ताचा निषाध, शरण, चारुदेशन त्या सगळ्यांना युद्धाचा अनुभव येईल. त्यांना आपल्या कुळाची ख्याति वाढवण्यास संधी मिळेल. त्याशिवाय अनुभवी वृश्नी योद्धे, अंधक, भोज, सतवत, आणि सुर आहेतच. अशा सगळ्यांच्या पुढे ते धृतराष्ट्राचा सैन्य किती काळ टिकाव धरेल"?

"त्यानंतर, पांडवांचा अभिमन्यू त्या जिंकलेल्या राज्यावर राज्य करेल, जोवर युधिष्ठीर त्याच्या वचनात अडकलेला आहे, जे वचन त्याने त्या सट्ट्यात हरल्यानंतर कौरवांना दिले होते. ह्या सगळ्या युद्धात पांडव गुंतलेले नसल्याने त्यानी कांहींही केलेले नसेल. त्यामुळें तो करार त्यांनी मोडला असेसुद्धा ते कौरव आरोप करू शकणार नाहीत. त्यानंतर युधिष्ठीर ते राज्य अभिमन्यूकडून घेतील व त्यांचा कारभार करू लागतील हि योजना फक्कड आहे, असें बळराम त्याचे मत सांगतो. ते ऐकल्यावर द्रौपदी कुचेष्टेच्या अविर्भावात बळरामाला सांगते, "अहो मधूवंशाचे अग्रणी, तुमचे सगळे मान्य, पण हे आमचे तत्त्वनिष्ठ तसे राज्य स्वीकारणार नाहीत जोवर ते त्यांच्या नेतृत्वाखाली लढून जिंकलेले नाही. हे आमचे त्यांच्या तत्त्वनिष्ठेमुळें कोणत्याही कारणांसाठी मग ते सुखासाठी असेल, किंवा भितीपोटी असेल, किंवा स्वार्थासाठी असेल कधीही असें राज्य आपले म्हणून स्वीकारणार नाही. त्याच प्रमाणे ते दोन महान योद्धे भिम आणि अर्जुन सुद्धा त्यांची एवढी ताकद असतांना दुसर्यांना ते कष्ट घ्यावयास लावतील असे मला वाटत नाही. त्याशिवाय ते माद्रीचे दोन योद्धे सुद्धा अशाप्रकारे जिंकलेले राज्य स्वीकारतील असे मला वाटत नाही. आमचे पांचालचे योद्धे त्याबरोबर केकया राजे सुद्धा हा प्रस्ताव स्वीकारतील असें वाटत नाही कारण अहो हलधर, कोणीही सामर्थ्यवान दुसर्याच्या कमाईचे राज्य स्वीकारतील असें संभवत नसते. तो त्यांच्या अस्मितेचा प्रश्न असतो. अर्थात् तुमच्या आपुलकीचा

अवमान करण्याचा हा प्रयत्न समजू नये. तुमच्या भावना उत्कट आहेत ते पाहून मला फार बरे वाटत आहे. परंतु, अशाप्रकारे अपरोक्षपणे हा प्रश्न सोडवणे तुमच्या दामोदराला सुद्धा रुचेल कां ते पहावे लागेल". "त्यासाठी वचन बद्धतेचा काळ संपे पर्यंत प्रतिक्षा करणे व त्या नंतर प्रथम सामोपचाराचा प्रस्ताव ठेवणे आणि जर ते कौरवांनी नाही स्वीकारले तर मग युद्ध ठरलेले आहेच. अर्थात् त्यावेळी तुम्ही आमच्या बरोबर यालच, असें होणे ह्यांना योग्य वाटते".

युधिष्ठीर त्याला बोलतो, "तुमचे आवाहन स्तुत्य आहे परंतु, मला सत्याची चाड आहे. त्यात कांहीं बदल करणे योग्य वाटत नाही. सगळे रितसर झाले पाहिजे असें माझे मत असते. मी राजा बनणे माझ्या दृष्टीने तितके महत्वाचे नाही. तरीसुद्धा ह्याबद्दलचे निर्णय तुला माहित आहेच कीं, तुझा भाऊ घेणार आहे. जे तो ठरवेल तसे होणार आहे. तूर्त अर्जुन स्वर्गात सगळी भयंकर शस्त्र ताब्यात घेण्यासाठी गेला आहे म्हणजे आम्ही एकदमच गप्प बसलो आहोत असें जे तुम्हाला वाटते तसे नेमके नाही. त्याशिवाय ह्या तीर्थयात्रेच्या निमित्ताने पुण्य जमा करत आहोत. तपश्चरण करण्यामुळें आमची तब्यत कृश झाली आहे, त्याशिवाय प्रवासाचा क्षीणसुद्धा आला आहे, बाकी सगळे व्यवस्थित आहे. कृष्णाला माहीत आहे केव्हां युद्ध सुरू करावयाचे. योग्य वेळ येतांच आम्ही व आमच्या बरोबर तुम्हीसुद्धा त्यांच्यावर चाल करून जाणार आहोत, त्यावेळी तुमच्या शौर्याची प्रचिती येणार आहेच. आपण आलात आम्हाला बरे वाटले आता आपण परत तुमच्या घरी जावे. माझे तुम्हा सगळ्या शूर वीरांना एवढेच सांगणे आहे किं, भावनांच्या आहारी जाऊन कांहीं अयोग्य पाऊल टाकले जाऊ नये एवढेच मी येथे सुचवू इच्छितो. आपले नितीशास्त्र सांगते, निर्णय नेहमी तर्कशुद्ध असावेत, भावनिक नसावेत. त्याचे भान ठेवून मी माझे निर्णय घेत असतो, ते कृष्णाला माहीत आहे. आपण सगळे आमच्या बरोबर अहात त्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. योग्य समयी मी स्वतः तुम्हाला मदतीसाठी हांक मारणार आहे, त्यावेळी तुम्ही येऊन आमची बाजू मजबूत करावी".

त्यानंतर तो यदू व पांडव एकमेकाला मिठी मारून निरोप घेतात. यदूंच्या त्या भेटीमुळें पांडवांचा उत्साह द्विगुणीत झाला व ते मोठ्या उत्साहाने पुढील यात्रा सुरु करतात. ते सगळे **पयोशिनी** नांवाच्या तिर्थक्षेत्री पोहोचतात. त्यांच्या बरोबर ऋषी लोमस असतात. त्या

तीर्थक्षेत्राचे घाट विदर्भच्या राजाने बांधलेले होते. युधिष्ठीर त्या नदीच्या किनारी रहाण्याचा विचार करतो. त्या नदीचे पाणी सोमरसात मिसळून तो पित असें. तेथे द्विज त्यांचे स्वागत करतात. पांडवांना पाहून ते सगळे आनंद व्यक्त करतात.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील बेचाळीसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग त्रेचाळीसावा

तेथे असतांना लोमस ऋषी युधिष्ठीराला बोलतात, अरे राजा जेव्हां नृगाने येथे एक यज्ञ केला होता, त्यावर इंद्र, ज्याने दुष्ट असुरांच्या नगरांचा नाश केला, म्हणून त्याला पुरंदर असा किताब मिळाला तो, प्रसन्न झाला होता. इंद्राला त्याने सोम रस पिण्यासाठी दिला होता. इंद्रा बरोबर इतर देवसुद्धा तो सोमरस प्राशन करतात व त्याना आनंद होतो. तो यज्ञ सोहळा सर्व मोठ्या आनंदाने साजरा करतात. त्याच्या पुरोहितांना खूप दानं मिळतात. तो राजा, अमृतरयस, इंद्राला संतुष्ट करतो जो वज्र धारण करत असतो. त्या यज्ञात सात अश्वांचा बळी दिला होता. त्या यज्ञासाठा सगळ्या गोष्टी साताच्या प्रमाणात घेतलेल्या होत्या. सगळ्या गोष्टी सोन्याच्या होत्या. त्यात भांडी, शिड्या, चमचे, यज्ञाच्या काठ्या, इतर गोष्टी सोन्याच्या होत्या. प्रत्येक वेदीवर सात कंकण बांधलेली होती. त्या सगळ्या वेदी चमकणार्या सोन्याच्या होत्या, इंद्र व इतर देवांनी मिळून त्या वेदी उभ्या केल्या होत्या. यज्ञाच्या यजमानाने मोजता येणार नाही इतकी अगण्य संपत्ती ब्राह्मणांना दान केली होती. त्या महान राजाला गया अशा नांवानेसुद्धा ओळखले जात होते. तेथील देवळातील मुर्त्या सुद्धा सुवर्णाच्या बनवलेल्या होत्या, प्रत्येक पुरोहिताला अशा सोन्याच्या मुर्त्या भेट दिल्या होत्या. त्याच्या अशा कृत्यामुळें त्याची माहिती इंद्राला मिळाली होती. म्हणून असे समजतात कीं जो कोणी ह्या तीर्थक्षेत्री स्नान करतो तो गयासारखा इंद्र लोकी जाईल. म्हणून तुम्ही सगळे ह्या नदीत आंघोळ करावी असे लोमस त्यांना सांगतात.

वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीर व त्याचे स्तुत्य बंधू त्या नदीत स्नान करतात. त्यानंतर ते सगळे नर्मदा नदीच्या कडेला असलेल्या निलमण्याच्या रत्नांच्या डोंगराकडे जातात. ऋषी लोमस तेथील सगळी तीर्थक्षेत्रे त्यांना दाखवतात. तेथील मंदीरात ते देवांचे दर्शन घेतात. त्यानंतर ते विविध ठिकाण पहातात केवळ मनोरंजनासाठी. तेथे ब्राह्मणांना तो दानं करत असतो. लोमस त्याला सांगतात, जो तिर्थयात्री निलमण्याच्या डोंगराला भेट देतो व नर्मदेत आंघोळ करतो तो स्वर्गात जातो. पुढे तो महान ऋषी त्यांना सांगतो, "आज आपण त्रेता व कली युगांच्या मध्यात म्हणजे द्वापारात आहोत. ह्या काळात माणसाला पापातून

मुक्त होणे अपरिहार्य आहे असें समजले जाते". पुढे तो एक जागा दाखवतो व सांगतो, ह्या ठिकाणी राजा सर्यतीने यज्ञ केला होता. त्यावेळी इंद्र माणसाचे रुप घेऊन आला व सोमरस प्याला होता. त्याच्या बरोबर अश्विनीकुमारसुद्धा होते. ह्याच ठिकाणी भृगुच्या मुलाला (च्यवन ऋषी) इंद्राचा राग आला होता. त्याने इंद्राला जायबंद केले होते आणि पत्नी म्हणून सुकन्या मिळवली होती.

ते ऐकल्यावर उत्सुक होऊन युधिष्ठीर लोमसांना विचारतो, "पकाचा वध करणार्या त्या महाबली इंद्राला च्यवन कां व कसें जायबंद करतो ते सांगा. त्या महामुनीला इंद्राचा एवढा राग कां आला"? ते देवांचे वैद्य अश्विनी कुमार सोमरसाच्या नादी कां लागले"? सगळे सविस्तर सांगा, अहो ब्राह्मणा.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील त्रेचाळीसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व
## भाग चव्वेचाळीसावा

तो प्रश्न ऐकल्यावर लोमस ऋषी सांगू लागतात, भृगुला एक पुत्र होतो. त्याचे नांव च्यवन असे ठेवले होते कारण तो त्याच्या मातेच्या उदरातून अचानक बाहेर फेकला गेला होता. तो जसा मोठा होतो, त्याच्या पित्याच्या परंपरेनुसार घोर तपस्या करण्यास प्रारंभ करतो. एकदा त्या तपोश्चरणात तो वीर मुद्रेत राहून ध्यान करत असतो. एकाद्या मूर्तीप्रमाणे तो निश्चल असा त्या मुद्रेत असतो. बराच काळ तो तसा रहातो. त्यामुळें त्याच्या भोवती वारुळ बनत जाते. त्या वारुळात तो पूर्णपणे झाकला जातो. त्यावर नंतर कांहीं वेली सुद्धा वाढत असतात. बरीच वर्षे अशी जातात, च्यवन त्या वीर मुद्रेतच असतो. त्यामुळे त्यात एक ऋषी बसला आहे असे समजणे केवळ असंभव झाले होते. त्या ठिकाणी त्या भागातील सर्यती नांवाचा राजा मौजमजा करण्यासाठी एकदा आला असतां, त्याच्या बरोबर त्याची अप्रतिम लावण्य असलेली कन्या होती, तिचे नांव होते सुकन्या, तिच्या चार हजार स्त्री सेविका बरोबर होत्या, ती राजकन्या व तिच्या मैत्रिणी त्या वारुळाजवळ जातात. त्या सगळ्या खेळण्याच्या मनस्थितीत होत्या. निष्पाप बुद्धीने त्या वारुळाजवळ खेळत असतात. आजूबाजूचे मनाला आल्हाद देणारे वातावरण पहाता तिचा गमती जमती करण्याचा कल होतो व केवळ गंमत म्हणून ती तेथील झाडांच्या फांद्या तोडण्यास सुरुवात करते. ज्या फांद्यांवर फुलं बहरलेली होती त्या फांद्या ती उपटत होती. वारुळात असलेला भृगुपुत्र त्याचा अंदाज घेत असतो. च्यवनाचा त्याच्या दिव्यदृष्टीने ती दिसते. तिच्या अंगावर मोजके कपडे होते व त्यातून तिचे भरलेले सुंदर शरीर त्याला भारावून टाकते. च्यवन तिची अभिलाषा करू लागतो. च्यवन तिला हांक मारतो परंतु, त्याचा खोल गेलेला आवाज तिला ऐकू येणे शक्य नव्हते. त्यानंतर ती राजकन्या खेळत खेळत त्या वारुळाजवळ येते तेव्हां तिला त्यात दोन डोळे असलेले दिसतात. हा काय प्रकार आहे ते अजमावण्यासाठी ती तिचे एक बोट त्यावर दाबते. त्याचा तो डोळा जोराने दाबला गेल्यामुळें च्यवनचा तो डोळा दुखावला जातो. त्यामुळें च्यवनाला खूप राग येतो व तो त्या राजाच्या सैनिकांचे देहाचे व्यवहार बंद करतो. त्यामुळें सगळे अस्वस्थ होतात. राजाला

कळते किं, ते भृगुच्या तपस्वी मुलांने केले आहे. ते समजल्यावर राजा चौकशी करू लागतो किं, कोणी भृगुच्या मुलास त्रास दिला आहे. भृगुचा पुत्र वृद्ध असून फार मोठा तपस्वी आहे त्याला त्रास कोणी दिला त्याची चौकशी सुरु होते. सगळे सैनिक निरपराधी असें सांगतात कीं, त्याना त्याची कांहींच कल्पना नाही. प्रत्येकाला विचारत ते फिरू लागतात. राजाने साम व दंड अशा दोनही मार्गाने चौकशी केली परंतु, खरा दोषी कोण ते त्याला समजले नाही. त्यांने त्याच्या मुलीची चौकशी केलीच नाही कारण तिच्यावर संशय घेणे त्याला आवश्यक वाटले नाही. सगळे सैन्य तब्यत बिघडल्यामुळें आजारी झाले होते. ते सगळे सुकन्या पहात असते पण आपल्या कृत्यामुळे ते होत आहे त्याचा जरासुद्धा तिला संशय आला नाही. आपले पिता कष्टी झाले आहेत हे तिला दिसत होते. ती तिच्या पित्याला तिच्या गमती सांगत होती. त्यात ती सांगते किं, त्या वनात एका वारुळात एक चमकणारा गोळा दिसला. तो काजवा असावा असें समजून तिने त्याला काट्याने दाबले असे ती सांगते. तेव्हा आतून एक अस्पष्टसा आवाज आला. ते ऐकताच राजा सर्यती त्या वारुणाजवळ जातो. ते वारुळ उखडले जाते, त्यात च्यवन एका डोळ्याला इजा झालेला असा दिसतो. ते पाहून त्याला सैनिकांच्या आजाराचे कारण समजते. तो हात जोडून नमस्कार करून ऋषीला विनंती करतो, "माझ्या लहान मुलीने जे अज्ञानामुळें केले त्याला आपण माफी करावी व माझ्या सैनिकांना पुनः पुर्ववत करावे". ते ऐकल्यावर रागाच्या भरातच च्यवन त्याला ऐकवतात, "तुझ्या मुलींने माझा एक डोळा फोडला आहे त्याचे काय"? "त्याची तिला सजा व्हावयालाच पाहिजे. त्यासाठी तू तुझा हि मुलगी मला पत्नी म्हणून दे. तरच मी तुझ्या सैनिकांना मुक्त करीन".

लोमस पुढे सांगतात, हे त्याचे बोलणे ऐकून राजा सर्यती क्षणाचाही विलंब न लावता त्याची मुलगी भृगुच्या त्या वयोवृद्ध मुलास, च्यवनाला दान करतो. त्यामुळें तो पवित्र ऋषी राजावर प्रसन्न होतो. सुकन्या तेथेच वनात च्यवनची सेवा करत रहाते. राजा त्याची सेना घेऊन आपल्या राज्यात राजधानीकडे निघून जातो. सुकन्यासुद्धा तपश्चर्येचे धडे आपल्या वृद्ध पतिकडून घेऊ लागते. मनात कोणताही किंतू न ठेवता ती तरुण राजकन्या त्या जरठ पतिला मनापासून स्वीकारते व त्याची सेवा करण्यात स्वताला धन्य समजू लागते.

अशारितीने तिर्थयात्रा पर्वातील चव्वेचाळीसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व
## भाग पंचेचाळीस

लोमस सांगतात, असाच काळ जात असतो व एकदा स्वर्गातून अश्विनीकुमार, देवांचे वैद्य, सुकन्येला तिच्या वृद्ध पतिची सेवा करत असतांना पहातात. सुकन्या नुकतीच स्नान करून नदीतून बाहेर आलेली असते. तिचे सौंदर्य खुलून आलेले ते पहातात. एकाद्या देवाचीच कन्या असावी अशी ती भासत होती. अश्विनी तिच्या जवळ जातात. तिला विचारतात, "तू कोणाची मुलगी आहेस? येथे काय करते आहेस"? आम्हाला नवल वाटते कीं, तुझ्यासारखी कन्या अशा अरण्यात एकटी काय करत आहे"! ती सुकन्या त्यांना लाजत लाजत सांगते, "मी राजा सर्यतीची राजकन्या आहे व मी येथे माझ्या पतिची सेवा करत आहे. मी ऋषी च्यवनांची पत्नी म्हणून येथे त्यांची सेवा करत आहे". ते ऐकून त्यांचे कुतुहल वाढते व ते विचारतात, "असे काय झाले कीं, तुझ्या बापाने तुला त्या म्हातार्याला दान केले"? ते पुढे बोलतात, "अग लाजाळू मुली, तू ह्या वनात वीजेसारखी चमकत आहेस म्हणून आमच्या लक्षात आली आहेस. त्या आकर्षक पेहेरावाशिवाय सुद्धा तू खूप सुंदर दिसत आहेस. आता तू मातीने माळलेली आहेस जेथे दागिने हवे होते, अशा परिस्थितीत तू त्या मरायला टेकलेल्या माणसाची अर्घांगिनी बनून रहाणे कां पसंत करतेस ते समजेल कां"? "त्याच्यात तुला तुझे हक्काचे सुख देण्याची क्षमता उरलेली नाही, जो तुला सांभाळू शकत नाही, जो तुझ्या योग्यतेचा कोणत्याही अंगाने निश्चितच नाही अशा बरोबर तू इतक्या आनंदात कशी काय रहातेस? म्हणून सांगतो, आम्ही देखणे देव आहोत हे तू पहातेसच, मग त्या म्हातार्या च्यवनला सोडून देऊन तू आमच्या पैकीं एकाला कां निवडत नाहीस? अशारितीने तू तुझी सगळी जिंदगी वाया घालवशील ते बरोबर होईल कां"? ते अश्विनीकुमारांचे चिथावणीचे बोलणे ऐकून सुकन्या त्यांना उत्तर देते, "मी पतिव्रता आहे. मला छिनाल समजत असाल तर कृपया येथून निघून जा. मला तुमच्या सहानुभूताची गरज नाही, मी मनात आणले तर माझ्या पित्याकडे सर्यतीकडे जाऊ शकते. पण मी जाणते किं, माझ्या पतिला माझी आवश्यकता आहे म्हणून मी येते त्याला साथ देणार आहे". तिचे ते निश्चयपूर्वक बोलणे ऐकून अश्विनी तिच्यावर प्रसन्न होतात. ते तिला

सांगतात, "आम्ही दोघे तुझी परीक्षा पहात होतो, त्यात तू योग्य ठरली आहेस म्हणून आता आम्ही तुला सांगतो, आम्ही कोण आहोत. आम्ही देवांचे वैद्य आहोत. तुझ्यावर प्रसन्न झालो आहोत म्हणून आम्ही तुझ्या पतीला पुनः यौवन बहाल करण्यासाठी आलो आहोत. त्याला आमच्या समोर घेऊन ये". अरे युधिष्ठीरा, ती युवती त्यामुळें उत्सुक होऊन आत च्यवनला आणण्यासाठी जाते. तेथे ती आपल्या जरठ पतीला ते देवांचे वैद्य काय सांगत होते ते सांगते. ते ऐकल्यावर च्यवन त्याला त्याची मान्यता आहे असें सुचवतो. आपल्या पतिची मुभा आहे हे समजल्यावर ती बाहेर येते व अश्विनींना सांगते की, तिच्या पतिची त्या प्रयोगाला संमती आहे. ते ऐकल्यावर ते देवांचे वैद्य त्या राजकन्येला सांगतात किं, तिच्या नवर्याने नदीच्या पाण्यात प्रवेश करावा. च्यवन मोठ्या उमेदीने पाण्यात शिरतो. त्याच्या बरोबर ते दोघे अश्विनीसुद्धा पाण्यात शिरतात. थोड्याच वेळांनी ते तिघे पाण्यातून बाहेर येतात. ते तिघे तरुण बाहेर येतात. त्यांच्या कांनात चमकणारे कंकण होते. ते तिघे सारखेच दिसत होते. त्यातील एक सुकन्येला बोलतो, "आमच्यातील तुझा पति कोण ते ओळख पाहू". सुकन्या त्या तिघांना न्याहाळू लागते. बारीक निरीक्षणानंतर तिला त्यातील तिचा पति कोण ते समजते. त्याच्याकडे ती बोट करून सांगते कीं, हा माझा नवरा. ते पाहून च्यवन त्याच्या पत्नीवर कमालीचा संतुष्ट होतो व देवांकडे पहात तो त्यांना सांगतो किं, त्याच्याकडील सोमरसातील वाटा तो त्यांना देऊ इच्छितो. च्यवनाला अशारितीने सुकन्येची परीक्षा घेऊन ते तारुण्य बहाल करतात. आणि स्वर्गात निघून जातात. त्यानंतर ते उभयता तरुण झालेले त्यांचे उर्वरीत आयुष्य मोठ्या आनंदात घालवतात.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील पंचेचाळीसावा भाग संपला.

# तीर्थ यात्रा  पर्व

## भाग  सहेचाळिसावा

लोमस पुढे सांगतात, यथावकाश राजा सर्यातीला समजते किं, त्याचा जावई जो म्हातारा होता तो अश्विनींच्या कृपेने तरूण झाला आहे. त्या वार्तेने प्रसन्न झालेला राजा आपल्या कन्येस भेटण्यासाठी त्यांच्या पर्णकुटीत जातो, तो त्या दोघांना पहातो जसे काय स्वर्गातून दोन तरुण पृथ्वीवर अवतरले आहेत. सगळे जग जिंकल्यावर जो आनंद राजाला झाला असतां तसा आनंद त्याला व त्याच्या राणीला झाला होता. राजाचे स्वागत ते उभयता मोठ्या आदराने त्यांच्या पर्णकुटीत करतात. राजा सर्यती च्यवनांच्या बरोबर बसतो. त्यांच्यात सात्त्विक आणि पवित्र विषयांवर गप्पागोष्टी सुरू होतात. त्यामध्यें राजा सर्यातीला त्यांचा जामात सांगतो किं, तो राजाच्या यज्ञाचे पौरोहित्य करण्यास उत्सुक आहे. ते ऐकल्यावर खूप आनंद झालेला तो राजा त्यास आपली संमती दाखवतो. त्यानंतर च्यवन राजाला सांगतात कीं, त्यासाठी लागणार्या सर्व जिनसांची जमवाजमव सुरू करावा. त्याप्रमाणे राजा सर्यती त्याच्या सेवकांना आज्ञा करतो कीं, एक यज्ञगृहाची उभारणी सुरू करावी. योग्य सुमुहूर्तावर त्या कामाचा प्रारंभ होतो. त्या यज्ञगृहातील सगळ्या जिनसा अत्युत्तम अशा होत्या. त्यात च्यवनांची नेमणूक मुख्य याज्ञिक म्हणून केली जाते. एवढे सांगितल्यावर ऋषी लोमस युधिष्ठीराला बोलतात कीं, आता अरे कुंतीपुत्रा , त्या प्रसंगी काय घडले ते मी सांगतो, ते तू व सगळे येथे ऐकणारे, लक्ष देऊन श्रवण करतील. कारण तसेंच विलक्षण असें तेथे घडले होते. तेवढे सांगून मग लोमस पुढे सांगू लागतात, च्यवन त्याच्या कडे असलेले सोमरस अश्विनींसाठी वेगळे काढतो. ज्यानी त्याला तारुण्य मिळवून दिले होते. परंतु, त्यावेळी इंद्र त्यामध्ये हस्तक्षेप करतो व सांगतो, बोलतो, "माझ्या मते अश्विनींना सोमाचा हक्क मी नाकारतो. ते देवांचे वैद्य आहेत व त्या त्यांच्या कामाचा एक भाग म्हणून त्याना सोमरस घेण्यास बंदी आहे". ते इंद्राचे ऐकून च्यवन त्याला बोलतात, "अरे शक्रा, ते दोघे अतिशय कार्यक्षम आहेत, ते अतिउच्च दर्जाचेसुद्धा आहेत, ते दिसायला सुद्धा अप्रतिम आहेत आणि सर्वात मुख्य कारण, माझे त्यांना देण्यामागील असें आहे किं, त्यांनी मला माझे तारुण्य परत केले आहे, त्या उपकाराची उतराई करणे मला

अनिवार्य वाटते". असें बोलून मग च्यवन त्याला व तेथे जमलेल्या देवांना विचारतो किं, "जर सगळ्या देवांना सोमरसाचा हक्क आहे मग ह्यांनाच कां नाही? तुम्ही विसरता कीं, अश्विनीसुद्धा देवांच्याच वर्गात आहेत". ते च्यवनाचे ऐकून थोड्या घुश्श्यातच इंद्र ऋषीला सांगतो किं, ते देवांचे वैद्य असले म्हणून ते देवांच्या योग्यतेचे होत नाहीत. ते देवांची सेवा करतात म्हणून ते देवांचे सेवक ठरतात. त्याशिवाय मायावी सोंग घेऊन ते मर्त्य लोकात फिरत असतात. जसे देव कधीच करत नाहीत. हलक्या (मर्त्य लोक) लोकांत ते फिरत असतात म्हणून त्यांना सोमरस प्राशन करण्याचा अधिकार मी देत नाही. इंद्राच्या आक्षेपाकडे दुर्लक्ष करत च्यवन सोमरसाचा एक मोठा भाग अश्विनींना देण्याच्या इच्छेने कलशात घेतात व तो ते त्या यज्ञात अश्विनींच्या नांवाने सोडणार इतक्यात च्यवनांचा इरादा लक्षात आल्यामुळें चिडलेला देवांचा राजा मोठ्याने ओरडून सांगतो किं, "जर तुम्ही तो भाग अश्विनींना अर्पण करण्याचा प्रयत्न केला तर माझे वज्र मी तुझ्यावर फेकीन, त्याची जबाबदारी तुझी असेल. तुम्हाला माहित आहे, माझे वज्र किती घातक आहे, म्हणून असा अविचार करणे बंद करावे". ते इंद्रांचे बोलणे ऐकून च्यवन त्याच्याकडे पहात स्मित करतात. त्या नंतर ते सोमरसाचा मोठा भाग यज्ञात अश्विनींच्या नांवांने आहुति करण्यासाठी हातात घेतात, ते पाहून इंद्र संतापून त्याचे वज्र च्यवनांवर फेकणार इतक्यात च्यवनांच्या सिद्धीमुळें तो देवांचा राजा एकदम जायबंद होतो. च्यवन त्यांचे आहुति देण्याचे कार्य विनाव्यत्यय संपन्न करतात. त्यानंतर च्यवनांना इंद्राचा इतका राग आला होता कीं, ते इंद्राचा कायम बंदोबस्त करण्यासाठी एक मायावी राक्षस उत्पन्न करतात. त्याचे नांव असते, मद, त्याचे आकारमान कोणी मोजावे इतके लहान सहान नव्हते. तरी सांगण्याचा प्रयत्न करतो, त्याचे तोंड भयंकर दिसत होते, ते खूप मोठे होते, त्याचे दात धारदार व टोकदार होते, त्या तोंडाचा एक जबडा पृथ्वीवर टेकला होता व दुसरा स्वर्गाकडे गेला होता. त्याला चार पाय होते त्यांची लांबी कित्येक योजने होती, महालांवर जसें मनोरे उंच काढलेले असतात तसें ते दिसत होते त्याच्या अंगावर, त्याला दोन हात होते ते खूप मोठे व अवाढव्य होते. त्यांची लांबी असेल कांहीं योजने एवढी, त्याचे नेत्र चंद्र व सूर्यच असे मोठे व भव्य होते. तो सारखा जिभल्या चाटत होता जणू त्याला कांहीं खावयाचे आहे. त्याची नजर जणू त्याचे खाद्य शोधत होती अशा प्रकारचे त्याचे हलणे चालणे होते. सगळे

मोठे बिभत्स व भयानक होते. मद राक्षस त्वरेने शंभर यज्ञ केलेल्या देवांच्या देवाकडे सरकला, आता तो त्याला खाणार अशी परिस्थिती झाली होती. तो घाबरवणार्या डरकाळ्या फोडत इंद्राकडे झेपावत होता.

अशारितीने तिर्थयात्रा पर्वातील सेहेचाळीसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग सत्तेचाळीसावा

लोमस पुढे सांगत होते, जसें इंद्र ते रुप पहातो, जो मद त्याच्याकडे झेपावत होता, ज्याचे तोंड पूर्ण उघडलेले होते व त्याचा इरादा शक्राला खाण्याचाच होता ते त्याला समजते, त्याचे स्वरुप साक्षात यमदेवाचेच होते. त्या अवस्थेत इंद्र त्याचे हात बधीर झालेले असल्यामुळे फक्त त्याचे ओठ हलवू शकत होता. त्या घाबरलेल्या अवस्थेत तो देवाधिदेव च्यवन ऋषींना विनंती करतो, "अहो भृगुजना, मी मान्य करतो कीं, अश्विनींना सोमरसाचा अधिकार आहे. पण ह्या राक्षसाला थांबवा. अहो पुरोहित वर्गातील संता, तुमचे म्हणणे नेहमी रास्तच असेल. त्याला मी विरोध करणार नाही. ह्या प्रसंगामुळें तुमची ख्याती सर्व जगात होणार आहे. माझा दुसरा उद्देश होता किं, सर्यतीच्या नावांचा सगळीकडे गवगवा व्हावा. मला तुम्हाला विरोध करावयाचा खरेतर उद्देश अजिबात नव्हता. म्हणून तुम्ही मला समजून कृपा करा. असे विनवणीचे बोलणे तो पुनः पुन्हा करत रहातो. मद राक्षस जणू काय च्यवनाच्या आदेशाची प्रतिक्षा करत होता. इंद्राच्या त्या विनवणीमुळें च्यवन समाधानी होतात. ते मदाला बाजूला होण्यास सांगतात व इंद्राची त्यातून मुक्तता होते. त्यानंतर त्या मद राक्षसाचे तो ऋषी तुकडे करतो व कांहीं तुकडे मद्यात घालतो, कांहीं बाईत घालतो, कांहीं द्युतात घालतो व कांहीं क्षेत्रिय खेळात घालतो. अशारितीने त्या मद दोषाचे (षड्दोषातील एक आहे) विभाजन केले जाते. त्यानंतर तो इंद्राला सोमरस पिण्यास देतो. त्यानंतर राजा सर्यतीचा यज्ञ संपन्न होतो. त्या यज्ञात सगळ्या देवांबरोबर अश्विनींनासुद्धा देवांच्या बरोबरीच्या स्थानावर बसवले जाते. त्या यज्ञामुळें सर्यतीची ख्याती सर्वदूर पसरते. त्यानंतर तो यती आपल्या पत्नीबरोबर वनात आनंदाने राहू लागतो. ती हि जागा आहे म्हणून, ती पवित्र झाली आहे. ह्याकरतां तुम्ही सगळे येथे स्नान करून पवित्र व्हावे असें लोमस त्यांना सांगतात. त्या नंतर पंडुची मुलं व त्यांच्या सह असलेले सगळे यात्री तसे करतात. त्यानंतर ते सगळे **सिकातक्ष** नांवाच्या तीर्थक्षेत्री जातात. त्यानंतर लोमस त्यांना सांगतात कीं, ते सगळे सैंधव वनात जातील. तेथे असलेले असंख्य मानव निर्मित झरे पहा व तेथील पाण्यात स्नान करा. तेथे असंख्य तलाव सुद्धा

आहेत तेथे महादेवाचे एक स्थान आहे, फार पवित्र समजले जाते. त्या दर्शनानंतर तुम्ही नेहमी अजिक्य रहाल असें ते सांगतात. लोमस पुढे सांगतात, हा काळ फार महत्वाचा आहे कारण, आपण ह्या काळात म्हणजे त्रेता व द्वापारच्या मधल्या युगात, आहोत व ह्या युगात आपण सगळी पापं धुतली पाहिजेत. म्हणून येथे अर्घ्य देऊन पुजा करा म्हणजे तुम्ही कायम निष्पाप व्हाल. त्या पलिकडे आहे **अर्चिक पर्वत**. त्या ठिकाणी सुसंस्कृत लोक रहातात. सर्व प्रकारची फळं येथे सदैव मिळतात. तेथे पाणीसुद्धा सदैव असते. दैवतांनी तेथे ठिकठिकाणी वेशीचे फत्तर बसवलेले आहेत. अरे युधिष्ठीरा, ह्या ठिकाणी साक्षात चंद्र स्नान करण्यासाठी प्रसंगी येत असतो. सगळे ख्यातनाम संत ह्या ठिकाणी स्नानासाठी येत असतात. त्यात प्रामुख्याने वालखिल्य, ययवरस आणि  पावक आहेत. ते साधू फक्त हवेवर जगतात म्हणून त्यांना पावक संत म्हणून ओळखले जाते. त्यांना विशेषनामे नाहीत. त्या तीर्थाला एक प्रदक्षिणा घाल म्हणजे चांगले होईल. तेथे तीन शिखरं आणि तीन झरे आहेत. शंतनु आणि शनक हे येथे येऊन गेले होते. तसेंच प्राचीन काळचे नर व नारायण सुद्धा येथे आले होते. ह्या आर्चिक पर्वतावर ते सगळे वंदन करण्यासाठी येतात. तपोश्वरण व ध्यानसाधना व्रतस्थ राहून करावे लागतात ज्यांना अजून अहंकार आहे. ज्यांचा अहंकार निवाला आहे त्यांना येथे प्रवेश सोपा असतो. असें समजतात यमुना नदी येथे बाहेर येते. येथे दुधभाताचा आहार करतात. कृष्णांने येथे हजारो वर्षे तप केले आहे. अरे पंडुच्या मुलां, तुला उद्या तुझ्या शत्रूचे मुडदे खेचत न्यावयाचे आहेत. म्हणून तू येथे तपस्या करणे उचीत होईल. तुम्ही सगळे पांडव कृष्णा व मी स्वतः असे सगळे येथे स्नन करू. हे झरे इंद्राच्या मालकीचे आहेत असें सांगतात. ब्रह्मदेव आणि वरुण ह्या ठिकाणी उद्धरले होते. तेसुद्धा येथे येत असतात. ह्या पवित्र पर्वताला तुझ्या सारख्यानी जरूर गेले पाहिजे. हिंच ती प्रसिद्ध यमुना नदी आहे, येथे अनेक साधू विविध धार्मिक विधी करतात. त्यामुळें पुण्यप्रभाव वाढतो व पाप बुद्धी संपुष्टात येते. ह्याच ठिकाणी ख्यातनाम मंधत्त स्वतः देवांना प्रसन्न करण्यासाठी यज्ञ करून गेला आहे. त्याच प्रमाणे, सोमकानी सुद्धा यज्ञ केले आहेत, जो प्राचीन राजा सहदेवाचा मुलगा होता. ज्याची दानं करण्यात प्रसिद्धी होती.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील सत्तेचाळीसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व
## भाग अठ्ठेचाळीसावा

युधिष्ठीर विचारतो, "अहो ब्राह्मणा, तो राजांत केसरी समजला गेलेला मंधत्त, युवनस्वाचा मुलगा, त्याचे राज्य विष्णू सारखे सर्व विश्वावर होते. ज्याची ख्याति तिनही लोकांत होती, त्याचे उच्च प्रतिचे यश त्यांने कसे प्राप्त केले ते मला सांगा. मला समजून घ्यावयाचे कीं, त्याला मंधत्त असें नांव कां पडले"? तो सांगतात, की, इंद्रासारखा तेजस्वी होता. त्याचा जन्म कसा झाले तेसुद्धा सांगा. तुम्ही सांगण्यात फार हुशार अहात म्हणून मी तुम्हाला विचारत आहे".

लोमस सांगू लागतात, "लक्ष देऊन ऐका सगळे जण, मंधत्त असें नांव कां व कसे पडले ते सांगतो. फार प्राचीन काळी इक्ष्वाकू वंशात एक राजा होऊन गेला त्याचे नांव होते युवनस्व. तो सगळ्या जगावर राज्य करत होता. त्यांने अनेक यज्ञ केले. त्याने हजारो अश्वमेध यज्ञ केले होते. त्याने आणखीन बरेच मोठे यज्ञ केले होते. तो ब्राह्मणांना दानं देण्याबद्दल प्रसिद्ध होता. परंतु त्या सात्त्विक प्रवृत्तीच्या राज्याला पुत्र होत नव्हता. म्हणून तो त्याचे राज्य त्याच्या कारभार्यांच्या कडे सुपूर्द करतो व स्वतः तपश्चर्या करण्यासाठी वानप्रस्थाश्रमी निघतो. पवित्र रहाणीमान असलेला तो राजा ध्यान साधनेत आपला समय व्यतीत करू लागतो. त्याने ज्या कठोर साधना सुरु केल्या त्यामुळें त्याला भूक व तहान ह्यांचा फार त्रास होऊ लागला. अशा अवस्थेत तो भटकत जात असतांना एकदा भृगु ऋषीच्या आश्रमात येतो. त्याला भृगुंच्या बद्दल खूप आदर होता. त्या ठिकाणी तो राजा पुत्रप्राप्तीसाठी कांहीं व्रत करतो. त्याची पत्नी सौद्युम्नी, हिला मुलगा व्हावा म्हणून ते करावयाचे होते. जेथे तो विधी होणार त्या ठिकाणी एक मोठा पाण्याचा हंडा होता. त्यात मंत्र जागरण करून विधीयुक्त पवित्र केलेले पाणी भरलेले होते. असे ठरलेले होते कीं, राणी सौद्युम्नी फक्त त्यातीलच पाणी पिण्यासाठी वापरेल. त्यामुळे तिला देवासारखा गुणी पुत्र प्राप्त होईल अशी धारणा होती. तो हंडा वेदीवर ठेवून तो संत झोपण्यासाठी गेला होता. रात्रभर जप करण्यामुळें तो थकला होता. परंतु त्या ब्राह्मणाला तहान लागली होती, त्याशिवाय राजालासुद्धा तहान लागली होती. जवळपास दुसरा पाण्याचा साठा नव्हता. तो

त्या पर्णकुटीत शिरला व पाण्यासाठी विचारू लागला. तहानेने राजाचा घसा इतका सुकलेला होता किं, तो पाणी आहे कां असें विचारण्यासाठी जे बोलतो ते फारच अस्पष्ट आवाजात जसें, एकाद्या लहान पक्षाचे चिव चिव करणे होते. त्याचा तो बारीक अस्पष्ट आवाज कोणालाही ऐकू आला नाही. त्यानंतर त्या तहानलेल्या राजाने तो पाण्याने भरलेली हंडा बघितला. तो त्या हंड्याकडे धावत जातो व त्यातील पाणी पितो. पाण्याचा हंडा तो खाली ठेवतो, त्याची तहान त्या हंड्यातील गार पाण्याने भागलेली असते. थोड्या वेळांनी तो संत ज्याने त्या हंड्यात मंतरलेले पाणी भरले होते तो त्याची झोप पुरे झाल्यावर उठतो व त्या हंड्याकडे जातो व पहातो कीं, हंड्यात पाणी नाही. त्या पर्णकुटीतील माणसे एकमेकांना विचारू लागता किं ते पाणी कोण प्याला? त्यावेळी राजा युवनस्व सांगतो किं, तो ते पाणी प्याला. ते ऐकल्यावर भृगुंचा मुलगा त्याला बोलतो, "आपण ते पाणी प्यायला नको होते. ते पाणी मंतरलेले होते असे किं, ते पाणी तुमची राणी जर प्याली तर तिला पुत्र रत्न होईल. तो मंतरण्यासाठी मी खूप तपोश्चरण केले होते. जर ते पाणी तुमची पत्नी प्याली असती तर तिला एक शक्तीमान, बुद्धीमान, कर्तृत्ववान मुलगा झाला असता. तो इतका प्रबळ झाला असतां किं प्रसंगी त्यांने इंद्राला मारले असते. असें ते पाणी होते. म्हणून ते पाणी पिऊन तू मोठी चूक केली आहेस". पुढे तो भृगुचा मुलगा सांगतो "आता आम्ही जे घडेल त्यात कांहीं करू शकणार नाही. तुम्हाला ते पाणी पिण्याची इच्छा झाली हे कदाचित विधीलिखीत असेल. परंतु, आता त्या पाण्यामुळें तू स्वतः गर्भवंत होऊन त्या सामर्थ्यवान आत्म्याला जन्म देशिल कारण माझे कलेले कधींच वाया जात नाही. त्या दृष्टीने आता आपण एक विधी केला पाहिजे. त्या विधीमुळें तू त्या बाळाला जन्म दिलास तरी आता जो विधी करणार आहे त्यामुळें तुला प्रसव वेदना होणार नाहीत". त्यानंतर शंभर वर्षे होतात व एके दिवशी राजाच्या डाव्या कुशीतून एक बाळ जन्म घेते. त्याच्या डाव्या कुशीतून तो जन्मला तरी युवनस्वाला काहींच त्रास झाला नही कां तो मेला नाही. ते समजल्यावर इंद्र स्वतः त्याला बघायला येतो. त्या नवजात बालकाला पाहून इंद्र विचारतो, "त्याला दूध कसे चोखता येईल"? असे बोलून तो त्याचे पहिले बोट त्या नवजात बालकाच्या तोंडात घालतो व त्या बाळाला बोलतो, आता तू मला चोख. इंद्राबरोबर आलेले देव त्या बालकांचे नांव ठेवतात, मंधत्त म्हणजे, मला चोखणारा, त्या

बोटाने पिणारा तो बालक मोठा राजा झाला. अशारितीने ते नांव त्याला पडले. त्याचा आकार झपाट्याने वाढत गेला आणि त्याचे ज्ञान उपजत होते, त्याला कांहीं शिकावे लागले नाही. त्याच्या अंगावर चिलखत चढले, त्याच्या हातात अजगव नांवाचे धनुष्य आले व त्यासाठी बाणसुद्धा आले. हे सगळें एकाच दिवसात झाले. त्यानंतर त्याला इंद्राने स्वतः त्याला राजगादीवर बसवले. मंधत्त मोठा पराक्रमी राजा म्हणून नावारुपाला आला. त्याच्या राज्यात समृद्धी व वैभव अफाट होते. त्यांने पुष्कळ यज्ञ केले. त्यांने अनेक गुढ्या उभरल्या व अनेक लोकोपयोगी कृत्ये केली. त्याचे तेज इंद्रासारखेच होते. जणू दुसरा इंद्र. त्या दूरदृष्टी असलेल्या राजाने सागरासकट सगळी पृथ्वी जिंकली होती व सुराज्य सर्वदूर आणले होते. त्यांने यज्ञवेदी ठिकठिकाणी उभारल्या होत्या. एकदा जेव्हां बारा वर्षे पाऊस पडावयाचा थांबला होता तेव्हां मंधत्त राजाने त्याच्या तपस्येच्या बळावर पावसाला आणले होते. त्यावेळी त्याचे ते कृत्य इंद्र पहात राहिला होता. गांधारचा एक राजा ज्यांने सगळ्यांना सळोकीपळो केले होते त्याला मंधत्ताने ठार मारले व लोकांना सुखशांती मिळवून दिली होती. मंधत्ताने चारही वर्णांना न्याय दिला. त्याच्यामुळे पाप शक्ती गुपचुप झाल्या होत्या. त्या तपस्वी व्रतस्थ राजाने येथेच त्याचे विधी केले होते. म्हणून तू सुद्धा येथे तुझे विधी करावे असे मला वाटते. तू विचारलेस म्हणून मी तुला मंधत्ताची कथा सांगितली. त्याच्या जन्माची विलक्षण अविश्वसनीय कथासुद्धा सांगितली.

वैशंपायन जनमेजयाला सांगतात, अरे राजा, ती कथा समजल्यावर ताबडतोब तुझ्या आजोबांनी नवीन प्रश्न लोमसांपुढे ठेवला तो सोमकाच्या बद्दलचा होता.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील अठ्ठेचाळीसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व
## भाग एकोणपन्नासावा

युधिष्ठीर विचारतो, "अहो ब्राह्मणा, मला सांगा, सोमकाच्या सामर्थ्याची व कुवतीची मजल कोठवर होती. मला त्याच्या बद्दल समजून घ्यावयाचे आहे".

त्यावर ऋषी लोमस त्याला सांगतात, "अहो युधिष्ठीर, फार पूर्वी एक सोमक नांवाचा राजा होऊन गेला. त्याच्या शंभर बायका होत्या. त्या सगळ्या त्याला साजेशाच होत्या. तो त्यांची फार चांगली काळजी घेत असे परंतु, त्या राजाला मुलं होत नव्हती. बरीच वर्षे अशीच गेली पण त्याला कांहीं पुत्र होत नव्हता. तो वृद्ध होण्याची वेळ येऊन ठेपली. अखेरीस त्याला एक मुलगा झाला त्याचे नांव ठेवले होते जंतू. त्या शंभरापैकी एका पत्नीपासून तो झाला होता. परंतु, इतर सगळ्या राण्या त्या राजपुत्राचे फार लाड करत होत्या. असेंच मजेत दिवस जात होते. एके दिवशी एक मुंगी जंतूला त्याच्या पाश्वभागावर डसली. त्यामुळें तो लहान मुलगा जोराने ओरडला. त्याचे ते विव्हळणे पाहून त्या सगळ्या त्याच्या माता चिंतातूर झाल्या. त्या सगळ्या बायका त्या मुलाभोवती बसून रडू लागल्या. त्या सगळ्या शंभर बायका एकत्रपणे आकांत करू लागल्यामुळें सगळाच गोंधळ उडाला. तो त्या सगळ्यांचा आकांत राजाच्या कानी गेला जेव्हां तो त्याच्या मंत्रीमंडळात कारभाराच्या गोष्टी करत बसला होता. त्याचे कुटूंबाचे पुरोहित त्यांच्या बरोबर बसलेले होते. राजा सेवक पाठवतो, कशामुळें हा गोंधळ होत आहे ते समजण्यासाठी. थोड्या वेळांनी तो सेवक राजाला जे त्याच्या पुत्राशी झाले होते ते सांगतो. सोमक ताबडतोब उठला, त्याच्या बरोबर त्याचे सगळे कारभारीसुद्धा उठले व राणी प्रसादाकडे निघाले. तेथे त्याने रडणार्या आपल्या लहानग्याला समजावून शांत केले. ते झाल्यावर सगळे शांत झाले मग राजा पुन्हा त्याच्या कारभार्यांबरोबर राज्याचे काम करण्यासाठी बसला. तेथे बसल्या बसल्या राजा स्वताशी बोलतो, "धिक्कार असो एक पुत्र असण्याचा, त्यापेक्षा निपुत्रिक असणे जास्त चांगले. केवळ एक पुत्र असणे म्हणजे ब्याद आहे". नंतर तो देवांना आवाहन करतो, "अहो स्वर्गीय शक्तींनो, मला एवढ्या बायका असून एकच पुत्र कां दिला? मला अनेक पुत्र असायला पाहिजे होते. मी चांगले तपासून त्या सगळ्या बायकांशी लग्ने केली

तरी असें कां झाले"? किती आणि काय मी केले त्या सगळ्या जणींना मुलं व्हावी म्हणून पण व्यर्थ. आता जो झाला आहे तो माझा प्राण बनून राहीला आहे". एवढे देवांना सांगितल्यानंतर तो सोमक त्या बाजूला बसलेल्या त्याच्या पुरोहिताला बोलतो, "आपण पहात अहात, मी एवढे करूनही फक्त हा एकच जंतू माझ्या पोटी जन्मला आहे. मी आता वयस्कर होत आहे. मला सांगा, अशी कांहीं विधी आहे कां, जिच्या मुळें मला शंभर मुलं होतील? मला सांगा, जर अशी कांहीं विधी असेल तर तिची माहिती. मला सांगा ती किती मोठी आहे कां लहान आहे ते, तसेंच साध्य करणे सोपे आहे कां अवघड? म्हणजे त्या प्रमाणे मी व्यवस्था करीन".
राजाचा तो प्रश्न ऐकल्यावर पुरोहित बोलतो कीं, असा एक विधी आहे ज्याच्या मदतीने आपल्याला शंभर मुलं होऊ शकतील. त्या विधीची माहिती मी तुम्हाला सांगतो. ते ऐकल्यावर उत्तेजित झालेला राजा त्याला विचारतो, अहो ब्राह्मणा, तशा विधी करणे योग्य होईल कां? त्यामुळें मला शंभर पुत्र मिळतील कां"? मला सगळी विधी समजावून सांगा".
ते ऐकल्यावर त्याचा कुटूंबाचा पुरोहित सांगतो, "अहो मालक, मी एक विधी जाणतो तो अघोरी आहे पण खात्रीचा आहे. त्यात जो यज्ञ मी आरंभ करीन त्यात तुम्हाला तुमचा एकुलता एक पुत्र जंतूचा बळी चढवावा लागेल. त्याची अंगाची चरबी मी काढून त्या होमात घालीन त्याचा जो गंध पसरेल तो तुझ्या सगळ्या शंभर बायका हुंगतील. त्यामुळें त्यांना प्रत्येकीला एक असें उत्तम आणि गुणी पुत्र होतील व तुमची इच्छा पूर्ण होईल, त्यात जंतू पुन्हा जन्मेल. जंतू पुनः जन्मल्यावर त्याच्या पाठीवर एक सोनेरी मसा असेल त्यावरून तोच जंतू हे तुम्ही ओळखू शकाल.
अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील एकोणपन्नासावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग पन्नासावा

ते ऐकून सोमक त्याला बोलतो, "मला थोडा विचार करावा लागेल". त्यानंतर तो राजा सोमक इतर पंडितांना त्या विधीबद्दल विचारतो. त्यावेळी एक विद्वान कारभारी राजाला सांगतो, कोणताही विधी यशस्वी होणे अगत्याचे असते. त्यासाठी विधींचे कांहीं नियम असतात, ते तुम्हाला प्रथम सांगतो. कारण जर हा विधी अयशस्वी ठरला तर हा तुमचा एकुलता एक वारस सुद्धा मेलेला असेल व त्यामुळी तुम्ही मृत्यूनंतर पूत नरकात जाल. त्याशिवाय राज्याला वारस नसल्याने तुमचे राज्य सुद्धा बरबाद होऊ शकते. त्यासाठी प्रथम विधीच्या नित्य गरजा कोणत्या व त्यांची पूर्तता यथास्थित होत आहे कीं नाही ते पहाणे माझ्या मते अत्यावश्यक आहे". राजा सोमक त्याला विचारतो, "त्या नित्य गरजा कोणत्या ते सांगा". कारभारी द्रमुक त्यानंतर बोलतो, "अहो आमचे मालक, मी सांगतो त्या चार नित्य गरजा कोणत्या आहेत. पहिली गरज असते, यज्ञ करणार्या यजमानाची योग्यता. दुसरी असते, यज्ञ करणार्या पुरोहिताची योग्यता व तिसरी आहे, यज्ञ विधीसाठी वापरलेल्या सामुग्रीच्या तयारीची योग्यता व चौथी आहे कर्मकांडाच्या मंत्रांच्या वैधतेची. ह्यापैकी जरी एक कमी ठरली तर तो विधी संपन्न होत नाही, उलट विपर्यास होण्याची शक्यता असते. त्याचे कारण, त्या विधीची देवता नाराज होऊन यजमानाला व पुरोहिताला शाप देण्याची शक्यता असते". एवढे सांगिल्यावर तो पंडित पुढे सांगतो, "हा विधी जो तुम्ही करू इच्छित अहात तो अघोरी प्रकारातील असल्यामुळें तसा विधी करण्यासाठी आपण विशेष दक्षता बाळगली पाहिजे. प्रथम आपली योग्यता तपासून घ्या. त्यानंतर आपल्या कुटूंबाच्या पुरोहिताची योग्यता तपासून घ्या व शेवटी कर्मकांडाच्या सामुग्रीची योग्यता तपासून पहा. कर्मकांडातील मंत्रांची वैधता तपासणे अवघड असते, त्यासाठी तुम्हाला तुमच्या पिरोहिताच्या शब्दावर विसंबूनच रहावे लागते व जर सगळे योग्य आहे हे निश्चित झाले तरच आपण हा विधीयुक्त यज्ञ कराल तर बरे होईल". एवढे सांगितल्यानंतर तो पंडित कांहीं बोलण्याचा प्रयत्न करत असता थोडा अडखळतो व न बोलताच गप्प बसतो. राजासुद्धा त्याकडे विशेष लक्ष देत नाही.

त्याप्रमाणे सगळे यथायोग्य आहे असा निर्वाळा मिळाल्यानंतर सोमक राजा त्या विधीसाठी तयार होतो. तो आग्रहपूर्वक सांगतो कीं. त्याला तो यज्ञ करावयाचा आहे.
लोमस नंतर सांगतात, "त्यानंतर योग्य मुहूर्त पाहून त्या यज्ञाची सगळी तयारी केली जाते. त्यांत राजपुत्र जंतूचा बळी चढणार असतो. परंतु, त्या लहान बालकाच्या सगळ्या मातांना ते मंजूर नसते. त्या जंतूला कोठेतरी लपवून ठेवतात. त्यांचा आकांत कोणालाही ऐकवणार नाही असा होता. त्या राण्या यज्ञाच्या यशस्वीते बद्दल साशंक असतात. त्या ते राजाला परोपरीने सांगतात पण राजा त्याच्या निर्णयावर ठाम असतो. राजाज्ञे पुढे त्या राण्यांचे कांहीच चालत नाही. पुरोहित जंतूला शोधून काढतो व खेचत खेचत त्या रडणार्या बालकाचा यज्ञाच्या वेदीवर गळा चिरून बळी दिला जातो. सर्वत्र भीषण शांतता पसरते. परंतु, आश्चर्य वाटावे अशारितीने सोमकाच्या सगळ्या राण्या अचानकपणे बेहोष होऊन पडतात. त्यानंतर त्या सगळ्या पोटाशी झाल्याचे राजवैद्य जाहीत करतात. यथावकाश त्या सगळ्यांना प्रत्येकी एक पुत्र होतो. सोमकाचा आनंद गगनात मावेनासा होतो. त्यात मोठ्या राणीस जंतू होतो ते समजते कारण त्याच्या पाठीवर एक सोनेरी मसा उमटलेला असतो. जंतू पुनः आल्यामुळें त्या सगळ्या राण्याना कमालीचा आनंद होतो. त्या राण्या त्यांच्या स्वतःच्या मुलापेक्षा जास्त प्रेम त्या नव्याने आलेल्या जंतूवर करतात.
पुढे यथावकाश तो अघोरी साधना करणारा पुरोहित मरतो व त्याच प्रमाणे कांही काळांने राजा सोमक सुद्धा मरतो. मेलेल्या सोमकाला सगळे लोक दिसू लागतात. त्यात तो पहातो किं, त्याचा कुटूंबाचा पुरोहित नरकात आगीत भाजला जात आहे. सोमक त्याला ओरडून विचारतो, "अरे तू असा कां भाजला जात आहेस"? तो भाजला जात असलेला पुरोहित सांगतो, "हे माझे कर्म आहे, जे मी तुमच्यासाठी तो अघोरी यज्ञ केला त्याचे फळ मी भोगत आहे". ते ऐकल्यावर तो सत्त्वशिल राजा त्या देवांना आर्जव करतो कीं, अहो देवो, मला ती शिक्षा द्या कारण त्यांने माझ्या सांगण्यावरून तो यज्ञ केला होता.
यमराज त्याला उत्तर देतात, अरे सोमका, येथे ज्याच्या कर्माची फळ त्यालाच भोगावी लागतात. तुझ्या कर्माची फळ तू भोगणार आहेस. ती पहा, ते तो देव बोलत असतांना मध्येंच सोमक सांगतो कीं, "माझ्यामुळे हा जर असें भोगणार असेल तर मी त्याच्या बरोबर राहू इच्छितो स्वर्गात जाऊ इच्छित नाही". ते ऐकल्यावर यमदेव त्याला दरडावून

सांगतात, "अशीच तुझी इच्छा असेल तर पहा त्याचे भोग तुला कसे वाटतात. तू त्याच्या बरोबर तसेंच भोग भोगशिल व नंतर तुझ्या स्वर्गात जाशिल". लोमस पुढे सांगतात, ते दोघे त्यांच्या कर्माचे भोग भोगल्यानंतर त्यातून मोकळे होतात. सोमकाला त्या पुरोहिबद्दल फार प्रेम उत्पन्न झाले होते कारण त्यांने त्याची इच्छा पूर्ण केली व त्यासाठी मोठी शिक्षा भोगली. राजा त्याच्या पुण्याचा कांही भाग त्याला देतो व ते दोघे स्वर्गात जातात. अरे युधिष्ठीरा, हाच तो आश्रम जेथे ते त्या काळात होते. म्हणून ही जागा तीर्थक्षेत्र झाली आहे. जो येथे, एक दिवस भोगेंद्रीये संयमित करून राहतो त्याला मोठे पुण्य मिळते. म्हणून आपण सगळे येथे सहा दिवस राहू. असें लोमस सांगतात.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील पन्नासावा भाग संपला.

## तीर्थयात्रा पर्व

## भाग एकावन्नावा

लोमस पुढे सांगतात, आता मी ह्या तीर्थक्षेत्राबद्दल सांगतो, ह्या तीर्थक्षेत्री ब्रह्माने स्वतः एक यक्ष केला होता. त्या विधीला इष्टीकृता असें म्हणतात. तो यज्ञ एक हजार वर्षे चालू होता. नभगाचा मुलगा अम्विरश राजाने यमुना किनारी एक यज्ञ केला होता. त्यावेळी तो दहा हजार सोन्याची नाणी ब्राह्मणांना देतो. त्याचे व्रतस्थ जीवन, त्याची त्याग प्रवृत्ती, त्याचा कृपाशिल स्वभाव, अशा मुळें ते मोठ्या पदास गेला ते सगळे येथे घडले. ह्याच जागी पृथ्वीचा राजा नहुषाचा मुलगा, ययाति जो त्याच्या पवित्र जीवनाबद्दल ख्यातनाम होता, त्याने सुद्धा यज्ञ केले होते. ययातिने इंद्राला आव्हान दिले होते. हा यमुनेचा किनारा असा आहे, युधिष्ठीरा कीं, येथे अनेक महान लोकांनी त्यांचे यज्ञ केले आहेत. म्हणून ही जागा तिर्थक्षेत्र झाली आहे. हा पहा शमीचा वृक्ष, त्यावर फक्त एकच पान आहे. त्याच्या बाजूला हा पहा तलाव किती विलोभनीय आहे. त्याला परशुरामाचा तलाव असें म्हणतात. बाजूला नारायणाची कुटी आहे. ह्याच मार्गाने ऋचिकाच्या मुलांनी प्रवास केला होता. ज्या भागात त्यानें तपस्या केली त्याला रौप्य असे नांव आहे. त्यानंतर लोमस त्याला सांगतात, एक पिशाच्चिणीची गोष्ट. तिच्या अंगावर दगडाचे दागिने होते. ती एका ब्राह्मण बाईला सांगते, जेव्हां मी वंशावळी पहात होतो, युगंधरात दही खाल्यानंतर आणि अच्युतस्थळी राहिल्याने व भूतिलयात स्नान केल्याने तू तुझ्या मुलांबरोबर रहावेस. ह्याचा अर्थ येथे एक रात्र काढल्याने त्या रात्रीचा अनुभव दुसर्या रात्रीपेक्षा वेगळा येतो. म्हणून आपण येथे आजची रात्र रहावयाचे आहे. येथून कुरु प्रदेशाची सुरुवात होते. ह्याच जागी नहुषाच्या मुलांने ययातिने यज्ञ केले होते व भरपूर दानं ब्राह्मणांना वाटली होती. यमुना नदीत आंघोळ करण्यासाठी ही जागा सर्वोत्तम समजली जाते. ह्या तीर्थक्षेत्राला **प्लक्षावतरण** असें म्हणतात. शहाणे लोक ह्या जागेला स्वर्गाचे द्वार असें समजतात. येथे सारस्वत पद्धतीने पुजा विधी करावयाचा असतो. येथे कुटण्यासाठी यज्ञाच्या काठीचा उपयोग कारावा लागतो. यज्ञ झाल्यावरचे स्नान येथे करावे. भरत राजानेसुद्धा येथे यज्ञ केले होते. त्यांने घोडा येथे मोकळा सोडला होता. जो घोडा खरेतर यज्ञात बळी द्यावयाचा होता. म्हणून

त्यानंतर यज्ञात बळी देण्याचे प्राणी न मारता पृथ्वीला अर्पण करण्याची रित पुढे आली. त्यांने सोडलेले घोडे काळ्या आणि ठिपकेदार रंगाचे होते. ह्याच जागी संव्रत्ताने वाचवलेला मरुत्त जो एक महान संत होता त्याने अनेक यज्ञ येथेच केले होते. म्हणून येथे स्नान करणे पुण्यकारक समजले जाते. सगळ्या पापांचा नाश येथे होतो.
वैशंपायन पुढे सांगतात, ते सगळे विवेचन ऐकल्यावर ते सगळे यात्री तेथे आंघोळ करतात. त्या वेळी ते संत त्याच्या स्तुतीची गाणी गात होते. आघोळ केल्यानंतर युधिष्ठीर लोमसाला सांगतो, त्याला सगळे श्रेष्ठ संत दिसत आहेत, मला माझा अर्जुनसुद्धा दिसत आहे.
ते ऐकल्यावर ऋषी लोमस त्याला बोलतात, "जर तुला तसे दिसते तर मोठ्या संताना सगळेच दिसते त्यात नवल ते काय"? ती सरस्वती नदी पहा. तिच्यात लोकांनी गर्दी केली आहे कारण ती त्यांचा एकमेव आधार आहे. त्या सरस्वती नदीत स्नान केल्याने तुझे सगळे पाप धुतले जाईल. येथे येणारे सगळे संत स्नान केल्याशिवाय जात नाहीत. सारस्वती पद्धतीचा पुजा विधी करावा लागतो. येथे जी वेदी आहे ती साश्रात ब्रह्माने उभारली आहे. ती सर्व बाजूनी पांच योजने अशा आकाराची आहे. ह्या जागी तुझे पूर्वज जे त्यांच्या कृपाळूपणासाठी नावाजलेले होते ते यज्ञ करत असतं.
अशारिताने तीर्थयात्रा पर्वातील एकावन्नावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग बावन्नावा

लोमस पुढे सांगतात, अरे पांडवांनो जर एकादा मर्त्य येथे अखेरचा श्वास घेतो तर तो स्वर्गात जातो अशी ख्याति आहे ह्या क्षेत्राची. हजारो भाविक येथे अखेरचा श्वास घेण्यासाठी येत असतात. त्या प्रकारचा आशिर्वाद साक्षात दक्ष प्रजापतिने दिला आहे असे समजले जाते. असें समजते कीं, जेव्हां तो येथे यज्ञ करत होता तेव्हां त्याने असें सांगितले होते व त्याप्रमाणे ती परंपरा चालू आहे. त्या तेथे एक प्रेक्षणीय नदी आहे जिचे नांव सरस्वती असें आहे. ह्या ठिकाणी एक जागा आहे जिचे नांव आहे, **विनाशना**. तेथे सरस्वती नदी भूमीत शिरली आहे. त्या जागी निशाद राज्याचे प्रवेशद्वार आहे. ह्या निशादांच्या बद्दल असलेल्या आकसापोटी सरस्वती भूमीत शिरली अशी समजूत आहे. येथे एक तीर्थक्षेत्र आहे त्याचे नांव आहे, **चमशोधभेदा**. ह्या जागी सरस्वती पुनः दृष्टीत येत असते. तेथे ती दुसर्या दोन पवित्र नद्यांना मिळून मग त्यांचे पाणी एकत्रितपणे पुढे समुद्राकडे जात असते. येथे एक ठिकाण आहे जेथे लोपामुद्रा अगस्त्याला मिळते. त्या तीर्थक्षेत्राचे नाव आहे **सिंधू**. येथे आणखीन एक तीर्थक्षेत्र आहे त्याला येथे **प्रभास** म्हणून ओळखतात. जेथे इंद्र येत असतो. येथे पापनाश होतो असें समजले जाते. त्या तेथे पलिकडे, विष्णूपादाचा देश आहे. त्या तेथे नावाजलेली नदी आहे, **विपाशा**. ह्या नदीत वसिष्ठ ऋषींनी त्यांच्या मुलांच्या नाशामुळे व्यथित होऊन आत्मघात करण्याचा प्रयत्न केला होता. तुम्ही सगळे पांडव ते पहा **कासमीरा**, तेथे साधू संत तीर्थयात्रा करण्यासाठी नेहमी येत असतात. येथे ही पहा ती जागा जेथे अग्नी व ऋषी काश्यप भेटले होते. येथेच नहुषाचा मुलगा व उत्तरेकडील योगी भेटले होते. त्या पलिकडे मानस सरोवराकडे जाणारा रस्ता सुरू होतो. तो मोठमोठ्या पर्वतराजींतून जातो. त्यात वाट करण्यासाठी रामाने ते पर्वत फोडले होते. त्या तेथे पहा वाटीखंड प्रदेश सुरु होतो. त्या जवळ उत्तरेकडे विदेह आहे. प्रत्येक युगाचा अंत होण्याच्या वेळी एक गोष्ट येथे होत असते, महादेव त्याच्या विविध रुपात उमा बरोबर येथे दिसतो, त्याच्या बरोबर त्याचे सगळे गणसुद्धा त्यावेळी असतात. त्या पलिकडे एक तलाव आहे, तेथे आपल्या कुटूंबाच्या भल्यासाठी लोक पुजा

करतात. पिनाकधारी महादेवाची ती पुजा असते. ती चैत्र महिन्यात होते. ज्यांच्या वासना काबूत आहेत अशा भाविकांनी जर येथे अर्घ्य वाहिले तर तो उत्तम लोकात जातो. त्या तिथे एक तीर्थक्षेत्र आहे, **उज्जनक** नांवाचे, तेथे ऋषी वसिष्ठ त्याची पत्नी अरुंधती व त्याच प्रमाणे, यवक्री ह्यांना मोक्ष प्राप्त झाला. त्या पलिकडे **कौसव** नांवाचा पवित्र तलाव आहे. त्या ठिकाणी रुक्मिणीचा आश्रम आहे. त्या आश्रमात ती तिची क्रोध ही वासना जिंकल्यावर शांतपणे ध्यान करत बसली होती. अहो पांडवानो आपण कधी त्याचे नाव ऐकले असेल, भृगुतुंग जो त्याच्या ध्यान साधने करता नावाजलेला होता. पुढे एक उंच शिखर आहे. त्या पलिकडे वितस्ता आहे. त्या झर्यात आंघोळ करण्याने पापनाश होतो. त्याचे पाणी फार थंड आणि नितळ असते. त्याचा उपयोग तपस्वी पिण्यासाठी करतात.
त्या पहा दोन नद्या जला व उपजला. त्या यमुनेच्या दोन बाजूंनी वहात आहेत. त्यांच्या तटावर यज्ञ करून राजा उशिनराने इंद्राला हरवले होते. इंद्र उशिनराची परिक्षा पहाण्यासाठी व त्याच्यावर कृपा करण्यासाठी इंद्र आणि अग्नी त्या यज्ञाला हजर झाले होते. इंद्राने घारीचे रुप घेतले होते आणि अग्नीने कबुतराचे, घारीला घाबरल्याचे दाखवत अग्नी कबुतराच्या रुपात उशिनराच्या मांडीवर बसला व संरक्षण मागू लागला.
अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील बावन्नावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग त्रेपन्नावा

घार राजाला बोलते, "सगळ्या पृथ्वीतील राजे तुला पुण्यवान राजा म्हणून मानतात. असें असतांना तू असें कृत्य करत आहेस जे नितीशस्त्राच्या विरुद्ध आहे. मी फार भुकेला आहे, मला ते कबुतर खावयाचा अधिकार देवांनी दिला आहे. त्याला माझ्या पासून संरक्षण देऊन तू देवांचा नियम मोडत आहेस". त्यावर राजा उशिनर त्याला सांगतो, "हा माझ्याकडे जीवाच्या भितीने संरक्षण मागत आहे व एक राजा म्हणून ते देणे माझे कर्तव्य आहे. म्हणून तू त्याचा त्याग करून मला मदत केली पाहिजेस हे जास्त योग्य नाहीं कां"? "त्याला एक राजा म्हणून संरक्षण देण्यास मी बांधलेला आहे". घार बोलते, "जगण्यासाठी खाणे हे प्रत्येकाचे कार्य आहे. त्यासाठी कांहीं प्राणी खाण्यासाठी सांगितले आहेत ते खाणे आवश्यक असते ते तुला माहित नाहीं कां? जर मला माझे खाणे नाही मिळाले तर मी मरून जाईन व त्याचे पातक तुला लागेल हे लक्षात घे". मी मेलो कां माझे कुटूंब मरेल त्याचे तुला पातक लागेल केवळ ह्या एका कबुतराला संरक्षण दिल्यामुळें, जर दोन चांगल्या गोष्टी एकमेकांना भेदत असतील तर त्या दोनही चांगल्या रहात नाहीत". ते घारीचे ऐकल्यावर राजा तिला सांगतो, तुझे बोलणे प्रथम दर्शनी योग्य वाटत असले तरी तू सुपर्ण आहेस असें मला वाटते. अशारितीने राजा त्यांना ओळखतो. कोणाला मदत करणे चांगल्या कामासाठी हा पुण्याचा मार्ग आहे हे तुला मी सांगावयाची गरज नाही. मी तुला दुसरे कांहीं खाणे जे तुझ्या लायकीचे आहे ते देण्यास तयार आहे पण ह्या कबुतराला संरक्षण देणे मी थांबवणार नाही". ते ऐकल्यावर घार सांगते, "मला दुसरे कोणतेही खाद्य नको आहे. तू ते कबुतर सोड कारण तेंच माझे आजचे खाद्य आहे. कबुतर खाणे हे आमचे ठरलेले खाणे आहे". ते ऐकल्यावर राजा उशिनर त्याला सांगतो, "मी माझ्या राज्यातील उत्तम भाग तुला देतो पण ह्या कबुतराचा नाद सोड". कारण ते माझ्या संरक्षणात आले आहे व ते मी एक राजा म्हणून देत रहाणार आहे". ते ऐकल्यावर घार बोलते, "जर तुला त्या कबुतराबद्दल एवढे प्रेम वाटत असेल तर तू मला तुझ्या अंगाचा तेवढा भाग खाण्यासाठी दे". राजा त्यासाठी तयार होतो. असें सांगून पुढे लोमस सांगतात, उशिनर

त्याच्या अंगाचा त्या कबुतरा इतका भाग कापून घारीला देतो. परंतु. जेव्हां वजन केले तेव्हां कबुतर जास्त वजनाचे ठरले, म्हणून त्यांने आणखीन थोडा भाग कापला. तरी पुन्हा तसेंच झाले. असें करत त्याचे सगळे शरीर देऊन झाले तरी त्याचे वजन कबुतरा एवढे होईना. तेव्हां इंद्र घारीचे रुप सोडून त्याच्या खर्या रुपात उभा रहातो व अग्नी देव कबुतराचे रुप सोडून उभा रहातो. तू आमच्या परिक्षेत उतरला आहेस. तुझा लौकीक सर्वदूर पसरेल अशा आशिर्वाद तो देतो. म्हणून ह्या तीर्थक्षेत्री मोठे ऋषी येत असतात.

असारितीने तीर्थयात्रा पर्वातील त्रेपन्नावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग चौपन्नावा

लोमस बोलतात, यात्रा स्थानांची माहिती देतांना ऋषी श्वेतकेतूच्या आश्रमाकडे पोहोचतात. श्वेतकेतू ऋषी उद्दलकाचा मुलगा होता. श्वेतकेतूची सार्या जगात ख्याती आहे, त्याच्या मंत्रविद्येतील प्रावीण्यासाठी हे तुम्ही सगळे जाणता अहातच. त्या आश्रमाभोवती नारळीच्या झाडांचे बन आहे. ह्या ठिकाणी त्याला सरस्वती देवीनें मानव स्वरुपात दर्शन दिले होते. त्या समयी तो त्याच्याशी बोलला आहे. तो बोलला, "अहो देवी, मला वाकसिद्धी प्राप्त हो". श्वेतकेतू व कहोडाचा मुलगा अष्टवक्र हे काका आणि पुतणे होते. ते दोघेही पवित्र ऋचांचे चांगले जाणकार होते. असें ते दोघे ब्राह्मण काका, पुतणे एकदा जनक राजाकडे यज्ञात पौरोहित्य करण्यासाठी गेले. तेथे दुसर्या विद्वान ब्राह्मणास, ज्याचे नांव होते, वंदीन, वादांत हरवले. त्यावेळी अष्टवक्र एक लहान मुलगा होता. वादात वंदीनला हरवल्यामुळें वंदीनला नदीत बुडून मरण्याची शिक्षा दिली गेली होती, त्या काळातील पद्धतीनुसार. ते ऐकून युधिष्टीर विचारतो, "अहो ब्राह्मणा, मला अष्टवक्राबद्दल आणखीन ऐकण्याची इच्छा आहे तरी ते सगळे सांगावे. त्याने वंदीनला कसे हरवले, त्याला असें नांव कां दिले होते इत्यादी सगळे सांगा. तो जन्मताच शरीराने आठ जागी कां विकृत होता"?

ऋषी लोमस सांगतात, उद्दलकाला एक शिष्य होता. त्याचे नांव होते कहोड. त्या कहोडाचे इंद्रीय संयमन उत्तम होते. कहोड सर्व काळ आपल्या गुरूच्या सेवेत असें. बाकीचा समय तो वेदाच्या अभ्यासात व्यतीत करत असे. कहोडाची सेवावृत्ती पाहून संतुष्ट झालेला गुरू त्याला त्याची मुलगी सुजाता लग्नात दान करतो. त्याला सगळी शास्त्र शिकवून त्यात त्याला प्रवीण केले. यथावकाश सुजाताला दिवस जातात. ती गर्भवती असतांना एकदा कहोड वेदाचे वाचन करत असतात, सुजातच्या गर्भातील जीव बोलतो किं, "बाबा, आपण जे वेदाचे वाचन करत अहात त्यात माझ्यामते कांहीं चुका तुम्ही करत अहात. मी असें सांगू शकतो कारण ह्या गर्भातच मी तुमच्या कडून सगळी शास्त्रं शिकलो आहे". अशारितीने तो गर्भ कहोडाच्या तेथे बसलेल्या शिष्यांच्या समक्ष सांगतो व म्हणून कहोडाला त्या गर्भातील जीवाचा राग येतो व त्या भरात तो त्या जीवाला शाप देतो कि,

"तू अशारितीने गर्भातच माझा अपमान करत आहेस म्हणून मी तुला शाप देतो की, तू आठ जागी विकलांग होशिल. त्या शापामुळें तो जन्मतो तेंच आठ जागी विकलांग होता. म्हणून त्याचे नांव अष्टवक्र असें पडले. त्याचा एक काका असतो, उद्दकलाचा मुलगा, श्वेतकेतू. श्वेतकेतू साधारणपणे अष्टवक्राच्याच एवढा होता. आपला मुलगा बापाच्या शापामुळें अशा विकलांग झाला आहे त्याची तिला खंत होती. ती एकदा तिच्या पतिस खाजगीत बोलते कीं, "आपण अशा मुलाबरोबर रहावयाचे तर आपल्याकडे धन असले पाहिजे, त्याकरता कांहीं करावयाचा विचार करावा". ते ऐकल्यावर कहोड ठरवतो कीं, त्याने राजा जनकच्या पदरी चाकरी करावी. तेथे तो जनक राजाला त्या प्रकारे विनंती करतो तेव्हां त्याच्या ज्ञानाची परीक्षा घेतली गेली व त्यात वंदीन त्याला हरवतो व त्यामुळें कहोडला जनक राजाकडे काम मिळत नाही. उलट वादांत हरला म्हणून त्याला त्याकाळातील पद्धतीनुसार नदीत बुडून मरावे लागते. हि सगळी बाब अष्टवक्राला न सांगण्याचे उद्दलक त्याच्या मुलीस बजावून ठेवतो. त्या प्रमाणे ते अष्टवक्राला सांगितले जात नाही. जेव्हां अष्टवक्र जन्मतो त्याला ते सांगितले जात नाही कीं त्याच्या बापाला कसा मृत्यू आला. त्यामुळें अष्टवक्र उद्दकलालाच त्याचा बाप समजून वागत असतो. तसेंच श्वेतकेतूला भाऊ समजत असतो. एकदा अष्टवक्र उद्दकलाच्या मांडीवर बसलेला होता व त्याचा काका जो थोडाच त्याच्या पेक्षा वयाने मोठा होता तो येतो. अष्टवक्राला आपल्या पित्याच्या मांडीवर बसलेला पाहून तो रागावतो व त्याला खेचून खाली टाकतो. त्यामुळें अष्टवक्र रडू लागतो. नंतर तो त्याच्या आईकडे जातो व माझा तात कोठे आहे ते सांग म्हणून विचारू लागतो. त्यामुळें सुजाता त्याला त्याच्या वडलांशी जनकाच्या दरबारात काय झाले ते सांगते. त्यानंतर तो एकदा त्याच्या काकाबरोबर जनकाच्या दरबारात जातो. परंतु, त्याला बाहेरच थांबवले जाते. तेव्हा अष्टवक्र जनक राजाला बोलतो ते असें.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील चौपन्नावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग पंचावन्नावा

अष्टवक्र राजाला बोलतो, जेव्हां आंधळ्याच्या, बहिर्याच्या, बाईच्या, हमालाच्या अथवा राजाच्या रस्त्यावर भेटतात तेव्हां कांहींच मिळालेले नसते. परंतु, जेव्हां ब्राह्मणाच्या वाटेवर मिळतात तेव्हां त्यात कांहीं मिळत असते. म्हणून अहो राजा, आम्हाला यज्ञ विधी व तो करणारे वंदीन ह्यांना भेटावयाचे आहे. ते ऐकल्यावर जनक राजा त्यांना यज्ञाच्या जागी जाण्याची खास परवानगी देतो. त्याला वंदीनला भेटावयाचे होते. अष्टवक्र बोलतो, "अग्नी कितीही लहान असला तरी त्याचा अपमान करू नये कारण तो केव्हांही सगळे भस्मसात करू शकतो. इंद्रसुद्धा ब्राह्मणांना घाबरतो". अष्टवक्र पुढे बोलतो, आम्हाला हा यज्ञविधी पहावयाचा आहे म्हणून आलो आहोत. आम्ही येथे पाहुणे म्हणून आलो आहोत. त्यासाठी आम्हाला आपल्या परवानगीची गरज आहे. अहो इंद्रद्युम्नचे पुत्र आम्ही राजा जनकाला भेटण्यासाठी आलो आहोत. परंतु, तुमचा पहारेकरी आम्हाला आत जाऊ देत नाही. त्यामुळें आमचा क्रोध होत आहे. त्यावर तो अधिकारी बोलतो, येथे फक्त मोठ्या माणसांना प्रवेश मिळतो. त्यावर अष्टवक्र सांगतो, माणसाचे मोठेपण वयावर नसते. ते त्याच्या ज्ञानावर असते. तुम्ही प्रवेश देण्यासाठी ज्ञानाची परीक्षा घ्या म्हणजे समजेल आम्ही किती मोठे आहोत. आम्ही वेदाचा अभ्यास केला आहे, आमच्या वासना संयमित आहेत. आमचे प्रभूत्व आहे शास्त्रांवर. असें आम्ही वयाने लहान असलो तरी ज्ञानाने मोठे आहोत म्हणून आम्हाला प्रवेश मिळाला पाहिजे. असे ज्ञानी जरी वयाने लहान असले तरी त्यांचा योग्य मान ठेवला गेला पाहिजे. ते ऐकल्यावर तो पहारेकरी अष्टवक्राला बोलतो, तुला माहित असलेले एक वेदातील वचन गाऊन दाखव.

त्यावर तो एक गाऊन दाखवतो त्याचा अर्थ असा, "एक शब्द असला तरी त्याचे अनेक अर्थ असू शकतात, ज्ञानी इतरांपेक्षा वेगळे असतात. खरे ज्ञानीपण माणसाच्या आकारावर अवलंबून नसते तर त्याच्या बुद्धीच्या प्रगल्भतेवर असते. जसें शाल वृक्षाच्या झाडावरील गाठी वरून त्याचे वय सांगता येत नाही. झाड वाढलेले आहे असे तेव्हांच मानतात, जेव्हां

ते फळे देते. लहान मुलं मोठ्यांकडून शिकतात व नंतर तेसुद्धा मोठे होतात. ज्ञानाचा व वयाचा कांहीं संबंध नसतो".

असें ते वचन गाऊन दाखवतो. ते ऐकल्यावर तो पहारेकरी बोलतो, अरे वा, तू तर मोठ्यां सारखा बोलतो आहेस. त्यावर अष्टवक्र त्याला सांगतो, माणसाचे डोक्याचे केस पांढरे झाले म्हणजे तो मोठा झाला असें वेद मानत नाहीत. ज्ञानाच्या प्रगल्भतेवरच वेद एकाद्याचे वय ठरवत असतात. ऋषींनीसुद्धा तसेंच सांगितले आहे किं, माणसाचे ज्ञान हेच त्याच्या वडिलकीची खरी ओळख असते. आम्हाला तोंच वडील जो ज्ञानी आहे. त्याला त्याच्या काकाबरोबर यज्ञमंडपात प्रवेश मिळतो. अष्टवक्र अपंग असल्याने त्याला चालता येत नसते म्हणून त्याचा काका श्वेतकेतू त्याला खाद्यावर घेऊन आत जातो. तेथे दरबारी पंडीत वंदीन बसले होते. अष्टवक्र तेथील सेवकाला सांगतो, "मला वंदीनला भेटावयाचे आहे. नंतर तो त्या सेवकाला सांगतो राजा जनकाला सांगा मी अष्टवक्र आला आहे व मला वंदीन बरोबर तत्त्व चर्चा करावयाची आहे. त्या वंदीनला मी हरवू इच्छित आहे. जेव्हां सगळे त्याच्या कडून हरले आहेत त्यानंतर मी त्यांच्याशी वाद घालणार आहे". ते ऐकून तो सेवक त्याला बोलतो, "अरे मुलां कशाला ह्यात पडतोस? मोठे मोठे पंडीत त्याच्या पुढे हरले आहेत तू काय त्याच्या पुढे टिकाव धरणार"? तू एक दहा वर्षाचा मुलगा आहेस, भले तुझा आत्मविश्वास भारी आहे पण मला वाटते, तू उगाचच मरशिल ह्यात पडून कारण, वंदीन हरणार्याला पाण्यात बुडवून ठार मारतो. जर तुझा फारच आग्रह असेल तर बघतो काय करता येते ते. त्यानंतर राजापुढे त्याला आणतात. राजाला अष्टवक्र सांगतो, "अहो जनकाच्या वंशातील आपण सर्व शक्तिमान अहात. ययाति यज्ञ करण्यासाठी नावाजलेला होता. हल्लीच्या काळात आपण त्या योग्यतेचे अहात मी असे ऐकतो कीं, आपल्या येथे कोणीतरी वंदीन नावाचा पंडीत आहे. तो म्हणे वादात हरणार्यांना पाण्यात बुडवून मारतो. त्यासाठी त्याचे इमानदार नोकर ते पाप करत असतात. हे खरे आहे कां? ते ऐकले म्हणून मी आलो आहे, परमेश्वराच्या शाश्वतते बद्दल त्याच्याशी मला वाद करावयाचा आहे. तो वंदीन कोठे आहे"? मला सांगा म्हणजे मी त्याला भेटतो. त्याला मी नष्ट करण्यासाठी आलो आहे. जसें सूर्य त्याच्या तेजांने इतर तारकांना झाकून टाकतो. ते ऐकून राजा त्याला म्हणतो, "तुला खात्री आहे कीं, तू त्याला वादात हरवू शकशिल"? तुला अजून त्याच्या

तर्क चातुर्याचा अंदाज नाही. सगळे ब्राह्मण त्याला वचकून असतात व तू त्याला आव्हान देत आहेस, पूर्ण विचार करून ये". ह्या आधी सुद्धा अनेक ब्राह्मणांनी असे प्रयत्न केले आहेत परंतु, त्याना त्यांचा जीव गमवावा लागला आहे. कांहीं पंडीत केवळ त्याला पाहूनच वाद व घालता परत फिरतात. अष्टवक्र बोलतो, वंदीन माझ्या सारख्या पंडीताला भेटलेला नाही. म्हणून तो आजवर जीवंत आहे. पण आता तसे होणार नाही. आज तो मरणार आहे. जसे रस्त्यावरून जाणार्या गाडीच्या चाका खाली मांजर कसे मरते तसा हा मरणार आहे". राजा शांतपणे पुन्हा सांगतो, आमच्या मते वंदीन हा एकच खरा विद्वान आहे. त्याची बरोबरी कोणी करू शकेल असें वाटत नाही. तोंच एक असा माणूस आहे, ज्याला माहित आहे किं, ज्यास तीस भाग आहेत, त्यांचे बारा तुकडे आहेत, त्यांचे चोविस सांधे आहेत, असें चाक ज्याला तिनशे साठ आंस आहेत. त्यावर अष्टवक्र बोलतो, असें चक्र असते ज्याला चोवीस सांधे असतात, सहा भाग असतात, बारा परिघाचे भाग असतात, साठ आंस त्या चक्राला असतात. ते ऐकून राजा विचारतो, "देवांपैकी कोणता देव त्या चाकाचे काम पहातो"? ते कोणते देव जे घोड्या सारखे ते चाक खेचतात"? त्यावर अष्टवक्र सांगतो, ते देव जे तुमच्या घरात असतात. ते चाक काळाचे आहे. त्याचे मोजमाप सौर अथवा चंद्र मांसानुसार होत असते. वर्षाचे मोजमाप नक्षत्रांच्या फिरण्यावरून ठरवले जाते. पुढे तो सांगतो, जर कोणी पराक्रम केला त्यातील योग्य प्रसंगी तर ते कालचक्र त्याला संरक्षण देते. तुझ्या शत्रूच्या घरात गोंधळ किंवा मृत्यू होत असतो. वार्याचा रथ घेऊन तो येतो. त्यांना घेरतो व ते त्याला उत्पन्न करतात.

ते ऐकल्यावर राजा त्याला विचारतो, "असें काय आहे जे कधी झोपताना सुद्धा डोळे मिटत नाही"? अष्टवक्र सांगतो मासा हे त्याचे उत्तर आहे. राजा विचारतो, असे काय आहे जे जन्मल्यावर हलत नाही. अष्टवक्र सांगतो, अंडे.

राजा विचारतो, असें काय आहे जे वहात असतांना मोठे होते"? अष्टवक्र सांगतो नदी. राजा विचारतो, असें काय आहे ज्याला हृदय नसते"? अष्टवक्र सांगतो दगड.

अशा प्रकारची त्याची चाचणी राजा घेतो वंदीनाकडे त्या मुलाला पाठवण्या आधी राजा स्वतः त्याची चाचणी घेणे आवश्यक समजतो. राजा अष्टवक्राला बोलतो किं, "तुझी बुद्धी

असमान्य आहे. तुझा हजर जबाबीपणा वाखाणण्या सारखा आहे. म्हणून मी तुझी वंदीनची ओळख करून देतो.
अशारितीने तिर्थयात्रा पर्वातील पंचावन्नावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग छप्पन्नावा

अष्टवक्र त्यावर बोलतो, "अहो राजन, आपण सैन्याचे नायक असता. येथे सारे रथीमहारथी आपल्या राजसभेत आहेत त्यातील वंदीन कोण ते मी समजू शकत नाही. जो वांद करण्यात प्रवीण आहे. जसें पारधी अवाढव्य सरोवरात एक हंसपक्षी धुंडत असतो तसे हे होत आहे". त्यानंतर जसें अष्टवक्राला वंदीन सापडत नाही, तो मोठ्याने ओरडून वंदीनला उद्देशून बोलतो, "अरे वादी, तू स्वतःला फार मोठा पंडीत समजतोस तर माझ्यापुढे ये, मला तुझ्याशी वाद घालावयाचा आहे व त्यात तुला हरवावयाचे आहे. तर तू जेथे बसला असशिल तेथून मला बोलाव. जेव्हां तू माझ्याशी वाद करण्यासाठी येशिल तेव्हां तुझी सगळी हिम्मत नष्ट झालेली असेल. तुझा सगळा रुबाब संपलेला असेल. मी एक असा अग्नी आहे ज्याच्यापुढे कांहींही टिकत नाही. तू एका झोपलेल्या वाघाला डिवचलेले आहेस, त्याची शिक्षा आता तुला भोगावी लागणार आहे. तू एका अशा विषारी नागाच्या शेपटावर पाय ठेवला आहेस किं, तू त्याच्या दंशापासून स्वतःला वाचवू शकणार नाहीस. तो नासमज आपल्या शक्तीच्या खोट्या आत्मविश्वासाने मोठ्या पहाडाला ठोसा मारतो त्याच्या हाताचे तुकडे होतात, तसे तुझे होणार आहे. परंतु, त्या पहाडाला कांहींच झालेले नसते. तसे तुझ्या बाबत होणार आहे". त्यानंतर अष्टवक्र राजाकडे पाहून बोलतो, "वासरे बैलापेक्षा लहान असतात, तसें सगळे राजे ह्या जगातील मिथीलेच्या राजापेक्षा कनिष्ठ असतात, जसें इंद्र सगळ्या देवात श्रेष्ठ आहे व गंगा सर्व नद्यात महान आहे अशा आपण मिथीलेचे नरेश कृपया त्या वंदीन नामक वादीला माझ्यापुढे येण्याची आज्ञा करावी".

लोमस पुढे सांगतात, अरे युधिष्ठीरा, अष्टवक्र खूप संतापलेला होता. तो ओरडून सांगतो, "अरे वंदीन, मी तुला प्रश्न विचारतो त्याचे उत्तर तू द्यावयाचे व मग तू मला प्रश्न विचार व मी त्याला उत्तर देईन, अशा प्रकारे आपण एकमेकाच्या तर्क आणि बुद्धीची चाचपणी करून वाद घडवू. चल पुढे ये, माझ्याकडे व्यर्थ वेळ नाही, म्हणून असा लपून बसू नकोस". ते ऐकल्यावर वंदीन ते आव्हान स्वीकारतो. ते भर दरबारात दिलेले आव्हान होते. वंदीन

अष्टवक्राला बोलतो, "एकच असा अग्नी आहे ज्याच्या ज्वाळा सर्वकडे फाकतात, एकच सूर्य आहे जो सगळ्या जगाला उजळवून काढतो, एकच इंद्र आहे जो स्वर्गाचा अधिपती आहे. जो सगळे शत्रू संपवतो आणि एकच यम आहे, जो पितरांचा स्वामी आहे". अशारितीने जगातील एकमेव ज्या आहेत त्या वंदीन ने सांगितल्या, त्यावर अष्टवक्राने जगातील जोड्या सांगण्यास सुरुवात केली ती अशी, जगात असे दोन मित्र आहेत जसें इंद्र आणि अग्नी, ते सदैव एकत्र फिरत असतात. जगात असें दोनच ऋषी  आहेत, जसें नारद व पर्वत ते एकत्र असतात, जगात दोनच असें देव आहेत जे एकत्र असतात, ते आहेत आश्विनीकुमार. जगात अशी एकच माणलाची जोडी आहे जशी नवरा व बायकोची जोडी असते. असें सांगून अष्टवक्राने जगातील मुख्य जोड्या सांगितल्या.

त्यानंतर वंदीनची पाळी येते तिळ्यांची. वंदीन सांगतो, वेद तीन आहेत, (ऋग्वेद, अथर्ववेद, सामवेद असं ते आहेत यजुर्वेदाची त्यात उल्लेख नाही) त्यांच्या मदतीने वाजपेय यज्ञ केला जातो. यज्ञ सुरू करतांना अधवर्यू तीन वेळा यज्ञाचे विधी करतात. दिव्य प्रकाशसुद्धा तीनच असतात.

त्यानंतर अष्टवक्राची पाळी येते चारांच्या गटांची, तो सांगतो, चार आश्रम आहेत. चार वर्णाचे चार यज्ञ विधी आहेत. चार दिशांचे बिंदू आहेत आणि गायीला चार पाय आहेत.

वंदीन सांगतो पांचांची, अग्नी पांच प्रकारचे आहेत, वेदांत अप्सरांसाठी पांच बंधने सांगितली आहेत, पांच पवित्र नद्या सांगितल्या आहेत.

आता अष्टवक्राची पाळी सहाच्या गटाबद्दल सांगण्याची येते. तो सांगतो, पवित्र अग्नी सुरु करण्यासाठी सहा गायी दान कराव्या लागतात. वर्षाचे सहा ऋतु असतात, माणसाच्या जाणीवा असतात सहा, कृत्तिका नक्षत्राचे सहा तारका आहेत. वेदांत सहा सद्यस्क यज्ञ सांगितले आहेत. माणसाचे सहा शत्रू आहेत (काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर),

आता वंदीन बोलतो, साताच्या गटांची माहिती, सात प्रकारचे पाळीव प्राणी असतात, सात हिंस्त्र प्राणी असतात, संगीतातले सप्तसूर असतात, सप्तर्षी आहेत. सात प्रकारे श्राद्ध करतात व सात तारा असतात विणा वाद्यात.

आता पाळी आली अष्टवक्राची, तो आठाच्या गटांचे सांगतो, शंभर घड्या असलेल्या आठ विशव्या असतात. सिंहाला खाणार्या सरभाला आठ पाय असतात. आठ वसु आहेत. घन ठोकळ्याल आठ कोन असतात.
वंदीनाची पाळी आली. तो नऊच्या गटांची माहिती सांगतो, नऊ मंत्र आहेत पितरांसाठी अग्नी चेतवतांना बोलावयाचे. विश्वाच्या निर्मितीत नऊ घटक असतात. वृहती छंदात नऊ मात्रा असतात. नऊ हा अंकगणितातील मोठी संख्या आहे. त्यानंतर शून्य येतो.
अष्टवक्र दहांची सांगतो, दिशा दहा असतात. शंभराच्या दहापटीने हजार होतात. बायकांच्या गर्भावस्थेचे दहा महिने असतात. दहा गुरू सांगितलेले आहेत, दहा विरोधक असतात व दहा समर्थक असतात.
वंदीन सांगतो अकराचे गट, अकरा भोग सांगितले आहेत, यज्ञातील युप अकरा असतात, जीवाच्या विकासात अकरा पायर्या सांगितलेल्या आहेत. अकरा रुद्र आहेत.
अष्टवक्र बाराचे सांगतो, बारा महिने असतात एका वर्षात, जगती छंदात बारा मात्रा असतात. बारा आदित्य आहेत व बारा गौण यज्ञ आहेत.
वंदीनची पाळी आली, तेरावा महिना असतो ज्याला अधिक मास म्हणतात. तेरा बेटे आहेत पृथ्वीवर, तेवढे सांगून वंदीन थांबतो. लोमस सांगतात. तो थाबल्या नंतर अष्टवक्र त्याच्या पुढील अर्धा भाग सांगतो. केसीने तेरा यज्ञ करण्यास सांगितले आहे. अतिछंदात तेरा मात्रा असतात. ज्याचा उपयोग वेदांत होतो. सगळे पहात होते कीं, अष्टवक्र बोलत होता व वंदीन जो सुताचा मुलगा होता तेथे खाली मान घालून गप्प उभा होता. ते पाहून सगळ्या सभागृहात एकच जल्लोश झाला व अष्टवक्राच्या कौतुकाच्या चर्चा तेथे सुरू झाल्या. त्यावेळी यज्ञाचे काम सुरू होते. ते होत असतांना अष्टवक्र सगळ्याना सागतो, "हा माणूस त्याने हरवलेल्या माणसांना पाण्यात बुडवून मारतो त्यालासुद्धा तीच शिक्षा मला द्यावयाची आहे म्हणजे त्याला समजेल काय होते पाण्यात बुडवल्याने". वंदीन त्यावर बोलतो, "अहो जनक, मी राजा वरुणाचा मुलगा आहे. तुमच्या ह्या यज्ञाच्या बरोबर आणखीन एक यज्ञ जो बारा वर्षे चालणार आहे त्याच्या तयारीसाठी मी कांहीं पुरोहित इतरत्र पाठवले आहेत त्या यज्ञाची माहीती जमा करण्यासाठी ते परत येतच असतील. तसेंच मी अष्टवक्राच्या संघात सामील होऊन त्याला त्या यज्ञाच्या कामात मदत करू

इच्छितो. मी सुत (सु म्हणजे उत्तम, आणि उत म्हणजे यज्ञ, म्हणून त्या शब्दाचा अर्थ होतो, उत्तम यज्ञ विधी करणारा पुरोहित) आहे.". ते ऐकून अष्टवक्र राजाला सांगतो, "ब्राह्मणाला पराभूत करणे मग ते शब्दाने असेल अथवा वागणूकीने असेल. वंदीनला पाण्यात समाधी घ्यावीच लागेल. जर ते नसेल तर त्याला अग्नीच्या हवाली करावे, तो अग्नी त्याची परीक्षा घेईल व जर तो निर्दोष असेल तर अग्नी त्याला स्पर्श करणार नाही. सभेतील जाणकार मंडळी अष्टवक्राचे बोलणे समजतात. त्यातील बारा उत्तम गुण प्रकर्षाने दिसून येत होते. पुण्यत्व, सत्य, संयम, तपस्या, चांगुलपणा, नम्रता, क्षमशिलता, अगर्विता, त्यागबुद्धी, दातृत्व, इंद्रिय निग्रह आणि मत्सरशून्यता असें ते बारा सद्‌गुण होते.
जनक अष्टवक्राचे म्हणणे ऐकल्यावर सांगतो, "सगळे समजून मी असा निर्णय घेतला आहे किं, वंदीनचा पराभव तू केला आहेस तेव्हां, त्याला मी तुझ्या स्वाधीन करत आहे". ते ऐकल्यावर अष्टवक्र राजाला सांगतो, "अहो राजन, हा माझ्या कांहीं कामाचा नाही. त्याला त्याच्या वरुणाच्या ताब्यात द्यावे अशी मी आपल्याला विनंती करत आहे". वंदीन बोलतो, "मी वरुणाचा मुलगा आहे, मला जलसमाधीचे कांहीं भय नाही". ते होत असतांना अष्टवक्राला त्याचे पिता हवेत दिसतात. तो कहोड त्याला बोलतो, पुत्र असावा तर असा. तेथे कहोड कबुली देतो किं, तू मातेच्या उदरातून माझे वेदातील ज्ञान सुधारण्याचा प्रयत्न केलास म्हणून मी तुला गर्भात असतांनाच शाप दिला होता म्हणून मला वंदीन कडून मृत्यू आला, माझ्या मुलां मला क्षमा कर, मी माझा शाप काढून घेतो. त्यानंतर तो बोलतो, तुझे पितामह तुला आंघोळ घालतील त्यावेळी तुझे वक्रत्व संपेल असा मी तुला आशिर्वाद देतो. असें बोलून तो आत्मा निघून जातो.
जनकाच्या त्यावेळी होत असलेल्या यज्ञासाठी उख्त विधी होत असतो. त्यावेळी सोम रसाचे पान होत असते. त्यात यज्ञाच्या देवता आनंदाने उपस्थित झाल्या होत्या. त्यात अष्टवक्राचीसुद्धा पुजा केली जाते. त्यावेळी प्रथमच तो त्याच्या पित्याच्या श्राद्धाचे तर्पण करतो. त्यात सगळे ब्राह्मण उपस्थित असतात. लोमस सांगतात, जेव्हां समस्त ब्राह्मण वृंद आनंद साजरा करत असतात तेव्हां वंदिन राजाची परवानगी घेऊन जलसमाधी घेतो. त्या बरोबर सगळे ब्राह्मण जल्लोष करून ते साजरे करतात. त्यानंतर अष्टवक्र त्याच्या काकाच्या श्वेतकेतूच्या खांद्यावर बसून घरी जातो. तेथे त्याच्या पराक्रमाची कहाणी श्वेतकेतू सुजाता व

उद्दकलाला सांगतो. त्यानंतर त्याचे पितामह त्याला नदीवर आंघोळ करण्यासाठी घेऊन जातो व तेथे तो पाण्यात उतरल्यावर त्याचे आखडलेले अवयव सुटे होऊ लागतात व थोड्याच वेळात अष्टवक्र सामान्य होतो. त्या भागात त्याचे अवयव नीट झाले त्या भागाला **समंग तीर्थ** (अंग सुधारणारे अशा अर्थाने) असे म्हणतात. ते तीर्थक्षेत्र झाले व येथे स्नान करण्याने शरीराच्या पीडांपासून मुक्तता होते असे समजतात. म्हणून तुम्ही येथे स्नान करावे असे लोमस त्या सगळ्यांना सांगतात व त्याप्रमाणे ते त्या संगमावर स्नान करतात.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील छपन्नावा भाग संपला.

*कांहीं महाभारताच्या प्रतीमध्ये वंदीन आकड्याचे संबंध तत्वज्ञानातील संज्ञांशी जोडतो जसें बुद्ध विचारात केले जाते. तो भाग मूळ ग्रंथात असणे अशक्य आहे म्हणून त्याचे भाषांतर मी येथे घेतले नाही कारण त्या प्रती नंतरच्या काळात लिहीलेल्या आहेत हे उघड होते. माझ्या मते सांप्रतचे महाभारत बुद्धा नंतर संकलित केलेले आहे तरी त्यातील कथा पुरातन दंतकथां वर आधारीत आहेत. म्हणून बुद्धाच्या सांख्य तत्त्वज्ञानाचा उल्लेख त्यात घेऊ नये असे माझे मत आहे. फक्त दंतकथाच तेवढ्या घ्याव्यात.*

# तीर्थयात्रा पर्व

## भाग सत्तावन्नावा

लोमस सांगतात, येथे जी नदी दिसते तिला समंग म्हणतात परंतु, तिचे पूर्वीचे नांव मधूविला असे होते. त्याच्या बाजूने एक झरा आहे त्याचे नांव आहे कर्दमिला. वृत्राचा वध केल्यानंतर इंद्राला भोवळ आली होती. त्यांने येथे स्नान केले व त्याचे पाप धुतले गेले. त्यापासून जवळच आहे तेथे मैनक पर्वताचा भाग भूमीत घुसलेला दिसतो. म्हणून त्या तीर्थक्षेत्राला **विनाशन** असें म्हणतात. मुल व्हावे म्हणून आदितीने येथे भाताचे पिंड दिले होते. त्या पहाडावर चढण्याने तुमच्या सगळ्या गुप्त अथवा न सांगता येण्या सारख्या विवंचना संपतील. लोमस पुढे सांगतात, अहो राजन, पहा तुमच्यासमोर आहे, कनखल पर्वतराजी. त्या ठिकाणी साधू विश्राम करतात. त्या पलिकडून गंगा वहात आहे. फार प्राचीन काळी महान दृष्टी सनतकुमार ह्यांना मोक्ष ज्ञान झाले. म्हणून येथे अर्घ्य देऊन तू तुझ्या पापातून मुक्त होशिल. तू तुझ्या सगळ्या परिवारासह येथे स्नान करावेस असें मला वाटते. येथे हा जो तलाव दिसत आहे त्याचे नांव आहे, **पुण्य** आणि त्या तेथे जो डोंगर दिसतो तो आहे, **भृगुतुंग**. तेथून ज्या दोन नद्या वहात आहेत त्यांना तुष्णीगंगा असें म्हणतात. ह्या ठिकाणी स्थुलशिरस नांवाच्या ऋषीचा मठ आहे. येथे तू क्रोध व दुरभिमान त्याग करावास. त्यापुढे एक सुंदर पर्णकुटी दिसते आहे ती रैव्याची आहे. तेथे भारद्वाजांचा मुलगा, यवक्री मारला गेला एका राक्षसा कडून. जो यवक्री वेदांतील कथांमध्ये प्रवीण होता. युधिष्ठीर त्यांना विचारतो, "तो श्रेष्ठ ऋषी यवक्री कसा मारला गेला ते मला ऐकावयाचे आहे. मला अशा दैवी अवतारी लोकांच्या गोष्टी तुमच्या कडून ऐकावयाला आवडते".

लोमस सांगू लागतात, भारद्वाज व रैव्या हे दोघे मित्र होते. ते ऐकत्र रहात होते रैव्याच्या झोपडीत. रैव्याला दोन मुलगे होते. त्यांचा नांवे होती, अर्ववसु आणि पर्ववसु. भारद्वाजाला एकच मुलगा होता त्याचे नांव होते यवक्री. रैव्य आणि त्याची दोनही मुलं वेदाच्या अभ्यासात चांगली होती. भारद्वाज वैराग्यपूर्ण जीवन जगत होता. त्या दोघा मित्रांची मैत्री कौतुकास्पद होती. यवक्री पहातो किं, ब्राह्मण समाज रैव्याच्या मुलांना व रैव्याला फार मान

देतात परंतु, त्याच्या पित्याला तेवढा मान मिळत नाही. हे लक्षात आल्यावर तो फार दुःखी झाला. त्या करतां तो कठोर तप करू लागला. वेदाचा अभ्यास करू लागला. त्या कठोर तपस्येच्या दरम्यान तो आगीत स्वतःला भाजून चटके घेतो. त्याच्या कठोर तपोश्चरणामुळें इंद्राला काळजी वाटू लागते. त्याचे तप कमी करण्यासाठी इंद्र त्याला भेटतो. आणि बोलतो, "अहो ऋषी, आपण कमालीची घोर तपस्या करू लागला अहात. त्याचे कारण कांय"? यवक्री त्याला सांगतो, "अहो स्वर्गाचे धनी, मी अशी साधना करत आहे कारण मला असा वेदी व्हावयाचे आहे किं, जसा आधी कधी कोणा ब्राह्मणांने केला नव्हता". अहो पक राक्षसाचा वध करणारे देवांचे राजे, मला वैदिक कथांचा चांगला जाणकार व्हावयाचे आहे. माझ्या अशा तपस्येने मी सगळे वेदाचे ज्ञान आत्मसात करणार आहे. शिक्षकाकडून शिकण्याला बराच समय लागतो मला तपस्येच्या मार्गाने ते लवकर उरकावयाचे आहे. यवक्रीचे ते ऐकल्यावर इंद्र त्याला बोलतो, "अहो ब्राह्मणा, अरे अशांने तू स्वतःला नष्ट करून घेशिल. हे योग्य नाही, तू शिक्षकाकडूनच वेदाचे ज्ञान घेणे योग्य होईल". लोमस पुढे सांगतात, तसें सांगून शक्र त्यांच्या घरी निघून गेले. यवक्रीचा विश्वास त्याच्या तपोश्चरणावर पुरेसा होता व म्हणून तो त्याची तपस्या चालू ठेवतो. त्याच्या त्या तपस्येमुळें पुन्हा इंद्राला त्रास होऊ लागला. म्हणून तो पुन्हा त्याला भेटण्यासाठी आला. इंद्र त्याला सांगतो, "तुझे हे धाडस मोठे आहे परंतु, हि वेदाचे ज्ञान मिळवण्याची पद्धत नाही. तू तुझा समय व शक्ती व्यर्थ घालवत आहेस". यवक्री त्याला बोलतो, "जर तुम्ही मला सहकर्य दिले नाही तर मी आणखीन घोर तप करीन". तो आणखीन धमकी देतो कीं, जर इंद्राने त्याची मागणी मान्य केली नाही तर तो त्याचे हात पाय कापून अग्नीला अर्पण करील.

लोमस पुढे सांगतात, त्या ऋषीचा निर्धार लक्षात आल्यावर दयाळू शक्र त्याची समजूत घालण्यासाठी प्रयत्न करतो. शक्र एका शंभर वर्षाच्या वृद्ध ब्राह्मणाचे सोंग घेऊन त्याच्या कडे तो पुन्हा जातो. तो ब्राह्मण क्षयाने आजारी असल्याचे वाटत होते. यवक्री जेथे गंगेच्या तटावर ध्यान करण्यासाठी बसत असे तेथे पडून रहातो. तरीसुद्धा यवक्री दाद देईना तेव्हां इंद्र गंगेतील पाणी काढून त्या जागी रेती भरू लागला. जेणेकरून त्याला त्याचे विधी करता येऊ नये. सावकाशपणे त्या रेतीचा एक बांध तेथे तयार होत गेला व तो यवक्रीच्या लक्षात

यावा हा त्याचा उद्देश होता. यवक्रीला जेव्हां ते समजते तेव्हां तो जोर जोरांने हसूं लागतो. यवक्री त्याला विचारतो, "अहो देव, हे काय तुम्ही आरंभले आहे? अशाने आपण काय साध्य करू इच्छिता? ह्या बांधाचा काय उपयोग होणार आहे"? इंद्र त्याला सांगतो, "अहो ब्राह्मणा, मी लोकांना पैलतीरी जाण्यासाठी रस्ता तयार करत आहे. लोकांना पैलतीरी जाण्यास फार त्रास होत असतो. होडीने जाणे त्यांना अवघड होत आहे". ते ऐकल्यावर यवक्री इंद्राला सांगतो, "अहो देव, ही नदी खूप मोठी आहे तिला बांध घालणे शक्य नाही. लोक होडीने जातात तेंच योग्य आहे". इंद्र त्याला विचारतो, "तुझे असें म्हणणे आहे कीं, अशक्य कार्य करू नये असें आहे कां"? त्याला यवक्री अनुमोदन देतो. त्यावर इंद्र त्याला तेंच उदाहरण दाखवून सांगतो किं, त्याने सुद्धा असा आग्रह सोडून प्रस्थापित मार्गानेच जावे. ते ऐकल्यावर यवक्री इंद्राला विचारतो, "तुमचा मार्ग अयोग्य तसा माझासुद्धा अयोग्य मग तुम्ही तो अयोग्य मार्ग का चोखाळत अहात"? माझ्यासाठी तो मार्ग सोपा करा जे तुम्हाला सहज शक्य आहे. मला तसा वर द्या ज्यामुळें माझी इच्छा साध्य होईल". इंद्र त्याला तसा वर देतात कीं, सगळे वेद त्याच्यात असतील. "तुझ्या सगळ्या कामना सुद्धा पूर्ण होतील". नंतर इंद्र त्याला सांगतो आता कृपा करून तू घरी जा तपस्या बंद करावी. अशारितीने त्याने त्याचे उद्दीष्ट साध्य केल्यावर तो त्याच्या पित्याला बोलतो, "अहो तात, मला मिळालेल्या आशिर्वादामुळें आपल्या दोघांचे वेदाचे ज्ञान पूर्ण होणार आहे. त्या आशिर्वादामुळें आपण सगळ्या ब्राह्मणात श्रेष्ठ झालो आहोत". ते मुलांचे ऐकल्यावर भारद्वाज त्याला बोलतात, "अरे माझ्या मुला, तू जे मिळवले आहेस त्याचा तुला अभिमान वाटला पाहिजे हे निश्चित खरे आहे. परंतु, त्या प्राप्तीचा गर्व तुला झाला तर ते ज्ञान फुकट गेले असे तुझ्या कसे ध्यानात येत नाही. अरे माझ्या मुलां असें तयार ज्ञान फार उपयोगाचे नसते. मी तुला एक प्राचीन कथा सांगतो म्हणजे मी काय म्हणतो ते तुला लक्षात येईल. माझ्या मुला, यवक्री ऐक ती कथा.

फार प्राचीन काळी एक ऋषी बलधी नांवाचा रहात होता. त्याचे ज्ञान सामर्थ्य मोठे होते पण त्याचा पुत्र मरतो व त्यामुळें तो फार दुःखी होतो. आपल्याला एक न मरणारा पुत्र व्हावा म्हणून तो तपस्या करू लागतो. त्या तपस्येमुळें त्याला एक तसा पुत्र मिळण्याचे आश्वासन देव देतात. एरवी देव त्याच्यावर खूष होते परंतु, तो पुत्र देवांसारखा अमर

होण्यासाठी देव त्याला सांगतात, एका अटीवर तुझा मुलगा अमर होईल त्यासाठी त्याचा जीव कोठल्यातरी वस्तुत असेल. बलधी ते मान्य करतो व सांगतो, हे  पर्वत अमर आहेत त्यात माझ्या मुलाचा जीव असू द्या. त्या प्रमाणें त्याला एक पुत्र होतो त्याच नांव असते, मेधावी. त्याचा स्वभाव अति रागीट असतो. त्याला जेव्हां त्याच्या अमरत्वाचे समजते तो आणखीनच भयंकर होतो. तो त्याच्या बापाचा अपमान करू लागतो. तो सगळ्या पृथ्वीवर भटकत असतो. साधना करणार्या संतांचा तो अपमान करत असें. त्याला कशाचीच भिती राहिली नव्हती. असेंच एके दिवशी त्याची व ऋषी धनुशक्ष बरोबर भेट होते. मेधावी त्याचा अपमान करतो. तेव्हा तो ऋषी धनुशक्ष त्याला शाप देतो व बोलतो तुझी राख होईल. परंतु, मेधावीची राख होत नाही. ते लक्षात आल्यावर धनुकक्षी ज्या डोंगराशी त्याचा जीव बांधला होता त्यावर रेडे सोडून त्या डोंगराचे तुकडे करतो. त्यामुळें मेधावी नष्ट होतो.
ही कथा सांगितल्यावर भारद्वाज आपल्या मुलाला सांगतात, अशासाठी कांहीं अशक्य गोष्ट देवांनी जरी दिली तरी ती सृष्टीच्या नियमानुसार चालण्यास बांधलेली आहे. म्हणून तेंच अपेक्षावे जे त्या नियमात बसते. त्यापेक्षा दुसरे कांहीं मागितले व ते अगदी इंद्राने जरी दिले तरी ते फार काळ टिकणार नाही. म्हणून तू जो वर मिळवला आहेस त्याचा तुला कधीतरी त्रास होऊ शकतो. कारण, कोठलाही शाप अथवा वर ब्रह्मदेवाच्या मान्यते शिवाय कायम होत नसतो हे वेदाचे वाक्य आहे. जे शाप अथवा वर त्या मान्यते शिवाय असतात ते तात्पुरते असतात व केव्हाही खोटे ठरू शकतात. माझ्या मित्राची मुलं रितसरपणे शिकून तयार झाली असल्याने त्यांचे ज्ञान शाश्वत आहे तसे तुझे नाही. कारण ते कोणाच्या तरी कृपेवर आहे. जर कृपा संपली तर तुझे ज्ञान शून्य होईल. म्हणून तुझ्या अशा वैदिक ज्ञानाचा टेंभा रैव्यापुढे मिरवू नकोस कारण, तो फार रागीट स्वभावाचा आहे. यवक्री भारद्वाजाला आश्वासन देतो कीं, तो त्याची दक्षता बाळगेल. यवक्री बापाला सांगतो, मी त्याचा फार आदर करतो. तरी तो यवक्री त्याच्या तपस्येच्या जोरावर इतर ब्राह्मणांना व मुनींना सतावू सागतो. आता त्याला कोणाचीच भिती रहात नाही.
अशारितीने तिर्थयात्रा पर्वातील सत्तावन्नावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग अठ्ठावन्नावा

लोमस पुढे सांगतात, एके दिवशी चैत्र महिन्यात बेडरपणे भटकत तो यवक्री रैव्याच्या आश्रमात पोहोचतो. त्या विलोभनीय आश्रमाच्या भोवती सुंदर वनराई होती. तेथे त्याला रैव्याची सून दिसते. ती किन्नर मुलींप्रमाणे तेथे फेर फटका मारत होती. यवक्रीला तिच्या बद्दल वासना उत्पन्न होते. त्याच्या उन्मत्त स्वभावानुसार तो बेशरमपणे त्या रैव्याच्या लाजाळू सुनेस बोलतो, "तू सुंदर मुली माझ्या कडे येशील कां"? रैव्याच्या सुनेला यवक्रीच्या वाक्सिद्धीची (शाप अथवा वर देण्याची क्षमता) कल्पना होती म्हणून घाबरून ती त्याला होकार देते. यवक्री तिला खाजगीत घेतो. तेथे प्रेमाचे चाळे तो सुरू करतो त्याचा फायदा घेऊन ती त्याला बांधून ठेवते. त्यानंतर ती आश्रमात परत येते. ती रडत असते. ती पर्ववसुची बायको होती. तिला तो विचारू लागतो व सांत्वन करत सगळे काय झाले ते समजून घेतो. तेव्हां ती त्याची देखणी बायको त्याला यवक्रीचे आगाऊपणाचे वागणे कसे होते ते सांगते आणि कशी युक्ती वापरून ती त्याला बांधून ठेवते व स्वताची सुटका त्याच्या तावडीतून करून घेते तो सगळा वृतांत सांगते. यवक्रीच्या त्या अक्षम्य वर्तणूकीचे समजल्यावर त्याला भयंकर संताप होतो. त्याच्या अंगाचा तडफडाट होतो. त्या रागात तो त्याच्या डोक्यावरील जटा उपटण्यास सुरुवात करतो. पवित्र मंत्रांचा जप करून तो ते केस अग्नीला आहूती म्हणून देतो. त्या बरोबर त्या पवित्र अग्नीतून दोन भयंकर दिसणारे लाल डोळे असलेले राक्षस बाहेर येतात. ते रैव्याला विचारतात, "आम्हाला कां बोलावले"? पर्ववसु त्यांना आज्ञा करतो किं, त्याने यवक्रीचा नाश करावा. तशी आज्ञा ऐकल्यावर ते दोघे त्यासाठी निघतात. त्यातील एकजण पर्ववसुच्या पत्नी सारखी मायावी स्त्री बनतो. ती एक राक्षशीण असते, यवक्रीचे कमंडलू खेचून पळून जाते. त्याचे पवित्र पाण्याचे कमंडलू गेल्यामुळें त्याला त्याची सिद्धी वापरता येत नाही. ते झाल्यावर दुसरा राक्षस त्याचा भाला घेऊन यवक्रीच्या मागे जातो. तो राक्षस आपल्याकडे मारण्याच्या उद्देशाने येत आहे हे समजल्यावर तो पाण्याच्या टाकीच्या दिशेने धावू लागतो. परंतु, त्या टाकीत पाणी नव्हते. ते पाहून तो जवळच्या नदीकडे धावतो. त्याला तो राक्षस त्याच्या

वाटेत अडचणी उत्पन्न करत होता. त्यामुळं तो अखेरीस त्याच्या पित्याच्या अग्नीवीर कक्षात शिरतो. परंतु, तेथे पहार्याला बसलेल्या अंध आणि वृद्ध शुद्राने अडवले. म्हणून तो त्या खोलीत थांबला. शुद्राने त्याला पकडून ठेवले असल्यामुळें राक्षस त्याच्यावर नेम धरतो व भाला फेकतो. तो भाला त्याच्या छातीत घुसल्यामुळें यवक्री मरतो. ते केल्यावर तो राक्षस रैव्याकडे जातो व त्याची परवानगी घेऊन आपल्या मादी राक्षशिणी बरोबर निघून जातो.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील अठ्ठावन्नावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग एकोणसाठावा

लोमस सांगत असतो, भारद्वाज त्याच्या मठात परततो. त्यानंतर त्याचे नित्याचे विधी उरकल्यावर तो यज्ञाच्या संमिधा गोळा करण्यासाठी प्रयत्न करतो तेव्हां त्याला असें दिसते कीं, त्या संमिधा त्याच्या कडे जाण्यास राजी होत नाहीत कारण एका गैर कारणामुळें त्याचा मुलगा यवक्री मारला गेला होता. अग्नीहोत्राचा हा वागण्यातील बदल पाहून भारद्वाज आपल्या प्रामाणिक शुद्र सेवकांस विचारतो, अग्नी व शुद्र दोघेही नाराज आहेत हे त्याच्या लक्षात येते पण त्याचे कारण मात्र समजत नाही. तो शुद्राला विचारतो, "कुटीत कांहीं अभद्र घडले आहे कां"? भारद्वाज त्या वृद्ध सेवकास विचारतो येथे काय अभद्र केले माझ्या मूर्ख मुलांने ते सांग. कांहीं तरी भयंकर घडले आहे हे निश्चित. शुद्र सांगतो, "आपला मुलगा रैव्याच्या घरी गेला होता व तेथे त्यांने कांहीं केले ज्यामुळें राक्षसांनी त्याला मारले आहे. त्याच्या पाठी एक राक्षस त्याचा भाला घेऊन धावत होता तेव्हां यवक्री आपल्या अग्नीवीर दालनात शिरण्याचा प्रयत्न करू लागला त्यावर त्याला मी हाताने धरून थांबवले तेवढ्यात तो राक्षस आला व त्याचा भाला यवक्रीच्या छातीत घुसवला. यवक्री त्यामुळे जमिनीवर निपचित पडला आहे. बहुतेक तो मेला असावा". भारद्वाजला ज्या गोष्टी होण्याची भिती वाटत होती ती घडली म्हणून तो फार दुःखी झाला होता. यवक्रीच्या मृतदेहाला धरून तो बराच काळ रडत होता. तो त्याच्या मृत मुलांस बोलत होता, "ब्राह्मणासाठी तपस्या करणे त्याचे कर्तव्य असते. त्याप्रमाणे तू तपस्या करत होतास. तुझे इतरांशी वागणेसुद्धा योग्य असावे तरीसुद्धा असें कसे झाले? तू कोणाशी उर्मटपणा केलांस कां? मी तुला बजावले होते कीं, तू कांहीं अभद्र करणार नाहीस पण तू माझे ऐकले नाहीस. तुला मी रैव्याच्या घरी न जाण्याचे सांगितले होते तरी तू तेथे कां गेलास? रैव्याला माहीत होते कीं, यवक्री थोडा सैल प्रवृत्तीचा आहे व तो माझा एकुलता एक मुलगा आहे तरी त्यांने तुला शाप दिला हे कां घडले? रैव्याला जरा समजूतीने परिस्थिती हाताळावयाला पाहिजे होती. माझा वंश रैव्याने नष्ट केला आहे. अरें माझ्या मुलां, मी तुझ्या शिवाय जगू शकणार नाही. पुत्र ही माणसाची सर्वात अमुल्य संपत्ती आहे.

त्यातच अर्थ उरला नाही मग जगावयाचे कशाला"? मी आता माझा श्वास सोडतो पण त्या आधी मी रैव्याला शाप देतो किं, त्याचा ज्येष्ठ पुत्र त्याच्या मृत्यूस कारणीभूत होईल". शेवटी भारद्वाज स्वतःशीच बोलतो, "ते ज्यांना पुत्र नाहीत, ते खरोखरच मोठे भाग्यवान असतात". पुढे तो स्वतःशीच बोलत असतो, "ते खरोखरच दुर्दैवी आहेत ज्यांना त्यांच्या घनिष्ठ मित्राला मुलांच्या कारणाने मृत्यूचा शाप द्यावा लागत आहे. माझ्या इतका दुर्दैवी कोणा नसेल ह्या जगात कारण, मी माझ्या मुलाच्या मृत्यू बरोबर माझ्या मित्राच्या मृत्यूस कारणीभूत होत आहे". बराच काळ त्याच्या मुलाच्या मृत्यू नंतर तो त्याला चितेवर ठेवतो व चिता पेटवतो नंतर स्वतः त्या भडकलेल्या चितेत उडी मारतो.
अशारितीने तिर्थयात्रा पर्वातील एकोणसाठावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग साठावा

लोमस बोलतो, त्या सुमारास महाप्रतापी राजा बृहद्युम्न जो रैव्याचा यजमान होता, तो एक यज्ञ करण्याचे आयोजित करतो. त्या कामासाठी रैव्याचे दोनही मुलं अर्ववसु आणि पर्ववसु त्या यज्ञाच्या पौरोहित्यासाठी नेमले जातात. आपल्या पित्याची परवानगी घेऊन ते दोघे यज्ञाच्या कामासाठी राजाच्या कडे जातात. आश्रमात फक्त रैव्य व पर्ववसुची पत्नी असें दोघेच असतात. कांहीं दिवसानंतर पर्ववसु त्याच्या बायकोला भेटण्यासाठी घरी येतो. वाटेत त्याला त्याचा बाप वनात दिसतो, त्याच्या अंगावर काळवीटाच्या चामड्याचे वस्त्र होते. ती रात्रीची वेळ होती व कुट्ट अंधार होता. त्याशिवाय पर्ववसु प्रवासाने थकलेला होता म्हणून त्याच्या डोळ्यात झोप होती. त्या परिस्थितीत तो त्या काळ्या वस्त्रातील आपल्या पित्याला एक श्वापद समजतो आणि स्वतःच्या संरक्षणासाठी त्याला मारून टाकतो. पर्ववसुने त्याच्या पित्याला अनवधानाने ठार मारलेले असते. यथावकाश त्याच्या मृत पित्याचा अंत्यविधी करून तो परत यज्ञाच्या जागी जातो. तेथे तो आपल्या भावाला जे झाले ते सांगतो. तो सांगतो कीं, सांबर समजून तो त्या अंधारात पित्याचा खून केला आहे. पुढे तो बोलतो, "ब्राह्मण हत्त्या माझ्या हातून झाली आहे". तो सांगतो, "माझ्या हातून असें कृत्य झाले आहे कि, त्या ब्रह्महत्ये नंतर मी तुला यज्ञाच्या कामात मदत करण्यासाठी अयोग्य ठरत आहे. म्हणून तू तो यज्ञ एकटा करू शकशिल कां"? त्यावर अर्ववसु त्याला आश्वासन देतो किं, तो त्या यज्ञाचे सगळे काम एकटा करू शकेल. त्याशिवाय ब्रह्महत्यासाठी जे प्रायश्चित्त सांगितले आहे ते तो पर्ववसुच्या वतीने करील. नंतर यज्ञाच्या कामात यावे, तोवर मी सांभाळून घेईन.

लोमस पुढे सांगतात, येथे पर्ववसुची बुद्धी बिघडते व तो राजाला जाऊन सांगतो कीं, अर्ववसुने त्यांच्या पित्याचा खून अनवधानाने कां होईना केला आहे व म्हणून तो त्याच्या प्रायश्चित्ताचे तपश्चरण करत आहे. राजा अर्ववसुला यज्ञाच्या कामातून काढून टाकतो. अर्ववसु पुनः पुन्हा राजाला सांगत असतो किं, खून मी नाही तर पर्ववसुने केला आहे व यज्ञाच्या कामाच्या सोईसाठी तो त्याच्या भावाच्या बदल्यात प्रायश्चित्त घेत आहे, पण

कोणीही त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवत नाही. आपल्या भावानेच आपल्यावर हि परिस्थिती आणली आहे त्या विचाराने व्यथित झालेला अर्ववसु अरण्यात घोर तप सुरु करतो. तो सूर्यदेवाला प्रसन्न करण्यासाठी ते तपोश्वरण करत असतो. त्यामुळें सूर्यमंत्र त्याला प्राप्त झाला. अग्नीदेवता त्याच्यावर प्रसंन्न झाली, त्याला माणसाच्या रुपात दर्शन दिले. त्याचा असा परिणाम झाला किं, बृहद्युम्न राजाच्या यज्ञाचे पौरोहित्य त्याला मिळाले व त्याच्या भावाची पर्ववसुची हकालपट्टी झाली. अर्ववसुला अग्नीदेवतेने जी यज्ञाची प्रमुख देवता मानली जाते तिने अर्ववसुला आशिर्वाद दिला. त्यांनतर अर्ववसु देवांना विनंती करतो कीं, आमच्या परिवारातील जे मृत्यू झाले आहेत ते सगळे आपत्मृत्यू आहेत म्हणून ते पुनः जीवंत व्हावेत. म्हणजे ते त्यांचे उर्वरीत जीवन जगू शकतील. त्याच प्रमाणे पर्ववसुची पापातून मुक्तता व्हावी. त्यात त्याने आणखीन एक मागितले कीं, त्यांच्या पित्याला रैव्याला गत घटना ज्या त्याच्या मृत्यूच्या वेळी घडल्या त्यांचे स्मरण राहू नये. अर्ववसु देवांना सांगतो किं, सगळ्या घटनां पूर्णतः गैरसमजामुळें घडल्या आहेत म्हणून त्यांचे मित्र भारद्वाज आणि त्यांचा मुलगा यवक्रीसुद्धा पुनः परत मृत्यूलोकात येऊन त्यांचे राहिलेले जन्म कार्य पुरे करावे. देव त्याला तथास्तु असा आशिर्वाद देतात. त्या प्रमाणे त्याचे सगेसंबंधी पुनः अवतरतात. त्यावर पुनः मनुष्य देह प्राप्त झालेला यवक्री अग्नीला विचारतो, "हे कसे झाले अहो अग्नीदेवा, आम्ही दोघेही वेदाचे ज्ञानी असतांना रैव्य मला मारू शकतो व त्याचा मुलगा परत जीवंत करू शकतो ते कसे ते सांगा. आमच्या ज्ञानाच्या दर्जात कांहीं फरक राहिला आहे कां"? अग्नीदेव त्याला सांगतो किं, रैव्य व त्याचा मुलगा अर्ववसु हे मेहनत करून वेदाचे ज्ञान मिळवत होते म्हणून त्याचा दर्जा मोठा असतो, ते त्यांचे ज्ञान होते. तुझे ज्ञान खरे नव्हते ते इंद्राच्या कृपेवर अवलंबून होते. अशा आयत्या ज्ञानाला ज्ञान मानत नाहीत. त्याला माहिती असें म्हणतात. ज्ञान व माहिती ह्यातील फरक जर तुला समजला तर त्यातील फरक तुला समजणे शक्य होईल. ज्ञान अनुभवसिद्ध असते ते माहितीत नसते. दुसर्याकडून आयते मिळालेले ज्याच्या पाठी अनुभवाचा पाठींबा नाही त्याला ज्ञान समजले जात नाही. म्हणून तू पुन्हा तपस्या करून तेंच वेद अभ्यासून तयार हो म्हणजे तुझ्या वेदाच्या माहितीचे ज्ञानात रुपांतर होईल, मग तू व हे अर्ववसु, रैव्य हे एकाच दर्जाचे व्हाल. त्यानंतर इंद्र व इतर देव स्वर्गात निघून जातात. एवढे

सांगितल्यावर लोमस युधिष्ठीराला सांगतात, हि जागा अशा साठी ख्यातनाम आहे. म्हणून येथे स्नान करून तू तुझे कल्याण करून घे.

अशारितीने तिर्थयात्रा पर्वातील साठावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग एकसष्ठावा

लोमस ऋषी पुढे सांगतात, अहो युधिष्ठीरा, आपण उशिर्वीज, मैनक आणि स्वेत तसेंच काळ हे पर्वत मागे टाकले आहेत. येथे तू पहात आहेस, सात गंगा वहात आहेत. हि जागा पवित्र व पुण्यप्रद समजली जाते. असे समजतात, येथे अग्नी वेळोवेळी भडकत असतो. कोणीही मनुष्य ते दृष्य पाहू शकत नाही. अरे राजा, तू मनाने त्यावर ध्यानस्थ हो ह्या तिर्थावर, असे जर तुला जमले तर तुला देवांची पावले येथे सर्वत्र उमटलेली दिसतील. लोमस सांगत असतात, आता आपण काळ पर्वत ओलांडला आहे. आता आपण चढणीच्या रस्त्यावर आलो आहोत. तो मंदारचा शुभ्र खडक आहे. तेथे यक्षांचा वस्ती असते. मणीभद्र आणि कुबेर यक्षांचे राजे आहेत. येथे ऐंशीहजार गंधर्वांची फौज तयार असते. त्याच्या चौपट किंपुरुष असतात. ते विविध रुपात येथे वावरत असतात. त्यांच्याकडे वैविध्यपूर्ण आयुधं असतात. ते यक्षांचा राजा मणीभद्र त्यांचे संरक्षक असतात. ह्या परिसरात त्यांची ताकद मोठी असते. त्यांची उर्जा इतकी असते किं, ते देवांना सुद्धा भारी जातात. त्यांच्या संरक्षणात आणि राक्षसांच्या देखरेखीत असलेले मणीभद्र त्याचे काम करत असतो. त्यामुळे हे पर्वत माणसाला जाण्यासाठी अवघड असतात. म्हणून आपल्याला मोठ्या तयारीने जावे लगणार आहे. तुझे मनोबळ वाढवून घे. त्यांच्या शिवाय कुबेराचे मंत्री येथे पहारा देऊन असतात. त्यांच्या बरोबर त्यांचे राक्षस आप्त तेथे असतात. (यक्ष आणि राक्षस ह्या स्वर्गातील दोन प्रजाती एकमेकांची रुप घेऊ शकतात. कधी राक्षस म्हणून तर कधी यक्ष म्हणून, ते वावरत असतात.)

कैलास पहाड सहा योजने उंच आहे. त्यावर एक गावठी बोराचे अवाढव्य झाड आहे. त्यावर अगण्य देव, यक्ष, राक्षस, सुपर्ण, किन्नरं, नाग, गंधर्व येत जात असतात. कुबेराच्या वाड्याकडे जाणारा रस्ता येथून जातो. अरे राजा, माझ्या प्रमाणे तुझे पावित्र्य, भिमाचे सामर्थ्य, आणि यम व वरुणदेवाचे आशिर्वाद, अशाच्या जोरावर तुझे मार्गक्रमण येथे यशस्वी होईल व उद्याच्या संघर्षात तुझा जय खात्रीचा असेल. त्याशिवाय गंगा, यमुना, अश्विनीकुमार, पृथ्वीवरील सगळे तलाव, पर्वत ह्यांचे सुद्धा तुम्हाला सहाय्य मिळेल. तुझे

तेज असे आहे किं, दैवी शक्ती, असुर, वसु असे कोणीही तुला त्रास देणार नाहीत. नंतर लोमस ऋषी गंगेची प्रार्थना करतात, "अहो गंगा माते, मी तुझ्या गर्जना ऐकत आहे. ह्या अजमिदा वंशाच्या राजाला संरक्षण दे". तू हिमालयाची मुलगी, हा राजा तुझ्या डोंगराळ प्रदेशांतून जात आहे, त्याला तू संरक्षण दे". अशी प्रार्थना केल्यावर ऋषी लोमस त्याला सांगतात, सावधगिरीने पुढचा प्रवास करावा लागेल.

युधिष्ठीर बोलतो, तुमचा असा सावधगिरीचा इशारा देणे मला समजला नाही. लोमसांना चांगलेच ठाऊक आहे किं, हा प्रदेश माणसासाठी प्रवास करण्यासाठी अवघड आहे. म्हणून त्यांनी बेसावध रहाण्या पासूनचा इशारा दिला असावा. थोडे जरी पाप विचार मनांत असले तरी येथील दैवी पहारेकरी माणसाला पुढे जाऊ देणार नाहीत असें त्यांना सुचवावयाचे असेल.

वैशंपायन सांगतात, तो भिमाला बोलतो, "अरे माझ्या भावा, भिमसेना, तू कृष्णाची काळजी घे. अर्जुन जेव्हां असतो तेव्हां ती त्याच्याच जवळ रहाणे पसंत करते पण आज तो नाही तेव्हां तू तिला ह्या रस्त्याने जातांना तिची काळजी घे".

त्यानंतर युधिष्ठीर नकुल व सहदेवांच्या कपाळाचे चुंबन घेतो व सांगतो, "पुढील प्रवास सावधगिरीने करावयाचा आहे न घाबरता पावले टाका".

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील एकसष्ठावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग बासष्ठावा

युधिष्ठीर पुढे बोलतो, "अरे वृकोदरा, ह्या भागात बलशाली शक्तीमान परंतु, न दिसणार्या अशा शक्तीचा संचार येथे आहे. तरीसुद्धा आपण आपल्या पुण्याईच्या आणि अग्निहोत्र यज्ञाच्या जोरावर ह्या भागातून जाऊ. म्हणून तू तुझी भूक आवरून रहा. त्याच प्रमाणे तुझ्या चतुराईचा उपयोग करण्यास तयार रहा. लोमस काय सांगत आहेत कैलास पर्वाबद्दल ते तू ऐकले आहेसच. म्हणून द्रौपदी कशी त्यातून जाईल ते पहाण्याचे काम तुझे. फार सावधगिरीने तू आणि सहदेव इतर सगळ्याना घेऊन वर चढतील. तुमच्या बरोबर सगळे हमाल व इतर ब्राह्मण मंडळी येतील. त्याच वेळी आम्ही दोघे, मी व नकुल लोमसांबरोबर पुढे जाणार आहोत. आमच्या मागून तुम्ही यायचे आहे. अशी आज्ञा तो भिमाला देतो. आपण सगळे नेमके खावयाचे आहे, त्यामुळे प्रवास करणे सोपे जाईल. तुम्ही आमची वाट पहात गंगेच्या उगमस्थानी पहात रहा. मी परत येई पर्यंत द्रौपदीची काळजी घेणे हे तुझे काम असेल". भिम त्याला उत्तर देतो, "मला दिसते आहे किं, आपली द्रौपदी प्रवासाने खूप थकलेली आहे. तिला अशा प्रवासाची सवय नाही. तरी ती प्रवास जोमाने करत आहे कारण ती अर्जुनाला भेटण्यास उत्सुक आहे. अर्जुन आपल्याबरोबर नाही ह्याची खंत आपल्या सगळ्यांना आहेच. म्हणून मला माहित आहे कीं, तुला आम्ही कोणीही जर दिसले नाही तर तुझा जीव कासावीस होईल. माझ्यामते ब्राह्मण आणि हमाल येथूनच परत जातील तर ते सगळ्यांसाठी श्रेयस्कर होईल. मी तुला ह्या राक्षसांनी झपाटलेल्या प्रदेशांत एकटे सोडून जाणार नाही. द्रौपदीसुद्धा तुला एकटे सोडून जाण्यास तयार नाही. अरे देवा, आम्ही सगळे अर्जुनाचे दर्शन घेण्यासाठी उतावीळ आहोत. म्हणून आपण एकत्रच प्रवास करणार आहोत. जर आपली वाहने त्या पहाडी भागातून नाही जाऊ शकली तर आपण पायी जाऊ. तू उगाच सगळ्या गोष्टींची फिकीर करत बसू नकोस. जर पांचाली जास्त चालू शकली नाही तर मी तिला उचलीन, त्याची काळजी करू नकोस. प्रसंगी मी तुम्हा सगळ्याना उचलून नेईन जर तुम्ही चालण्यास थकलात.

युधिष्ठीर बोलतो, देव करो व तुझे सामर्थ्य आणखीन वाढो. तू पांचालीला व ह्या दोन भावांना घेऊन जाण्यात मला समाधान आहे तुझे कोट कल्याण हो. तुला कधी थकवा न येवो, अशी मी जगदीश्वराकडे प्रार्थना करतो.
वैशंपायन सांगत असतात, द्रौपदी आनंदाने हसत बोलते, "मी चालू शकेन त्यासाठी तुम्ही सगळे माझ्या करता एवढी काळजी करू नये".
लोमस पुढे सांगतात, गंधमादन पर्वतात शिरण्यासाठी यात्रेकरूच्यात पुण्य प्रभाव असणे जरुरीचे असते कारण, पापमय माणसांना तो दिसतसुद्धा नाही. त्यासाठी विरक्त प्रवृत्ती आपल्यात वाढवणे हांच एकमेव उपाय आहे. आपल्यातील वासनांबद्दल जास्तीत जास्त औदासिन्य अंगी असेल त्यांनांच तो दिसतो. म्हणून वासनांबद्दल आपण पूर्ण उदास झाले पाहिजे तरच त्या दैवी तीर्थक्षेत्री आपण जाऊ शकू. ही खरी आपल्या खरे तीर्थयात्री आहोत का नाही ते ठरविणारी परीक्षा आहे. लोमस पुढे सांगतात, माणसाच्या योगक्षेमा निमित्ताने त्याला सहा प्रवृत्ती दिल्या आहेत त्यात आवश्यकते पुरते रमावयाचे असते परंतु, अरे राजा, बहुधा माणसें त्यात त्यापेक्षा जास्त रमतात. त्यामुळें त्याला त्या प्रवृत्तीचे व्यसन लागते. अशा त्या सहा प्रवृत्तीत रमणारा तीर्थयात्रा करूनही ती व्यर्थ जाते. त्या सहा प्रवृत्तीना त्यासाठी सांख्य षड्रीपू असेसुद्धा म्हणतात. ते आहेत काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर. त्यातील क्रोध माणसाचे शरीर जाळून टाकतो, मद आणि मत्सर त्याला कुजवतात, मोहामुळें त्याला सूज येते आणि लोभामुळें त्याच्य चित्ताची शांती संपुष्टात येते. म्हणून अरे युधिष्ठीरा, त्या सहा प्रवृत्ती तू संयमित कर म्हणजे तुझे शरीर सूर्यासारखे चमकून उठेल व तुझ्या वाचेत सिद्धी प्राप्त होईल. ज्याने ह्या सहाना अवरले, तो देवांना प्रिय होतो. परंतु, असुरांना त्याची भिती वाटते आणि म्हणून ते त्याच्या ह्या संयमनाच्या कार्यात अनेक विध विघ्न उत्पन्न करत असतात.
वैशंपायन सांगत असतात, अशारितीने ते तत्त्वचर्चा करत प्रवास चालू ठेवतात. ते थोड्याच वेळात सुवाहूंच्या प्रदेशात येतात. तो भाग हिमालयात आहे. त्या प्रदेशात दैवी घोडे, हत्ती, विपुल दिसतात. त्या भागात किराट आणि तुंग लोकांची वस्ती असते. तेथे पुलिंड वस्ती करून आहेत. तेथे दैवी लोकांचे नेहमी येणे जाणे होत असते. त्यांचा राजा सुवाहू पांडवांचे वेशीवर स्वागत करतो. तेथे त्यांची रहाण्याची व्यवस्था होते. त्यांना बर्याच दिवसानी

विश्रांती घेण्याचा अवसर मिळालेला असतो. समयानंतर ते तीर्थयात्री सूर्य उगवल्यावर पुढच्या प्रवासास निघतात. युधिष्ठीर त्याचे सगळे सेवक आणि इतर सुवाहूच्या कडे सोडतात. आता मोजके लोक पुढचा प्रवास करू लागतात. त्यांना असें वाटत असते किं, ते अर्जुनाला भेटणार आहेत.

युधिष्ठीर त्यांना बोलतो, "माझ्या भावंडानो नीट लक्ष देऊन माझे ऐका".

"माणसांने गेल्या जन्मात केलेल्या कृत्याचे परिणाम ह्या जन्मात त्याला अनुभवावे लागतात. पहा आपण सुद्धा अर्जुनाच्या शोधात प्रवासी झालो आहोत. कशा कशा प्रदेशांतून आपण जात आहोत, त्याची आपल्याला कधी कल्पनासुद्धा नव्हती. अर्जुन आपल्या बरोबर नाही ह्या जाणीवेने माझे हृदय जळत आहे. आपण एकमेकांचे आधार आहोत. पांचालीचा झालेला अपमान मला सतत जाळत आहे. अरे वृकोदरा, मी धनंजयाला पहाण्यासाठी तळमळत आहे. पांच वर्षे झाली त्याला जाऊन आणखीन किती काळ त्याची प्रतिक्षा करत रहावयाचे. आपण त्याच्या येण्याच्या प्रतिक्षेच्या काळात ही तीर्थयात्रा आरंभिली आहे. आपण बरेच कांही पाहिले आहे. परंतु पार्थला पाहू शकलो नाही.

म्हणून मी अस्वस्थ झालो आहे. फाल्गुनी नक्षत्रावर तो जन्मला होता. यमासारखा शत्रूंचा नायनाट करणारा, जणू साक्षात शक्र असा, मला त्याची सतत आठवण येत आहे. मला त्याची न्याय्य वागणूक आठवते. त्याचा जरी कोणी सामान्य माणसांने योग्य कारणाने अपमान केला तर तो त्याला क्षमा करत असें, त्याचे दातृत्व, सज्जनपणा अतुलनीय आहे. त्याने हरलेल्या शत्रूला माफ केल्याचे मी आठवतो. विनाकारण आपल्या सामर्थ्याचा त्याने कधी दुरूपयोग केल्याचे आठवत नाही. तो कुलिन क्षत्रिय आहे. त्याच्या संरक्षणात असलेले सगळे दुर्बळ सुरक्षित असतात. अरे वृकोदरा, असा आपला भाऊ आपला मोठा आधार आहे. त्याच्या नुसत्या सहवासांने आपले जीवन सुखी होते. तो आपला भाऊ कोठे आहे. जगातील सगळी संपत्ती एका बाजूस व अर्जुन दुसर्या बाजूस असें ठेवले तर अर्जुनाचे पारडे जड ठरेल. फाल्गुनी वासुदेवाचाच दुसरा अवतार आहे. युद्धात अजिंक्य, कार्तवीर्यासारखा शूर, किती वर्णनं करावीत त्याची. किती केली तरी मन शांत होत नाही. सामर्थ्यात तो साक्षात पुरंदरासाखा आहे. त्याचा वेग पावकासारखा आहे. त्याचा क्रोध

यमासारखा आहे जेव्हां अन्याय होतो. त्या शूरवीर भावाच्या भेटीसाठी आपण सगळेच आतूर झालो आहोत. त्या गंधमादन पर्वताकडे जाण्यामागचा आपला उद्देश त्याला भेटण्याचाच आहे. तेथे त्यांच्या प्राचीन अवतारात तो व नारायण ह्या गंधमादनावरच त्यांच्या आश्रमात रहात होते. तेथे असलेल्या बोराच्या वृक्षाजवळ तो आश्रम आहे असं सांगतात. तेथे आज राक्षस रहात आहेत. आपण व्रतस्थ असल्यामुळें आपण तो गंधमादन पर्वत पाहू शकू, जेथे फक्त पायीच जाता येते. तेथे कुबेराचा नंदनवनासारखा बगीचा आहे. ज्याचे संरक्षण राक्षस करत असतात. तेथे दुसरा कोठलाही मार्ग जात नाही. वासनांत अडकलेले, विकृत मनस्थिती प्राप्त केलेले, दुष्टपणा करणारे, अपभाषा बोलणारे, ज्यांचे मन अशांत असते, जे स्वताची तुलना दुसर्यांशी करत आहेत असें कोणीही, तेथे पोहोचू शकत नाही. अर्जुनाचे दर्शन करण्यासाठी आपल्याला तपस्वी ब्राह्मणांच्या सहवासात रहावे लागेल. जे असें दोषपूर्ण आहेत त्यांनाच तेथे माशा, मोठे डांस, चावतात. तेथे राक्षस सिंहाचे, हत्तीचे, सर्पाचे अशी रुप घेऊन त्या अयोग्य लोकांना हाकलून देतात. म्हणून त्या जागी जाण्यासाठी आपल्याला आपले चित्त शुद्ध राखावे लागेल. कांहींही झाले तरी आपण गंधमादनाकडे पोहोचणार हे ठरलेले आहे. अशाप्रकारे युधिष्ठीर भिमाला त्याचे मन मोकळे करून दाखवत असतो.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील बासष्ठावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व
# भाग त्रेसष्ठावा

लोमस त्यांना सांगतात, अहो पांडवानो, आपण अनेक पर्वत, नगरे, विहार आणि तीर्थक्षेत्रे पाहिली आहेत. तुम्ही त्या ठिकाणच्या पवित्र पाण्यात स्नान केले आहे, पुजा केल्या आहेत. आता आपण स्वर्गाला नेणार्या मंदार पर्वताकडे जात आहोत. मंदारपर्वत, मेरूपर्वत, गंधमादनाप्रमाणेच अदृष्य निसर्गाचा भाग आहेत. त्याचे दर्शन होण्यासाठी पवित्रता, तत्त्वनिष्ठा, तपोबळ, व्रतस्थता अशा तयारीची आवश्यकता असते, ज्यांच्यात त्या नाहीत त्यांना हे पर्वत व त्यातील अलकनंदा सारख्या नद्या, दिसत नाहीत. त्यासाठी ह्यापुढे तुम्ही फार सावध होऊन प्रवास करावयाचा आहे. मंदार पर्वतावर महान ऋषीमुनी त्यांचे आश्रम स्थापून रहात असतात. त्या पर्वतातून पवित्र नदी अलकनंदा वहात आहे. तिच्या पाण्यात देव आणि ऋषी स्नान करतात. त्या नदीची उगम त्या विशाल बोराच्या झाडा जवळ असलेल्या विशाल सरोवरापासून होत असतो. त्याची पुजा वैहय, वालखिल्य आणि गंधर्व करतात. ते गंधर्व साम गात ती पुजा करत असतात. महान ऋषी जसें मरीच, पुलह, अंगिरस, साम वेदाचे गायन करत असतात. (सामवेद प्राचीन भक्तिमार्गाचे मूळ समजले जाते.) येथेच इंद्र त्याच्या मरुतांसह पुजा करण्यासाठी येत असतो. त्याच प्रमाणे, साध्य व अश्विनी सुद्धा येथे येत असतात. सूर्यदेव, चंद्रदेव असे तारकांचे देव सुद्धा येथे येत असतात. अलकनंदात स्नान करत असतात. जगाचे त्राते, विधाते, नाशकर्ते असें साक्षात महादेव त्यांच्या नंदीबरोबर येथे येत असतात. ते गंगा दृष्य जगात उतरवण्यासाठी भगिरथाला मदत करतात ते सुद्धा येथे वावरत असतात. पुढे लोमस बोलतात, "मुलांनो, त्या महादेवाला शरण जाऊन एकचित्ताने नमस्कार करा". लोमसांची ती आज्ञा ऐकल्या वर युधिष्ठीर व इतर सगळे तसें करतात. त्यानंतर ते तीर्थयात्री पुढच्या प्रवासास निघतात. पुढे जात असतांना त्यांना कांहीं शुभ्र गोष्टी दिसतात. तो मेरू पर्वत असावा असें त्यांना वाटते. ते काय आहे असा प्रश्न पांडव विचारणार हे हेरून लोमस स्वतः सांगतात, अरें पांडवानो, हा कोणी पर्वत नाही पण प्राचीन काळी झालेल्या देव आणि दानवांतील लढाईच्या खुणा आहेत, तो पर्वत वाटतो तो खरेतर एक हाडांचा भलामोठा ढीग आहे. ती

नरकासुराची हाडं आहेत. नरकाचा वध विष्णूने केला होता आदि काळात झालेल्या त्या गोष्टी आहेत. नरकाला इंद्राची जागा पाहिजे होती, घोर तप आणि वेदातील कवने वापरून तो त्यासाठी प्रयत्न करत होता. तशी तपस्या तो दहा हजार वर्षे करत होता. त्या तपस्येच्या बळावर व अंगच्या ताकदीच्या जोरावर तो इंद्राला आव्हान देतो. त्यामुळें इंद्र घाबरून जातो. म्हणून तो विश्वनाथाची प्रार्थना सुरू करतो. सर्वकडे सदैव उपस्थित असणारा देव त्याला प्रसन्न होतो. त्याच वेळी साधू, संत, ऋषी असें सगळे विष्णूची मनधरणी करू लागतात किं, त्याने इंद्राला मदत करावी. इंद्र विष्णूला त्याच्या धास्तीचे कारण काय, ते सांगतो. ते ऐकून विष्णू शक्राला सांगतात कीं, त्याची धास्ती नरकामुळें आहे. नरकाची तपोसाधना कमालीची आहे. त्यामुळें महादेव त्याला प्रसन्न होणारच. त्या आधी कांहीं केले पाहिजे. त्यासाठी मी नरकाचा आत्मा त्याच्या देहातून काढून घेतो. नरक तपस्या करत असतांनाच विष्णू त्याच्या वर हल्ला करतो व त्याचा वध करतो. नरक त्या बरोबर खाली कोसळतो. जसे एकादा डोंगर कोसळावा. अशा प्रकारे त्याला चमत्कारीकपणे मारले जाते. ती पहा त्याची हाडे सर्वत्र विखुरलेली आहेत. फार प्राचीन काळी एकदा सगळी पृथ्वी नरकात खाली खेचली जात होती. तिला विष्णूने खेचून वर काढले होते असा आणखीन एक चमत्कार त्यांने केला होता. तो चमत्कार विष्णूने त्याच्या वराह अवतारात केला होता. युधिष्ठीर विचारतात, "अहो ब्राह्मणा, मला सांगा, शंभर योजने खाली गेलेली पृथ्वी विष्णूने एका दांताने कशी बाहेर काढली"? मला समजून घ्यावयाचे आहे, कीं, "अशी कोणती ताकद होती त्याने सगळ्या जगाला आधार देणारी जननी शंभर योजने नरकात ढकलली होती व कां? मला ते सगळें जसे घडले तसे सांगा".

लोमस सांगू लागतात, "ऐक यमपुत्रा, मी ते सगळें तुला सविस्तरपणे सांगतो. आदि काळात फार भयंकर प्रसंग चालू होता. त्याकाळात आदि व दुय्यम देवता यमाचे काम करत होत्या. जेव्हां ते हे काम करतात तेव्हां कांही चूक होत नव्हती. कोणीही विनाकारण मरत नव्हते व सगळे जन्म योग्य वेळी होत असतं. त्यानंतर सगळ्या प्रकारचे प्राणी गुरं, ढोरं, हरणं, सांबरं अशा शाकाहारी व मांसाहारी प्राण्यांची मोठ्या प्रमाणात पैदास होऊ लागली. त्याबरोबर माणसांची सुद्धा वाढ होऊ लागली. जेव्हां माणसाची संख्या एवढी झाली किं, तिने धोक्याची मर्यादा ओलांडली. त्यांच्या पापकृत्यांमुळें पृथ्वीवर पापाचा भार वाढत गेला.

मनुष्येतर प्राणी पाप आणि पुण्य दोनही करत नाहीत म्हणून त्यांच्या संख्येने पृथ्वीवर भार वाढत नव्हता. त्या भारामुळें पृथ्वी शंभर योजने नरकात दाबली गेली. नरक हे पापाचे मुख्य स्थान असें समजतात तसेंच स्वर्गाला पुण्याचे मुख्य स्थान समजले जाते. पृथ्वी त्या दोघात तिच्या वरील पाप पुण्याच्या प्रमाणात वर खाली अशी आंदोलत असते. ते पहाता, पृथ्वीमध्ये तिच्या पापाच्या प्रमाणात विविध व्याधी, आपत्ती ह्यांचे प्रमाण वाढत गेले होते. अखेरीस ते असहय्य झाले तेव्हां पृथ्वी नारायणाला म्हणाली, अहो देवाधिदेव आपण ह्यात लक्ष घाला व कांहीं करा म्हणजे ते पापाचे प्रमाणे आवरता येईल. म्हणजे मी पुनः माझ्या मधल्या जागी राहू शकेन. पृथ्वीवरील पाप व पुण्य ह्यांचा समतोल राखला किं, ती स्वर्ग आणि नरक ह्याच्या मध्यभागी राहते. पृथ्वीवर पुण्याचा भार वाढला कीं ती स्वर्गाजवळ जाते आणि पापाचा भार वाढला कीं, नरकाकडे जाते. स्वर्गाकडे असणे त्यातील पुण्याच्या सुखद अनुभवामुळें सुसह्य असते परंतु, पापाच्या भारामुळें जेव्हां पृथ्वी नरका जवळ सरकते तेव्हां तिचा दाह होऊ लागतो व तो तिला सहन होत नाही. त्यामुळें पृथ्वीवर महामारी, दुष्काळ, अवर्षण, अति पाऊस, कलह, त्यातून उत्पन्न होण्यार्या विविध पीडा ह्यांचे प्रमाण वाढते. म्हणून ती नारायणाला मदत करण्यास सांगते. विष्णू तिला सांगतात, "कांहीं काळजी करू नकोस. मी असें कांहीं करीन किं, त्यामुळें तुझ्यावरील पापाचा भार कमी होईल".

लोमस पुढे सांगतात, असें सांगून नारायण पृथ्वीचा निरोप घेतो. पृथ्वीचे कान म्हणून तिचे पर्वत काम करतात तशा परिस्थितीत विष्णू एक दात असलेल्या वराहाचे रुप घेतो त्या वराहाचे तेज कमालीचे असते. त्याचे लाल डोळे व भयंकर आक्रमक वागणूक त्यामुळें सर्वत्र घबराट पसरते. तो वराह जरूरीप्रमाणे आपला आकार मोठा करत असें. त्यानंतर तो नरकात उभा रहातो व त्याच्या एका दांतावर सगळी पृथ्वी उचलून धरतो. पापाच्या भारामुळें तिचे जे खाली घसरणे होत होते ते त्यामुळें थांबते. अशाप्रकारे पृथ्वी उचलली जाणे विधात्याच्या नियमानुसार अयोग्य होते म्हणून स्वर्गातील सगळे ऋषी अस्वस्थ झाले व तक्रार करण्यासाठी ब्रह्माकडे गेले. ते त्या प्रजापतिला सांगतात, "अहो ब्रह्मा, सगळी जीवन शक्ती ह्या विष्णूच्या अचानक पृथ्वी वर उचलण्याने अस्वस्थ झाली आहे. हे काय होते आहे ते आम्हाला सांगा. असें कां होते आहे ते सांगा". ती काकुळतीची विनंती

ऐकल्यावर ब्रह्म त्या माणसांना सांगतात, "अरे मानवांनो, हे सगळे असुरांच्या उपद्व्या पासून पृथ्वी वाचवण्यासाठी केले जात आहे. ह्या कृत्या मागे साक्षात नारायण आहेत म्हणून तुम्ही निशंक रहा. जर पृथ्वी अशा प्रकारे उचलली नसती तर सगळे नष्ट झाले असते व पुनः सुरुवात करावी लागली असती. तुम्हाला जो भयंकर हालचालीची अनुभव येत आहे ज्यामुळें तुम्ही घाबरला अहात तो पृथ्वी वर उचलली जात आहे म्हणून होत आहे. एकदा ती तिच्या नेहमीच्या जागी आली कीं, सगळे कांहीं ठीक होईल. तुम्ही आपापल्या घरी जा, कांहीं घाबरण्याचे कारण नाही, तुमचे भलो हो".

लोमस पुढे सांगतात, त्यानंतर सगळे देव ब्रह्माला त्यांच्या पुढे घेऊन नारायणाची स्तुती करू लागतात. नारायणांनी पृथ्वी व ती वरील सगळ्या माणसांना पापापासून वाचवले म्हणून त्यांचे अनेक वेळा आभार मानत रहातात. त्यानंतर ते आपापल्या जागी जातात.

वैशंपायन पुढे सांगतात, अरे जनमेजया, ही वराहाची गोष्ट ऐकल्यावर ते पांडव ताबडतोब पुढच्या प्रवासासाठी निघतात. त्यांच्या पुढून ऋषी लोमस चालत असतात.

अशारिताने तीर्थयात्रा पर्वातील त्रेसष्ठावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व
# भाग चौसष्ठावा

वैशंपायन सांगत असतात, अरे राजा जनमेजया, ते शूरवीर पांडव त्यांच्या धनुष्य व भात्या सह जय्यत तयारीत असावे असें गंधमादन पर्वताच्या दिशेने चालू लागतात. त्यांच्या बरोबर त्यांचे खास विश्वासातले ब्राह्मण सुद्धा चालत असतात. वाटेत ते कित्येक सरोवरं पहातात. पहाडातील झरे आणि अरण्ये ते पहात पुढे चालत असतात. तेथील झाडांवर फुलं व फळं भरलेली दिसत होती. अधून मधून साधू भेटत होते. आपल्या वासनांबद्दल पूर्ण औदासिन्य राखून अति सावधगिरीने ते केवळ फलाहार व कंदमुळं हा आहार करत पुढे जात होते. ते प्रदेश फार खडतर होता. चालण्यासाठी अशी वाट नव्हतीच. कसेतरी त्या उबडखाबड जमिनीवरून ते मोठ्या कष्ठाने मार्गक्रमण करत होते. असें चालत ते अशा भागात येतात जेथे बैरागी ध्यान साधना करत बसलेले त्यांना दिसत होते. त्या परिसरात किन्नर आणि अप्सरा ह्यांची विशेष वर्दळ त्यांना आढळली. कांहीं वेळानंतर ते त्या भागात प्रवेश करू लागतात जेथून गंधमादन पर्वत सुरु होतो. त्यावेळी वारे वेगांने वाहू लागतात. जोरांने पाऊस सुद्धा सुरू होतो. त्या वार्याबरोबर सुकी पानं वावटळीत जशी उडतात तशी सर्वत्र उडतांना दिसत होती. थोड्याच वेळात सर्व आसमंत धुक्याने भरला व कांहीं दिसेनासे झाले. एवढा गोंधळ माजला कीं कोणी कोणाशी बोलू शकत नव्हते. ते एकमेकांना पाहूसुद्धा शकत नव्हते. त्या झपाट्याने ते असें समजू लागले कीं, आकाश त्यांच्यावर कोसळत आहे कीं काय. सभोवारचे पहाडसुद्धा फाटत नाहींत नां असें त्यांला वाटू लागले. त्या वादळी वार्यापासून वाचवण्यासाठी ते जवळच्या मोठ्या वृक्षाच्या खाली गेले. भिम त्याचे शस्त्र हातात धरून एका हाताने कृष्णाला धरत एका मोठ्या वृक्षाखाली आसरा घेण्यासाठी गेला. युधिष्ठीर व धौम्य दाट झाडी असलेल्या भागाकडे गेले. सहदेव पवित्र अग्नी घेऊन एका गुहेत शिरला. नकुल लोमसांबरोबर इतर ब्राह्मणांना घेऊन दुसर्या जागेत असलेल्या झाडांच्या आड आसरा घेऊन राहिले. जोराचा वारा थाबला व मुसळधार पाऊस लागला. आकाशातून गडगडाट ऐकू येत होता. अधून मधून विजा चमकत होत्या. त्या पावसामुळें थोड्याच वेळात चहोबाजूनी छोट्या मोठ्या नद्या वाहण्यास सुरुवात

झाली. त्यांचे पाणी फेसाळलेले दगडांवर आपटत वेगांनी खालच्या दिशेने वाहू लागले. सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. त्या सगळ्या गोष्टींचा आवाज इतका होता किं, कोणी कांहीं बोलू शकत नव्हते. कांहीं वेळांनी वादळ थांबले. त्यानंतर ते यात्री निसर्गाचा अंदाज घेत सावधपणे आपापल्या निवार्यांतून बाहेर आले व एकमेकांना शोधू लागले. पुनः एकत्र आल्यावर ते झपाट्याने गंधमादन पर्वताच्या दिशेने चालू लागले.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील चौसष्ठावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग पासष्ठावा

वैशंपायन सांगतात, ते दोन कोस चालले असतील, द्रौपदी पायी चालण्यात सराव नसल्याने चालता चालता खाली कोसळली. ती पूर्णतया थकलेली व कंटाळलेली होती. ती द्रौपदाची एकुलती एक कन्या बेशुद्ध झाली होती. त्या वादळामुळे व तिची प्रकृती अशा मेहनतीसाठी योग्य नसल्याने असेल कदाचित, ती जमिनीवर पाय पोटाशी घेऊन बसली होती. ते पहाताच नकुल तिला आधार देण्यासाठी तिच्याकडे धावला. पुढे गेलेल्या युधिष्ठीराला तो सांगतो आपली द्रोपदी अतिश्रमामुळें थकली आहे. तो पुढे बोलतो, ती अशा यात्रेसाठी योग्य नाही. त्यामुळें तिला ते कष्ट पेलले नाहीत. आपण थोडे थांबून ती शुद्धीवर येईस्तोवर वाट पहावी. ती पडली आहे हे पहाताच सगळेच तिच्याकडे धावतात. युधिष्ठीर तिच्यावर आलेल्या परिस्थितीबद्दल स्वताला दोष देत बोलतो, जी आरामात उत्तम बिछान्यावर झोपणारी राणी आज माझ्यामुळें जमिनीवर निजली आहे. हे सगळे होत आहे कारण मला द्युताचा मोह झाला. मी द्युत खेळण्यास तयार झालो म्हणून सगळ्यांना असा त्रास सहन करावा लागत आहे. तिच्या पित्याने तिचा विवाह आमच्याशी केला त्यावेळी तो विचार करत असेल कीं, त्याची सुकुमार मुलगी मजेत तिचे वैवाहिक जीवन घालवेल पण तसे होत नाही ह्याचे मला दुःख होत आहे. असें बोलत तो स्वतः ला दोष देत बसून रहातो.

वैशंपायन बोलतात, युधिष्ठीर असा प्रकारे कष्टी झालेला असतांना त्यांच्या पर्यंत बाकीचे यात्री येऊन पोहोचतात. ते त्याला शांत करण्याचा प्रयत्न करत असतात. त्याच्यावर ईश्वराची कृपा हो म्हणून त्या प्रकारचे मंत्र गाऊ लागतात. तेथे राक्षस असतात त्यांना पिटाळण्यासाठी सुद्धा ते कांहीं मंत्र उच्चारण विशिष्ट पद्धतीने करू लागतात. पांचालकन्येची प्रकृती सुधारावी म्हणून ते ऋषी देवांना आळवणी करू लागतात. थोड्या वेळांनी ती शुद्धीवर येते. ते पाहून सगळे श्वास सोडतात. पांडव तिची गुलाबी नाजूक पावले अलगदपणें मर्दन करून तिच्या पायांना आराम देण्याचा प्रयास करतात. त्याबरोबर तिच्या पोटर्या सुद्धा ते हळूवारपणे चोळून स्वस्थ करतात. हरणाच्या कातड्यावर तिला झोपवले

होते. पांडवांचे हात राकट असल्याने त्या त्यांच्या नाजूक चोळण्यामुळें तिला वेगळ्या प्रकारचे मर्दन झाल्यासारखे वाटत होते. युधिष्ठीर भिमाला बोलतो कीं, "अजून आपल्याला पुष्कळ पहाड असें चढावयाचे व उतरावयाचे आहेत, त्यात हि कशी चालणार"? भिम त्याला उत्तर देतो किं, "त्याची चिंता करू नको, मी तिला माझ्या अंगावर घेऊन जाईन". तिलाच नाही तर तुम्हाला सुद्धा मी माझ्या खांद्यावर घेऊन जाऊ शकतो, त्याची चिंता नको म्हणून तू उगाचच चिंता करत बसू नकोस, तुला प्रत्येक गोष्टींवर चिंता करण्याची सवय आहे, तसे करू नकोस. शांत हो". पुढे वृकोदर सांगतो, "तशीच वेळ आली तर मी माझा मुलगा घटोत्कच आहे, त्याला हांक मारली तर तो राक्षस असल्यामुळें ह्याच भागात असतो, तो येईल व आपल्या सगळ्यांना उचलून नेईल".

वैशंपायन पुढे सांगतात, त्यानंतर युधिष्ठीराच्या परवानगीने भिम आपल्या मुलाची आठवण करतो आणि त्या बरोबर तो त्याचा मुलगा, घटोत्कच तेथे हजर होतो. तो पवित्र राक्षस आल्यावर पांडवांना अभिवादन करतो व नंतर तेथे असलेल्या ब्राह्मणांना वंदन करतो व विचारतो, का आठवण केली. तो राक्षस आपल्या पित्याला बोलतो, "सांगा बाबा मी तुम्हाला कशा प्रकारची मदत करावी असें वाटते, जे असेल ते सांगा". त्याच्या त्या आज्ञाधारकपणामुळें आनंदी झालेला त्याचा बाप त्याला घट्ट आलिंगन देतो.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील पासष्ठावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग सहासष्ठावा

युधिष्ठीर बोलतो, "अरे भिमा, तुझ्या शक्तिमान, राक्षस मुलास जो सत्यवादी आणि आपल्यावर प्रेम करणारा आहे, त्याला त्याच्या मातेस उचलून घेऊन जाण्यास सांग. आणि तू आम्हाला घे असं आपण सगळे गंधमादन पर्वतावर निर्धोकपणे जाऊ शकू.

वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीराची आज्ञा झाल्यावर भिम आपल्या राक्षस मुलाला बोलतो, "अरें हिडींबाच्या अजिंक्य मुला, घटोत्कचा, आमच्या बरोबर तू तुझ्या ह्या नाजूक मातेस उचलून घेऊन प्रवास करशिल तर बरे होईल. लक्षात असू दे कीं तू आमच्या पासून फार दूर पुढे जाऊ नकोस नाहीतर ती तुझी माता घाबरेल. ते ऐकल्यावर घटोत्कच बोलतो, "बाबा, मी एकटा युधिष्ठीर, धौम्य, माझे हे दोन काका आणि कृष्णा अशा तिघाना उचलून नेऊ शकतो. माझ्या बरोबर कितीतरी माझे मित्र राक्षस आहेत, त्यांना बोलावतो व आम्ही तुम्हा सगळ्या ब्राह्मणांना गंधमादन पर्वतावर घेऊन जाऊ शकतो. तुम्हाला चालणार असेल तर आकाशात उडून आम्ही तुम्हाला तुमच्या अपेक्षित स्थळी पोहोचवू शकतो".

वैशंपायन सांगतात, घटोत्कच व त्याचे मित्र राक्षस त्या सगळ्यांना उचलून नेत असतां धौम्य त्यांच्या दैवी सिद्धीच्या जोरावर त्यांच्या बरोबर सूर्यासारखे चमकत पुढे जाऊ लागले. असें ते राक्षसांच्या खांद्यावरून विविध वने अरण्ये पहात त्या विशाल बोराच्या झाडाकडे पोहोचतात. त्या राक्षसांच्या वेगाने ते फारच जलद त्यांच्या अपेक्षित स्थळी पोहोचतात. आकाशातून जात असल्याने ते तो सभोवार व्यवस्थितपणे न्याहाळत जातात. त्यांना अनेक म्लेच्छ लोक तेथे खाणी खोदून त्यातून रत्न काढत होते ते दिसतात. त्या प्रदेशात विद्याधर, किन्नर, किंपुरुष, गंधर्व आणि माकडे दिसत होती. मोर, चामर, रुरु, अस्वलं, गवां, रेडे, हत्ती तेथे वावरत असलेली दिसत होती. त्याशिवाय असंख्य झरे वाहत होते. त्या अरण्यात विविध रंगाचे सुंदर पक्षी उडत होते, असे जात ते उत्तराकुरु पर्यंत पोहोचतात. आता त्यांना कैलास पर्वत जवळून दिसू लागला. त्या कैलासच्या बाजूला ते नर नारायणाचा आश्रम पहातात. त्या आश्रमाजवळ अनेक फळा फुलांनी डवरलेली दैवी

झाडे दिसत होती. तेथे तो विशाल बोराचा वृक्ष होता. त्या झाडाला चौफेर फळं लागली होती व त्यांतून रस वाहत होता. त्या पूर्ण वाढलेल्या झाडाचे सौंदर्य विलक्षण होते ज्याचे वर्णन करता येणार नाही. त्या झाडाखाली अनेक ऋषी ध्यानस्थ बसलेले ते पहातात. त्या झाडावर विविध प्रकारचे पक्षी बागडत होते. परंतु, त्या परिसरात माश्या, डांस, गांधील माशा असें त्रास देणारे किटक अजिबात नव्हते. त्या बोराच्या झाडाजवळ आल्यावर ते सगळे यात्री त्या राक्षसांच्या खांद्यावरून हळूवारपणे उतरले. तेथे पाणी चवदार व थंड होते. जमीन सपाट होती. तेथे गंधर्व वावरत होते. सर्वत्र हिरवळ पसरलेली होती. पांडव त्या प्राचीन ऋषी नर आणि नारायण ह्यांच्या आश्रमाला भेट देतात. त्या आश्रमाचे काय वर्णावे, तेथे दुःखाला वाव नव्हता, पावित्र्य पूर्णपणे जाणवत होते. सूर्याचे कठोर किरण त्याचे अंतरंग भाजून काढत नव्हते. शरीराला पिडा देणार्या भूक, तहान, गरमी, थंडी अशा गोष्टी तेथे नव्हत्या. त्यामध्ये तेजस्वी ऋषीमुनींची दाटीवाटी जाणवत होती. वेदातील साम, ऋचा, यजु असें सगळें सर्वकडून ऐकू येत होते. तेथे अध्यात्माची प्रतारणा करणार्यांना प्रवेश नव्हता. सगळे स्वच्छ ठेवलेले होते, सगळ्या जिनसा जेथे पाहिजेत तेथे ठेवलेल्या होत्या. स्वर्गीय फुलांचा परिमल सर्वत्र पसरलेला होता. तेथे यज्ञाच्या वेदी उत्तम प्रकारे सजवलेल्या होत्या. तेथे थकवा जाणवत नव्हता. तेथे हरणाच्या कातड्याची वस्त्र नेसलेले ऋषी ज्यांच्या वासना देहाच्या गरजेपुरत्या (योगक्षेमापुरत्या) मर्यादीत राहिलेल्या आहेत असें, तेथे वेदाचे वाचन, मनन करत असलेले दिसत होते. त्यांचा आहार फक्त फळं व कंदमुळं असा होता. त्यांचे वैराग्य त्यांना मोक्षापर्यंत नेण्या इतके समर्थ होते. तेथे गेल्यावर यात्री मंडळींनी हात पाय व चेहरा धुवून स्वतःला शुद्ध केले. त्यानंतर ते सगळे पांडव तेथे उपस्थित असलेल्या ब्राह्मणांना भेटले. तेथे असलेले सर्वज्ञानी ऋषी त्यांचे सर्वांचे त्यांना पाण्याचे अर्घ्य देऊन मनोभावे स्वागत करतात. ते यात्री त्या विलक्षण अशा आश्रमाची मोठ्या कौतुकानें पहाणी करत असतात. असा आश्रम खचितच कोठे असेल, असें त्यांच्या पहाण्याच्या पद्धतीमुळें त्यांना वाटत असावे असें दिसत होते. त्या आश्रमाच्या बाजूने भागिरथी वहात होती. जी नंतर पृथ्वीवर उतरणार असते. तेथे असलेल्या झाडांच्या फळांतून मध थेंबा थेंबाने गळत होता. तेथे ते पांडव वस्ती करण्याचे ठरवतात. तेथे असलेल्या सिद्ध ब्राह्मणांबरोबर ते रहाण्याचे ठरवतात. तेथून त्यांना पवित्र सरोवर विंद

आणि त्या पलिकडे मैंनक पर्वत दिसत होता. त्याचे सोनेरी चमकणारे शिखर विलोभनीय वाटत होते. पांडवांना व त्यांच्या बरोबर आलेल्या यात्रींना चांगली विश्रांती तेथे मिळते व पुढील प्रवासासाठी त्यांची तयारी होते. तेथील नयनरम्य वनांत ते फेरफटका मारतात. तेथील चमकणारी फुलं ते पहात रहातात. तेथील सगळी झाडे फळांनी सतत डवरलेली दिसत होती. फळांच्या भारामुळें त्यांच्या डांचक्या झुकून वाकलेल्या दिसत होत्या. तेथे नर कोकीळ गांत होते त्यांचे गाणे त्यामुळें आसमंत प्रसन्न झाला होता. तो सभोवार सुंदर वाटत होता. तेथे फक्त आनंद जाणवत होता. दुःखाला वाव नव्हता. तेथे असलेल्या तलावात विविध प्रकारची रंगांची कमळं उमललेली होती. तेथे उंच वाढलेल्या वृक्षाच्यातून वाहणार्या राळीचा मंद सुगंध हवेच्या झुळकीं बरोबर सर्वत्र पसरलेला होता. त्या सगळ्या गोष्टी पाहिल्यावर पांडव आपला क्षीण विसरतात व ताजेतवाने होतात. अशारितीने प्रसन्न चित्त झालेले ते पांडव शुद्धी विधी उरकून मग पितरांना अर्घ्य वाहतात. त्यानंतर दैवी ऋषींना अर्घ्य देतात. गंगेलासुद्धा अर्घ्य वाहतात. त्यानंतर ते इतर ब्राह्मणांसह ध्यान साधना करू लागतात. त्या वातावरणात कृष्णा अति प्रसन्न झाली होती तिचा चेहरा आनंदी दिसत होता. ते पाहून तिचे पति सुखावतात.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील सहासष्ठावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व
## भाग सदुसष्ठावा

वैशंपायन पुढे सांगतात, संयमित असें जीवन ते त्या आश्रमात सहा रात्री राहिले. त्यांची अशी अपेक्षा होती कीं, त्यांना त्यांच्या प्रिय धनंजयाची भेट होईल. ते तेथे रहात असतांना अचानक एके दिवशी ईशान्य दिशेने जोराचे वारे पाहू लागले. त्या वार्याबरोबर एक दैवी कमळ ज्याला हजार पाकळ्या होत्या असें उडत आले. त्यातून सूर्यासारखे तेज बाहेर पडत होते. कृष्णाने ते पाहिले, त्याचा सुवास विरळा होता. असें ते कमळ तिच्यापुढे वारा जणू घेऊन आला असावा असें तिला वाटले. ते तिने हातात घेतले. तिचा आनंद गगनात मावेनी.

ती भिमाला बोलावते व सांगते, "अहो भिमदेव, हे पहा कमळ आपसुकपणे माझ्याकडे पोहोचले आहे, ज्याचा सुगंध पहा किती मनोहर आहे, त्याच्यामुळें माझा आनंद द्विगुणीत झाला आहे. मला वाटते हे कमळ आपण युधिष्ठीराला भेट करू. मला हे कमळ आपल्या कम्यक अरण्यातील आश्रमात घेऊन जावे असे वाटते. जर तुम्हाला माझे म्हणणे योग्य वाटत असेल तर आपण ह्या कमळाची तेथे लागवड करून त्या सारखी आणखीन कमळ उगवू. त्यासाठी तुम्ही त्या दिशेला जाऊन आणखीन अशीच कमळ आणाल तर बरे होईल. ते ऐकल्यावर भिम त्या दिशेने आणखीन कमळ मिळतात कां ते पहाण्यासाठी त्याचे शस्त्र घेऊन निघाला. एकाद्या सिंहासारखा तो वायुपुत्र न थकता, न कंटाळता, न गोंधळून जाता, स्वताच्या सामर्थ्याची जाणीव ठेवून तो कृष्णेला संतोष देण्यासाठी गंधमादन पर्वताच्या उतारावरून कमळं शोधण्यासाठी चढू लागला. त्या पहाडावरील घनदाट अरण्यातून तो वाट काढत जात होता. आजुबाजूची वनश्री पहात कोठे कमळांचे सरोवर दिसते कां ते शोधत तो जात असतो. काळ्या दगडाच्या त्या चढणी वरून तो झपाझप जात होता. त्याच्या मनांत विविध विचार येत होते. त्याच्या चौफेर नर कोकीळांचे गुंजन चालू होते. गंधमादन वरील थंड आल्हाद दायक झुळूकीमुळे त्याला क्षीण येत नव्हता. वनातील झाडांच्या फुलांच्या परिमलाने ते वातावरण प्रफुल्लित झालेले होते. तो स्वर्ग आहे हे भिमाला त्यामुळें जाणवू लागले होते. भिमाला माहित होते कीं, त्या परिसरात यक्ष आणि

गंधर्व रहात आहेत जरी ते माणसाच्या दृष्टीला जाणवत नव्हते. तेथे ब्रह्मर्षी, लहान मोठ्या देवता वावरत असतात तेसुद्धा तो जाणत होता. तेथे लाल, काळ्या व शुभ्र रंगाच्या खनिजांचे थर जमिनीवर पसरलेले दिसत होते. जसे त्या रंगाच्या रेघोट्या कोणी त्या पवित्र पर्वतावर मारलेल्या असाव्यात. तेथे सर्वकडे वाढलेल्या सप्तछद वृक्षाच्या झाडाच्या पानांचा सडा पडलेला होता. त्या उंच शिखर असलेल्या पर्वताच्या भोवती त्याला घेर घातलेल्या सारखी ढग पसरलेली होती, जणू काय ती त्या पर्वताची पंख असावीत. त्याच्या कड्यांवरून धबधब्यासारखे जे झरे खाली कोसळत होते त्यामुळें त्या पर्वतांने गळ्यात लांबलचक मोत्याच्या माळा घातल्या असाव्यात असे दृष्य दिसत होते. अधून मधून दर्या, कपारी आणि गुहा तो पहात होता. तो पहात होता किं, मोर पक्षी तेथे वावरणार्या अप्सरांच्या हातातील कंकणाच्या आवाजाच्या तालावर नांचत होते. तेथे उंचावर असलेल्या कांहीं शिखरावर मोठाले हत्ती त्याने पाहिले जे त्यांच्या राकट सोंडी तेथील पत्थरावर घासून घासून त्या पत्थराना गुळगुळीत करत होते. अशा सदैव प्रसन्नता असलेल्या प्रदेशातून तो वायुपुत्र वेगांने पुढे जात होता त्या कमळाच्या दिशेने. तो त्याच्या राक्षसी ताकदीने वाटेत येणारे वेल उपटून टाकत होता. त्या जंगलात फिरणारे सांबरं भिमाकडे चरता चरता एक टक पहात होते. त्यांना भिती माहित नव्हती त्या प्रमाणे ते त्याच्या जवळ जाऊन त्याचे निरीक्षण करत होती. त्याच्या प्रिय पत्नीची इच्छा पूर्ण करण्यासाठी वेगांने तो मार्गक्रमण करत होता. त्याच्या अंगातील हत्तीच्या बळामुळें तो तसा जात होता. त्याचे डोळे लाल झाले होते त्या मुळे तो एकाद्या माजावर आलेल्या हत्तीसारखा वाटत होता. गंधमादन पर्वताचे तो सौंदर्य पहात त्याची मजा घेत व त्या कमळाच्या सरोवराचा शोध घेत जात होता. तेथे रहाणार्या गंधर्वांच्या बायका त्या धिप्पाड शरीरयष्टी असलेल्या मानवास मोठ्या कुतूहलाने पहात होत्या जरी भिमाला त्या दिसत नव्हत्या. त्या बायकांना त्यांच्या दिव्य दृष्टीमुळें समजत होते कीं, हा मानव येथे काय शोधत आहे. त्यांना सगळी परिस्थिती समजत होती व त्यामुळें त्या भिमाला मनाने शुभेच्छा देत होत्या. भिम तेथून जातांना जे विचार करत होता त्यांचा मागोवा त्या घेत होत्या व त्यामुळें पांडवांवर दुर्योधनाने केलेले कपट कारस्थान त्या समजत होत्या. भिम विचार करतो, मी आणि अर्जुन दोघे स्वर्गात आलो आहोत तेव्हां आपला भाऊ युधिष्ठीर

आता काय करत असेल? आपल्या मोठ्या भावाच्या भित्र्या स्वभावाचा चांगला अनुभव असलेला भिम समजतो कीं आता तो दुसर्या दोघांना आमच्या शोधार्थ पाठवणार नाही. त्याच वेळी तो शंका करत रहातो, मी केव्हां त्या कमळाच्या जागेचा शोध आणि कसा घेणार? त्याला फक्त एकच समजत होते किं, त्याने द्रौपदीची इच्छा पूर्ण करावयाची आहे. त्या भिमाला समजत नव्हते कीं, तेथील गंधर्व स्त्रिया त्याला पहात आहेत व त्याचे विचार समजत आहेत. कारण, त्या अदृष्य निसर्गात होत्या. कधीही न थकणारा तो शक्तिशाली पांडव पुनः वेगांने त्या डोंगरावर संचार करत होता त्या कमळाच्या जागेच्या शोधात. कित्येक शिखरं तो चढला व उतरला कांहीं गणती नव्हती परंतु, त्या कमळाचे उगमस्थान त्याला सापडत नव्हते. चालतांना तो मोठ्याने ओरडून आपला संताप व्यक्त करत होता. जोरांने पावले जमिनीवर आदळत तो जात असल्याने तेथील भूमी हादरत होती. त्या आवाजामुळें कित्येक प्राणी आपल्या बिळात लपून बसले तर कांहीं वाघासारखे शूर प्राणी आपल्या गुहांतून बाहेर येऊन, हे काय होत आहे असें त्याच्याकडे पहात होते. कित्येक पक्षी घाबरून उंच आकाशात उडून जात होते. कित्येक प्राणी जोर जोरांने ओरडून त्या गोष्टीची दखल घेत होते जसें कांहीं नेहमीपेक्षा वेगळे होत आहे. कांहीं मोठे पशु जसे हत्ती, सिंह त्याच्या जवळ जाऊन पहात हा कोण प्राणी आला आहे पण नंतर ते त्याच्या पासून दूर निघून जात होते. कारण, भिमाने त्या श्वापदांना हाताने मारण्यास सुरुवात केली. कांहीं हत्ती त्याचे एका फटकार्यात खाली पाडले तर कांहीं सिंहाना जोराने ढकलून दिले, ते प्राणी हिंसेची सवय नसलेले असल्यामुळें तशा अनुभवा नंतर ते त्याच्या पासून दूर रहाणेच श्रेयस्कर समजत असावेत. त्या सगळ्यांना ढकलल्यावर तो पांडव पुढे जात होता. कांहीं अंतर गेल्या नंतर त्याला गंधमादनाच्या एका उतारावर एक केळ्याचे प्रचंड झाड दिसते. त्याची पांनं कित्येक योजनं पसरलेली होती. भिम त्या झाडाकडे धावत जातो. तसे धावतांना तो अनेक झाडे मोडून टाकतो. तेथे असलेली इतर केळीची झाड वाट तयार करण्यासाठी तो उपटून काढतो. त्या उपटलेल्या केळ्याच्या झाडांचा ढीग लागला होता. त्या झाडाकडे जात असतांना त्याला अनेक प्रचंड आकार असलेले सांबरं, माकडं, सिंह, रेडे आणि कांहीं पाण्यातील प्राणीसुद्धा त्याच्या वाटेत येतात. ते त्याला घाबरवण्याचा प्रयत्न करत आहेत असा त्याला भास होतो. त्यातून न घाबरता तो पुढे जात रहातो.

त्याला एक प्रशस्थ अथांग सरोवर दिसू लागते. त्या सरोवरावर त्या विशाल केळ्याच्या झाडाची पानं वारा घालत आहेत असें त्याला भासत होते. भिम त्या विशाल सरोवरात उतरण्यास सुरुवात करतो. त्या सरोवरात तशी अनेक कमळ होती. तलावात हत्ती जसें पाणी तुडवतात तसा तो भिम ते सरोवरातील पाणी तुडवत त्या कमळांना गोळा करण्याचा प्रयत्न करू लागतो. कमळ मिळाल्यावर आनंदाने भिम गर्जना करू लागला. त्यांने विजय मिळाल्यासारखा आनंद व्यक्त करण्यासाठी तो त्यांचे शंखू हातात घेतो व जोरांने फुंकतो . त्या आवाजाने ते अरण्य दणाणून निघते. त्या आवाजामुळें त्या अरण्यातील इतर हिंस्र प्राणीसुद्धा त्यांचे ओरडणे सुरु करतात. गुहेत झोपलेले सिंह बाहेर येतात व त्या गजरात आपला आवाज घालतात. एकच गोंधळ उडतो. त्या भागात अरण्यात मध्येच समाधीस्थ बसलेले वायुपुत्र बजरंगबली जे भिमाचे ज्येष्ठ बंधू आहेत त्यांची त्या गोंधळामुळें समाधी मोडली जाते व ते जागृत होतात. त्याने भिमाचा रस्ता अडवून ठेवलेला होता, कळत अथवा नकळत परंतु, मारुती त्या निबिड रानात वाटेतच बसलेले होते. भिमाचा अहंकार जरुरीपेक्षा जास्त झाला होता ते त्याच्या अध्यात्मिक प्रगतीसाठी योग्य नव्हते म्हणून ते घडत होते किं काय? हे सगळे विधिलिखीत होते. हा गोंधळ अशा ठिकाणी कां होत आहे ते मारुतीला त्याच्या दिव्य दृष्टीने समजते. त्यांच्या हे सुद्धा लक्षात येते की, आपल्या लहान भावाचा अहंकार अनावश्यक इतका वाढला आहे. त्याला त्याच्या प्रचंड ताकदीचा गर्व झाला आहे. ते त्याच्यासाठी अनुचित आहे म्हणून कांहीं करावयाला पाहिजे असें हनुमान ठरवतात. त्यांच्या त्या वानर रुपात ते तसेंच भिमाच्या वाटेत एकाद्या वृद्ध कपिच्या रुपात पडून रहातात. अधून मधून तो जांभई देत होता. त्याची लांबलचक शेपूट तो उभी उंच एकाद्या स्तंभासारखी करत होता जणू इंद्राचा विजय स्तंभ असावा व जोराने जमिनीवर आपटत होता. त्या आपटण्याचा आवाज हृदयाची धडकन वाढवणारा होता. जसे तो त्याची शेपुट आपटत असें सगळ्या अरण्यातील हिंस्र श्वापदं जोर जोराने ओरडून त्या आवाजात त्यांचा आवाज मिसळत असतं. त्या शेपटीच्या आवाजांने भिमाच्या छातीतसुद्धा धडकन सुरु झाली, त्याला समजेना हा भयंकर आवाज कसला. प्रत्येक वेळी ती शेपुट आपटली जाई आजुबाजूच्या शिखरांतून मोठे मोठे खडक तुटून खाली कोसळत ते दृष्य कोणालाही घाबरवणारे असें होते. हे काय घडत आहे ते पहाण्यासाठी तो त्या

सोनेरी पान असलेल्या कर्दळीच्या बनात आणखीन आत शिरतो. कांहीं अंतर आत गेल्यावर त्याला एक अजस्त्र आकाराचा वानर वाटेत आडवा झोपलेला दिसतो. त्याला समजते कीं, ह्या वानराच्या शेपटीमुळेंच हे घडत आहे. त्या भल्या मोठ्या आकाराच्या वानराची शेपुट केसाळ होती व टोकाला आकडा असावा अशी बाक तिला होता. त्याचे डोळे लाल होते. त्याचे खांदे भलतेच रुंद होते व कमर त्यामानाने पातळ होती. त्याच्या अंगातून एक प्रकारचे तेज जाणवत होते. त्याची मान यक्षाप्रमाणे रुंद परंतु, तोकडी होती. तो कोणी सामान्य वानर नाही हे भिम समजला पण त्याचे असे वाटेत आडवे पडणे त्याला रुचत नाही. त्याचा चेहरा गुलाबी रंगाचा होता व त्याचे दांत टोकदार व शुभ्र होते. त्याच्या अंगावरील केस खूप लांब होते. भिम ते रुप पहात होता. त्याला समजेना हा कपि येथे काय करत आहे. स्वर्गाच्या वाटेवरच हा असा आडवा का पहुडला आहे त्याला कांहीं समजेना. भिम ठरवतो कीं ह्याच्याशी बोलावे लागेल. म्हणून तो वानराच्या आणखीन जवळ जातो व त्याला विचारतो, जवळ जाऊन तो त्याला आव्हानात्मक अशा तर्हेने विचारतो, त्याचा आवाज करारी व धमकीवजा होता. त्या त्याच्या गर्जनेने पक्षी जोरांने आकाशात उडतात. परंतु, हनूमान जरासुद्धा हलत नाही. डोळे थोडे किलकिले करून तो महाकपि भिमाकडे पहातो एवढेंच होते, त्यामुळें भिमाचा अहंकार डिवचला जातो. भिमाला बजरंगबली बोलतो, "मी माझ्या वनात आराम करत आहे तू कोण येथे अडमडायला आला आहेस? तू सामान्य मानव दिसतोस, अरे मानवा, ही वाट स्वर्गाला जाते तेथे तुझ्या सारख्या मनुष्यास जाण्याची मनाई आहे. तरी तू परत जा. मी येथे मस्तपैकी निजलो होतो व तू माझी झोप मोडली आहेस त्याचे कारण काय?

तुम्ही मानव देवांनी थोडी बुद्धी दिली म्हणून स्वताला जास्त शहाणे समजता व इतर प्राण्यांशी गैरवर्तणूक करता हे योग्य आहे कां? इतर प्राण्यात जे चांगले गुण आहेत जसें नम्रपणा, सहानुभूती, दयाबुद्धी तुम्हा मानवात कां कमी झाले आहेत? तू आता येतांना कांहीं प्राण्याना विनाकारण ठार मारत आला आहेस, त्या प्राण्यांना तू असें कां मारलेस"? विधात्याने प्राण्याना खाण्यासाठी फक्त मारण्याची मुभा आहे परंतु, तीसुद्धा अहिंसक हत्या (दुःख होणार नाही अशा प्रकारे) करावयाचे असते. त्या व्यतिरीक्त कोणालाही दुसर्या जीवाला ठार मारण्याचा अधिकार नाही असें असतांना केवळ वाटेत आला, म्हणून तू

त्यांना ठार मारत होतास, त्याचे समर्थन तुझ्याकडे काय आहे. अशा कृत्यामुळें तुझा अध्यात्मिक र्हास होत असतो ते तुम्हा मानवांना समजत नाही कां? खाण्यासाठी अहिंसक हत्या करण्याची मुभा आहे त्यामुळें पाप लागत नाही पण हे जे तू करत होतास त्यामुळें तुला पाप लागले आहे व ते तू स्वर्गाच्या वाटेवर करत आहेस ह्याचा मी कोणता अर्थ घ्यावयाचा ते सांगशिल कां? असे सगळे दुष्कृत्य करत तू स्वर्गात जाण्याची स्वप्न पहात आहेस कां? तुझ्या अशा बेजबाबदार वागण्यांने तू तुझे किती नुकसान करत आहेस त्याची तुला थोडीतरी कल्पना आहे कां? हे जे तू करत होतास त्यात तुझे अज्ञान होते असे तू जर मला सांगत असशिल तर ते पटणारे नाही. कारण, तू वेदांचा अभ्यास केलेला आहेस हे मी समजू शकतो. खरे कारण असें आहे कीं, तुझा अहंकार माजला आहे. त्याची तुला शिक्षा होईल. आता मला सांग, ह्या निर्मनुष्य प्रदेशात तू एक अहंकारी माणूस काय करत आहेस? ह्यापुढे जाण्यासाठी जी निरहंकारी प्रवृत्ती माणसात असावी लागते ती तुझ्यात अजिबात नाही, म्हणून तू ह्यापुढे जाऊ शकणार नाहीस, आणि म्हणूनच मी असा वाटेत पडलो आहे. आता मला सांग, तू कोण व येथे कां आणि कसा पोहोचलास"? पुढे मारुती त्याला बोलतो, "तू माझे ऐकणार असशिल तर सांगतो, येथे थोडा वेळ थांब. फळं खा, आराम कर, थोडा विवेकांने काम करण्याचा निर्धार कर आणि अहंकार वाढेल असें कांहींही अगदी अनवधानानेसुद्धा तुझ्याकडून होऊ देऊ नकोस. नाहीतर तू नष्ट होशिल. तू सुद्धा माझ्या सारखा वायुपुत्र आहेस म्हणून मी हा सल्ला देत आहे. तुझ्या शारिरीक ताकदीने ह्यापुढे कांहीं साध्य होणार नाही. ह्यापुढे केवळ अध्यात्मिक बळ प्रमाण असते येथे".

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील सदुसष्ठावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग अडुसष्ठावा

वैशंपायन पुढे सांगत असतात, तो शक्तिमान वृकोदर त्या बुद्धीमान वानराचे बोलणे ऐकून स्थब्ध झाला, त्यानंतर भिम त्याची बाजू सांगण्या आधी त्या वानराला विचारतो, "आपण वृद्ध अहात, आपला परिचय द्याल तर मी माझ्याबद्दलची माहिती सांगेन. आपण असे वानराच्या रुपात कां वावरता अहात"? एवढे विचारल्यावर भिम स्वताबद्दल सांगू लागतो, तो सांगतो कीं, तो मानवातील एका क्षत्रिय कुळातील आहे, त्याच्या कुळाचे नांव कुरु आहे. तो पुढे सांगतो कि, त्याची माता कुती असून पंडु राजाचा तो दुसरा पुत्र आहे. तो चंद्रवंशी क्षत्रियांपैकीं आहे. क्षत्रिय ब्राह्मणांनंतर महत्वाचा वर्ण आहे त्यातला तो आहे. माझा जन्मदाता वायुदेव आहे. माझे नांव भिमसेन आहे. असें सगळे भिम मारुतीला सांगतो. ते ऐकल्यावर मारुतीच्या मुखावर हास्य उमटते. आता मारुती त्याचा परिचय देऊ लागतो. तो सांगतो, "मी वानर (वानर ह्या शब्दाचा अर्थ आहे, मानवा सारखा दिसणारा) कुळातील आहे. आम्ही स्वर्गाचे संरक्षण करतो. म्हणून मी तुला ह्यापुढे जाऊ देणार नाही. तू शहाणा असशिल तर आल्या पावली परत जाशिल. नाहीतर तुझा मला नाश करावा लागेल". ते निर्वाणीचे उद्‍गार ऐकल्यावर भिमाला क्रोध होतो व तो अरेरावीच्या भाषेत बोलतो, "जाता येईल कीं, नाही ते ठरवणारा तू कोण"? माझ्या वाटेतून उठ बर्या बोलाने". ते ऐकल्यावर हनुमान त्याला सांगतो, "अरे मुला, मी आता वृद्ध झालो आहे, मला उठवत नाही तरी तू मला उचलून वाटेतून बाजूला ठेवशिल तर बरे होईल. असें केलेस तर तू जाऊ शकशिल". भिम त्याला उत्तर देतो, "ब्रह्माच्या आदेशानुसार कोणालाही ओलांडून जाणे अवैध समजले जाते, त्या करता मी तुमच्या अंगावरून पाय टाकून जाणार नाही. जर मला तो नियम माहित नसता तर तसे केले असते जसें बजरंगबलीने समुद्र उडी मारून पार केला होता आदि काळात, पण आता नाही". ते ऐकल्यावर हनुमान गमतीने विचारतो, "हा बजरंगबली कोण ज्याने समुद्र उडी मारून पार केला होता? मला सांग जर तुला त्याबद्दल कांहीं माहिती असेल तर". ते ऐकल्यावर भिम त्याला सांगतो, "तो माझा मोठा बंधू आहे. तो सर्वगुणसंपन्न आहे, आणि बुद्धीचा मेरूमणी आहे. त्याचे शरीराचे व मनाचे सामर्थ्य अमर्याद

आहे. तो रामाच्या काळात त्यांच्या वानर कुळाची मुख्य होता. त्यांने रामाच्या पत्नीला रावणांने कोठे ठेवले होते ते शिताफीने शोधून काढले होते. त्यासाठी तो समुद्रावरून एका झेपेत उडी मारून लंकेला गेला होता. कित्येक योजने ते अंतर होते, त्यावरून त्याची क्षमता किती मोठी होती ते लक्षात येईल. असा बजरंगबली माझा भाऊ लागतो व माझ्या अंगात त्याच्या सारखीच अफाट शक्ती आहे. म्हणून तू मला त्रास दिलास तर मी तुला आठवण राहिल अशी सजा करीन. जास्त हुशारी करशिल तर तुला मी क्षणात यमाच्या घरी धाडीन.

वैशंपायन पुढे सांगत असतात, हनुमानाला समजते किं, भिमाचा गर्व वाढला आहे. ते समजल्यावर तो भिमाला बोलतो, "अरे निष्पाप मुलां, माझ्या अंगात त्राण उरलेला नाही म्हणून तू मला उचलून बाजूला कर व पुढे जा. निदान माझी शेपटी जी तुझ्यापुढे पडली आहे ती उचलून बाजूला करशिल तर बरे होईल". मारुतीचे ते विनवणी करणारे बोलणे ऐकून भिमाला त्या वृद्ध कपिची दया येते. भिमाचा गर्व इतका झाला होता, त्याला विवेक उरला नव्हता. त्यांने ती जाडजुड शेपूट उचलण्याचा प्रयत्न केला. तो गर्वाने फुललेला भिम मनात विचार करतो कीं, ह्याची शेपुट पकडून त्याला भिरकावून यमाच्या घरीच फेकून देतो. परंतु, ती मारुतीची शेपूट टीचभरसुद्धा त्याला हलवता आली नाही. त्यांने दोनही हातांने ती शेपुट पकडून खेचण्याचा प्रयत्न केला पण ती तो हलवू शकला नाही. भिमाचा राग अनावर झाला व मोठ्या ताकदीने ती शेपुट उचलण्याचा जोराने प्रयत्न पुनः पुन्हा करत रहातो पण व्यर्थ. बराच प्रयत्न केल्यामुळें त्याचे डोळे  पांढरे झाले. कधी नाही तो थकवा त्याला जाणवू लागला. त्याला मारुतीची शेपुट हलवता आली नाही. त्यामुळें तो शरमेने खाली मान घालून उभा राहिला. भिमाचे गर्वहरण झाले होते. तो हात जोडून त्या कपिला बोलतो, "अहो, आपण कोणी सिद्ध किंवा देव अथवा गंधर्व कां गुह्यक (शिवभक्त) असला पाहिजे. मला सांगा आपण कोण अहात? मला सांगा, जर ते खास गुपित नसेल व माझी ऐकण्याची योग्यता असेल तर, आपण कोण व असें वानराच्या रुपात कां येथे बसला अहात? मला ते ऐकण्याची उत्सुकता आहे. मी खरोखरच माझी मर्यादा समजलो नाही, त्याकरता मला क्षमा करा". ते ऐकल्यावर मारुती समजला किं भिमाचे गर्वहरण झाले आहे. त्यानंतर तो महाबली बजरंगबली त्याला सांगतो, "अरें शत्रूंचा नाश करणार्या बलाढ्य

योद्ध्या, मी तुला सविस्तरपणे सांगतो, मी कोण आहे. ऐक पंडुच्या मुला, मी वायुदेवाला त्याच्या पत्नीपासून झालो आहे, माझ्या आईचे नांव आहे केसरी. मी वानर कुळातला आहे. माझे मूळ नाव आहे हनुमान कारण माझी हनुवटी खूप मोठी आहे. साधारणपणे वानर कुळातील माणसांच्या हनुवट्या इतक्या लांब नसतात पण माझी आहे. आमच्या वानर लोकांचा राजा सुग्रीव माझा मित्र झाला होता. तो सुग्रीव आणि शक्राचा मुलगा वली हे सुद्धा मित्र होते. माझी व सुग्रीवाची मैत्री अशी होती जशी वारा आणि अग्नी ह्यांची असते. सुग्रीवाला त्याच्या भावाने, वलीने, बाहेर काढले होते तेव्हां तो माझ्याकडे रहात होता. माझ्या हृस्यमुख नांवाच्या घरी. त्या सुमारास माणसातील राजा दशरथाचा मोठा मुलगा राम, जो साक्षात विष्णू होता, आमच्या भागात त्याच्या पित्याच्या आज्ञेने रहावयास आला होता. त्याच्या बरोबर त्याची पत्नी व भाऊ होते. रामाच्याकडे एक धनुष्य आणि बाण होता. तो एका बाणाने लढत असें कारण, त्याचा बाण लक्ष्य मारल्यानंतर पुन्हा त्याच्याकडे जात असें. आमच्या दंडकारण्यात राम त्याच्या पत्नीबरोबर रहात असतांना जुन्या रागाचा वचपा काढण्यासाठी लंकेश्वर रावण रामाला आव्हान देण्यासाठी रामाची बायको त्याच्या पासून छल कपटाने हिरावून घेतो व त्याच्या लंकेत एका उपवनात ठेवतो. वस्तुतः रावणाला त्या रामाच्या पत्नीत अजिबात स्वारस्य नव्हते. त्या कारस्थानात त्याला मारिच नांवाचा त्याचा साथीदार, एक सुवर्णाचे हरण बनून मदत करतो.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील अडुसष्ठावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग एकोणसत्तरावा

हनुमान पुढे सांगतात, रावणांने त्या रघूच्या वंशजाची भार्या पळवल्यावर तो आपल्या पत्नीच्या शोधात त्याच्या धाकट्या भावाबरोबर फिरत असतां, एका पहाडाच्या शिखरावर सुग्रीवाला भेटला. त्यांच्यात सलोखा झाला. त्याने वलीचा वध केला व सुग्रीवाला राजगादीवर बसवले. सुग्रीव राजा झाल्यावर त्यांने त्याचे असंख्य वानर हस्तक रामाच्या बायकोच्या शोधासाठी चौफेर धाडले. मीसुद्धा त्यात होतो. मी व माझे सैन्य दक्षिणेकडे लंकेत शोध घेण्यासाठी गेलो होतो. आम्हाला मदत करण्यासाठी पक्षीसुद्धा आले होते. त्यातील एक पक्षी आम्हाला सांगतो, सीता रावणाच्या लंकेतील एका उपवनात कैदेत आहे. तिचा शोध घेण्यासाठी रामाच्या सांगण्यावरून व सुग्रीवाच्या आदेशांने मी शंभर योजने दूर असलेल्या व समुद्रापलिकडील लंकेत गेलो. तेथे गेल्यावर मी रावणाचे राज्य पाहिले.

रामाची पत्नी, जनक राजाची मुलगी मला दिसली. त्यावेळी रावणाच्या लोकांनी मला बांधून ठेवले पण मला बांधून ठेवणे शक्य नसते, त्यामुळें मी सर्व लंकेला आग लावली. सगळी लंका तिच्या मोठमोठ्या वाड्यांसकट जळून गेली. तेथून मी परत आलो व रामाला सगळे सांगितले. त्यानंतर राम लंकेवर स्वारी करण्यासाठी आम्हा वानरांची सेना घेऊन लंकेवर चाल करून गेला. माझ्या सारखे सगळे उडी मारू शकत नव्हते म्हणून त्यांनी समुद्रात एक तरता साकव बांधला. त्याला रामसेतू म्हणतात. त्याच्या मार्गाने सगळे वानर सैन्य लंकेत गेले. रामाने त्याच्या क्षत्रिय सामर्थ्याने तेथील राक्षस मारले. रावणाचा भाऊ बिभिषण रामाला मिळाला व रावण मेल्यानंतर त्याला लकेचा राजा घोषित केले. सीता मिळाली जसें वेदातील हरवलेले अर्थ मिळावेत. त्यानंतर तो दशरथाचा मुलगा रधूवंशी राम त्याच्या राजधानीला परतला. त्यानंतर मी रामाकडे एक आशिर्वाद मागितला की, जोवर रामाचे नांव ह्या जगात आहे तोवर मी जीवंत राहीन. त्यांने तो आशिर्वाद दिला आहे. सीतामाईच्या कृपेने मला येथे सगळे मिळते आहे. रामाने एकराशे वर्षे राज्य केले. त्यानंतर तो त्याच्या निजस्थानी गेला. येथे फिरणारे गंधर्व आणि अप्सरा माझी करमणूक त्यांच्या

गाण्याबजावण्याने करतात. म्हणून मी येथे आहे. अरे मर्त्य भिमा, ह्या वाटेने मर्त्य जाऊ शकत नाहीत. ह्या मार्गाने फक्त देव ये जा करू शकतात. तू ज्या सरोवराच्या शोधात आला आहेस तो त्या वाटेवरच आहे. तुला दुसर्या कोणी मारू नये अथवा जिंकू नये म्हणून मी तुला अडवत आहे. येथे जिंकण्यासाठी फक्त आणि फक्त अध्यात्मिक तेज असावे लागते. ते तू पाहिजे तसे मिळवलेले नाहीस. तुझा अहंकार तुला अडवत आहे. त्या करता तू तपस्या करणे आवश्यक आहे. केवळ शरीराच्या ताकदीने ते होणार नाही.
अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील एकोणसत्तरावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग सत्तरावा

वैशंपायन सांगतात, हनुमानाची कथा ऐकल्यावर तो पांडव लवून नमस्कार करून भिम त्याला वंदन करतो, त्याला अत्यानंद होतो. त्याच्या मोठ्या भावाची अशारितीने कां होईना पण भेट झाली म्हणून तो स्वतःला भाग्यवान समजतो. तो मारुतीकडे पहात म्हणतो, "आता मला माझा खरा भाऊ भेटला आहे. तुम्ही माझ्यावर मोठी कृपा केली आहे. त्याबद्दल मी तुमचे कसे ऋण फेडणार असा प्रश्न पडला आहे". पुढे भिम त्याच्या वडील भावासा विनंती करतो किं, "आता तू माझ्यावर एवढी कृपा कर कीं मला तुमचे ते दिव्य दर्शन व्हावे. ज्या रुपात आपण तो माश्यांने व सुसरीने भरलेला समुद्र एका उडीत ओलांडला. ते झाले म्हणजे मी तुमच्या ह्या कथानकावर विश्वास ठेवू शकेन. ते भिमाचे बोलणे ऐकल्यावर मारुती हसतो. हनुमान भिमाकडे पहात बोलतो, "त्या युगातील गोष्टी आजच्या द्वापर युगात तशाच्या तशा प्रकट करता येणार नाहीत. प्रत्येक युगाची अभिव्यक्ती त्या युगाच्या स्वभावानुसार असते. म्हणून कृतयुगातील घटना तशीच आजच्या द्वापार युगात मला व्यक्त करता येणार नाही. त्या काळातील मी व आजच्या काळातील मी हेसुद्धा भिन्न आहोत. जमीन, माती, पाणी, प्राणी, वनस्पती, पक्षी, मासे, सगळे चराचर बदलले आहेत. जसें माणूस मोठा होतो जसें त्याच्यात बदल होत जातात तसेंच ह्या युगांचे आहे. कृतयुग पूर्ण सात्विक स्वभावाचे होते. आजचे द्वापार युग मिश्र भावाचे आहे. त्यात रजो तम भाव विशेष आहे, त्यामुळें सगळे चराचर त्या भावानुरूप आहेत. तसेंच त्याकाळातील सिद्ध, देव, राजर्षी त्या काळानुरूप होते ते ह्या काळात तसें तुला दाखवता येणार नाही. म्हणून मी तुझी ती इच्छा पूर्ण करू शकणार नाही. मी जरी अमर झालो असलो तरी हा युगाचा नियम मला लागू होत असल्यामुळें माझे आजचे स्वरुप आजच्या युगाला साजेसे आहे. काळ त्याचा प्रभाव पाडत असतो सगळ्या गोष्टींवर हे समजून घे".

त्यावर भिम बोलतो, "मला सांगा ह्या निरनिराळ्या युगांचे कालमान किती असते? त्या युगातील इतर गोष्टी जशा, त्या युगातील सुखाचे. आनंदाच, दुःखाचे, गुणाचे, अवगुणाचे,

हिताचे, प्रकार भिन्न असतील तर त्याची माहीती मला सांगाल तर बरे होईल. त्या भिन्न युगातील जन्म, मृत्यू कसे होते ते मला समजून घ्यावयाचे आहेत".

त्यावर हनुमान त्याला सांगतात, "अरे मुला, कृतयुगात सर्व जगात एकच धर्म होता. त्याला नित्य धर्म असे समजत. ते उत्तम युग होते. त्या युगातील माणसें त्या धर्माचे पालन न चुकता करत असतं. त्या धर्माचे नांव होते, चांगुलपणा. सगळे प्राणी एकमेकांस सांभाळून जगत होते. म्हणून त्या युगाला सत्य अथवा कृत (बिनचुक) युग असें नांव होते. त्या युगाचा कालखंड फार मोठा होता. परंतु, ब्रह्माच्या नियमानुसार कांहीं बदल होत गेले. कृत युगात देव, दानव, माणूस, राक्षस, नाग, यक्ष गंधर्व असें वेगवेगळे नव्हते ते मिसळून रहात होते. त्या युगात व्यापार नव्हता. सगळे विनामुल्य उपलब्ध होते. कोणी मालक नव्हता व कोणी नोकर, दास, गुलाम नव्हते. त्या युगात लोकसंख्या मर्यादीत होती. कोणी गरीब, कोणी श्रीमंत, कोणी चोर व कोणी साव असें नव्हते. कोणी काबाड कष्ट करत नव्हते. लोकसंख्या मर्यादीत असल्यामुळें कधी कशाची कमी जाणवत नव्हती. त्या काळातील लोकांची इच्छाशक्ती इतकी प्रभावी होती किं, त्यानी इच्छा केली कीं, ती गोष्ट प्राप्त होत होती. त्याग आणि ममता ह्यांचे कर्तव्य प्रमाण मानले जात होते. त्या युगात पाप विचार नसल्यामुळें त्यातून उत्पन्न होणार्या गोष्टी जशा रोगजंतू, त्यातून उत्पन्न होणारे आजार असें कांही नव्हते. त्यामुळें माणसे, प्राणी, वनस्पती शेकडो वर्षे जगत असतं. माणसाच्या सहा प्रवृत्ती (काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर) फक्त योगक्षेमापुरत्या कार्यरत होत्या. कोणी कोणाचा द्वेष करत नव्हते, कोणी कोण्या दुसर्याशी तुलना करत नव्हते, ज्यामुळें मद व मत्सर उत्पन्न होतात. प्रत्येक जण आपल्यातल्या आपल्यात संतुष्ट, समाधानी रहात होते. तुलना फक्त स्वताची स्वताशी करत होते त्यातून त्यांचा अध्यात्मिक विकास होत होता. सगळ्यांना पुरेल इतके मिळत होते म्हणून कोणी साठा करत नव्हते. त्यामुळें चढाओढ नव्हती. पृथ्वी, स्वर्ग आणि नरक एकत्र होते कारण नरक नव्हता. माणसाच्या सहा प्रवृत्ती जेव्हां योगक्षेमाशिवाय माणूस वाढवतो तेव्हां सगळे दोष उत्पन्न होत असतात आणि त्यातून नरक उत्पन्न झाला. तसे कृतयुगात होत नव्हते. असें साधारण परिस्थितीत होते परंतु, अरे भिमा, कांहीं प्रमाणात हे दोष, कांहींशा तुरळक प्रमाणात कृतयुगातसुद्धा अस्तित्वात होते. म्हणजे शंभर टक्के कृतयुग सुद्धा बिनचूक नव्हते. ब्रह्म सगळ्यांना

सहजपणें उपलब्ध होते. त्याकरता वेगळी तपस्या करावी लागत नव्हती कारण, सहा प्रवृत्ती नेहमी शरीराच्या आवश्यकतेपुरत्या मर्यादित होत्या. सगळे विकार तेव्हां उत्पन्न होतात, जेव्हां त्या सहा प्रवृत्ती मध्ये आत्मा लक्ष घालू लागतो. नारायण त्याच्या शुभ्र रंगात सगळ्या चराचरांना भावत होता. कृतयुगात माणसांचे चार वर्ण स्वाभाविक होते. त्यात कृत्रिमता अजिबात नव्हती. त्याकाळात भ्रष्ट ब्राह्मण नव्हते, भ्रष्ट क्षत्रिय नव्हते आणि भ्रष्ट वैश्य नव्हते, भ्रष्ट शुद्रसुद्धा नव्हते. ते आपापल्या वर्णाचे कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत होते. त्या सगळ्यांचा एकच उद्देश असें कीं, ब्रह्माशी एकरुप होणे. ज्या ब्रह्मातून ही सृष्टी उत्पन्न झाली त्यात ती पुनः एकरुप होणे हेंच सर्वस्वी अंतिम ध्येय असें कृतयुगात सगळ्यांसाठी. प्रत्येक जण कळत नकळत सोहम (श्वासोंश्वासाचा ध्वनि) जपत असें. त्यालाच तपोश्वरण म्हणतात. त्रेतायुगात तपोश्वरणाची जागा जपोच्चाराने घेतली गेली. त्यात, "ओम नमोः शिवाय", विशेष महत्वाचा ठरला. त्या  सगळ्यांचे एकच ज्ञान केंद्र होते त्याचे नांव वेद होते. वेद कृतयुगात एकच होता. कृतयुगात माणसे त्यांच्या जीवनाचे चार भागात विभाजन करत असतं. पहिल्या भागात ब्रह्मचर्य पाळले जात असें, त्या काळात वेद समजून घेण्याचा प्रयास होत असें. त्यापुढे समाज संवर्धनार्थ गृहस्थाश्रम होता. त्यात समाजाची ऋण फेडण्याचा प्रयास तो करत असें. समाजाचे ऋण फेडल्यानंतर तो वानप्रस्थाश्रमी जात असें व तेथे सर्वकाळ तपोश्वरणात त्याचा उर्वरित काळ व्यतित करत असें. वानप्रस्थाश्रमात तरी तो समाजाशी संलग्न असे परंतु, जे उरलेसुरले ऋण फिटले कीं मग तो संन्यासाश्रमात जात असें व तेथे केवळ तपोश्वरणात त्याचा उर्वरित काळ व्यतित करत असे. त्या काळात तो जीवनाचे विविध अर्थ समजून घेत असें. ते अनुभवसिद्ध ज्ञान वेदात समाविष्ट होत होते व अशारितीने वेदांचा, त्यातील अंगांचा विकास होत गेला. त्या काळात व्रतस्थता महत्वाची होती. कृतयुगात त्याग महत्वाचे धोरण होते. व्रतस्थतेत ब्रह्मचर्य, मिताहार, मौन हे महत्वाचे होते. त्याशिवाय सत्त्वशिलता सुद्धा महत्वाची होती. त्यात सत्यवचन, त्याग, अनुकंपा, कृपा, सहकर्य, न्याय आणि ममता हे गुण आचरण्यात असतं. ब्रह्मचर्यात त्याला त्याच्या भोगेंद्रीयांचे संयमन करावयाचे असते. त्यासाठी औदासिन्य (भोगांबद्दल) राखण्याची सवय करावयाची असते. स्त्रीबद्दल सन्मानाची भावना असें, त्यामुळे ब्रह्मचर्य साध्य होत असें. त्यात सगळ्या भोगेंद्रीयांचे

नियमन होते. खाणे, पिणे, निद्रा, संभोग, ह्यांचे मर्यादा योगक्षेमानुसार राखणे हे त्याचे कार्य असें. सहा प्रवृत्तीं पासून त्यांची व्यसने उत्पन्न होण्याचे प्रमाण त्रेतायुगात विशेष वाढले. योगक्षेमापेक्षा अधिक त्यांत गुंतण्याची प्रवृत्ती वाढत गेली. ते वाढणे त्यानंतरच्या युगांत अधिकाधिक होत गेले. त्याप्रमाणे चराचरात बदल होत गेले. कृतयुगात तीन गुण (सत्व, रज आणि तम) नव्हते. फक्त सत्व गुण प्रभावी होता, इतर दोन गुण सुप्तावस्थेत होते. आता तुला सांगतो त्रेतायुगाच्या गोष्टी. त्रेतायुगात त्यागाची परंपरा कमी झाली. ममतेची जागा प्रेमांने घेतली. प्रेमात देण्या घेण्याचा व्यवहार अपेक्षित असतो. ममतेत फक्त देणे असते म्हणजे त्याग असतो. म्हणून ममता अथवा माया हे अध्यात्मिक दृष्ट्या श्रेष्ठ मानले जाते व प्रेम कनिष्ठ समजले जाते. प्रेमात व्यवहार जर जमला नाही तर द्वेष, क्रोध, तिरस्कार, सूडबुद्धी इत्यादी उत्पन्न होण्याचा संभव असतो म्हणून प्रेम पापमुलक समजले जाते. प्रामाणिकपणासुद्धा कमी झाला. पुण्याचे कार्य कमी झाले त्यामुळें समाजाची अध्यात्मिक पातळी खाली उतरली. त्यामुळें देव देवता माणसापासून दूर जाऊ लागल्या. त्याचा परिणाम स्वरुप स्वर्ग पृथ्वीपासून दूर गेला. त्याच प्रमाणे नरक उत्पन्न झाला ज्यात पापी लोकांची व्यवस्था होत गेली. असुर व राक्षस जास्त प्रबळ झाले. नारायणाचा रंग जो शुभ्र होता तो गुलाबी झाला. माणसांचा सत्यावरील विश्वास कमी झाला. कमी झालेल्या पुण्याची भरपाई करण्यासाठी कर्मकांडाचे महत्व वाढले. ब्राह्मणांत भ्रष्ट ब्राह्मणांची संख्या आढळून येऊ लागली. म्हणजे परिस्थिती कृतयुगाप्रमाणे राहिली नाही. भ्रष्ट ब्राह्मणांची जशी संख्या वाढत जाते तसे आणखीन भ्रष्ट कृत्ये कार्यरत होत जातात त्याची सुरुवात त्रेतायुगापासून झाली. जे तपस्या, व्रतस्थता, सत्वशिलता, कृतयुगात स्वाभाविक होते त्यातसुद्धा भ्रष्टता शिरकाव करून गेली. त्या सगळ्यात खोटेपणा आढळून येऊ लागला. चार वर्णाचे लोक त्यांची कर्तव्ये पहिल्यासारखी करीनाशी झाली. एकमेकांशी तुलना करण्याची प्रवृत्ती बळावली त्यातून मद, मत्सर, गर्व, कलह समाजात उत्पन्न झाले. सत्यापेक्षा असत्याची चलती होऊ लागली. द्वापारयुगात परिस्थिती आणखीनच बिघडली. नारायणाचा रंग लाल झाला. वेदाचे चार विभाग झाले. खोटेपणा वाढला. माणसाची मनस्थिती बिघडू लागल्यामुळें वेडसर लोक आढळू लागले. कृतयुगात देवांच्या पुजा होत नव्हत्या त्या कांही प्रमाणात त्रेतायुगात तुरळकपणे सुरु झाल्या. त्यात इंद्र, वरूण, मित्र

अशा देवता विशेष यज्ञांच्या माध्यमाने पुजल्या जाऊ लागल्या. द्वापारात त्याचे प्रमाण वाढले. त्यात सुद्धा भ्रष्टता आणखीन वाढत गेली. वेदाची वाटणी झाली. कांहीं चारही वेदांचा अभ्यास करत होते तर कांहीं फक्त तीन व कांही फक्त दोन वेद शिकू लागले कारण ब्राह्मणांत वैश्य शिरले कारण खरे ब्राह्मण नामशेष झाले होते. खरे ब्राह्मण क्वचितच कोठे आढळत, असें झाले. सर्वच अध्यात्मिक कामे भ्रष्ट होण्याच्या अवस्थेत गेली होती. वेदांचा विसर पडला. कर्मकांडानी वेदांची जागा घेतली. ह्यापुढे कलीयुगात परिस्थिती सर्वच बाबतीत आणखीन बिघडत जाणार कारण कलीयुगात खर्या ब्राह्मणाची जागा वैश्यांनी आणि शुद्रांनी घेतलेली असेल. क्षत्रियांची जागा शुद्र म्हणजे भ्रष्ट क्षत्रिय घेतील. वैश्य खोटे बोलणारे असतील. व्यापाराची जागा चोरी घेईल. द्युताचे प्राबल्य वाढेल. सगळी अर्थ व्यवस्था सट्ट्यावर आधारित अशी होईल. असुरी संपदा प्रबळ होईल व दैवी संपदा लोप पावेल. प्रामाणिकपणा विरळा होईल. शास्त्रांचा अभ्यास होणे थांबेल. वेदांचा विसर पडेल. सर्वच ठिकाणी खोटेपणा, दंभ, मिथ्याचार हे महत्वाचे ठरतील. नारायणाचा रंग निळा होईल. सहा प्रवृत्ती सहा दोष म्हणून सर्वत्र प्रचारात येतील. म्हणून त्यांचा उल्लेख सहाशत्रू (षड्रिपू) असा होऊ लागेल. कारण त्यांच्या व्यसनांत अडकलेले आत्मे पापमय जीवन जगू लागतील. खर्यापेक्षा खोटेच जास्त महत्वाचे होईल. पापाचे प्रमाण वाढल्याने रोगराई, दुष्काळ, अति पाऊस, अवर्षण, परचक्र, त्यातून वाढणारे अत्याचार, बलात्कार, क्रौर्य ह्यांचे प्रमाण इतके वाढेल कीं, नरक व पृथ्वी एकच असे चित्र पुढे येईल. अन्याय ही नित्याची बाब होईल. अशा विपरीत गोष्टी वाढल्यानें कलीयुगाच्या अंत काळी नारायणाचा रंग काळा होणार आहे. येणार्या वाईट परिस्थितीवर मात करण्यासाठी लोक धार्मिक कर्मकांड करण्यात वेळ घालवतील. अधःपात पूर्ण झालेला असेल. मिथ्याचार धार्मिकतेच्या नांवाखाली वाढत जाईल. ब्राह्मण म्हणून वैश्य आणि शुद्र कर्मकांडांचासुद्धा धंदा करु लागतील. ते त्यांच्या सोयिनुसार अनेक देव, पिशाच्च, यक्ष, सिद्ध अशांची मंदिरे उभारतील व तो एक धंदा मोठ्या प्रमाणात वाढत जाईल. असें असले तरी प्रत्येक युगात सगळी युग कमी जास्त प्रमाणात असतील व त्यामुळें माणसाला त्याचा मार्ग सांपडणे शक्य होईल. सहा प्रवृत्ती मध्ये आत्मे अडकून जातील, त्यामुळें पापाचे प्रमाण वाढत जाईल. भ्रष्ट ब्राह्मणांनी केलेले कर्मकांडं अपेक्षित परिणाम देण्याऐवजी विपरीत प्रभाव

पाडण्यास सुरुवात करतील. विश्वास नष्ट होईल. कृतयुगात देव व माणूस एकत्र भेटू शकत. त्रेतायुगात ते थोडे कमी झाले. द्वापार युगात माणूस देवांची पुजा करू लागला व त्यांच्या कृपेसाठी विनवणी करू लागला. कलीयुगात देव माणसाला दर्शन देणे बंद होईल व त्यांच्या जागी यक्ष, राक्षस, पिशाच्च, दैत्य, दानव देवाचे सोंग घेऊन माणसाला त्यांची पुजा करावयाला लावून त्याचे पुण्य खाऊन टाकतील. कांहीं जागी सिद्धांची देवाऐवजी पुजा होऊ लागेल. परिणामतः असुरीसंपदा प्रधान प्रवृत्ती बनलेली सर्वथा आढळेल. मला ओळखणे ह्यासाठी द्वापार युगात कां अवघड आहे ते तुला समजले असेल. मी चार युगांचे स्वभाव सांगितले". एवढे सांगून मारुती भिमाला आशिर्वाद देतो कीं. ते सदैव यशस्वी होईल. त्यानंतर त्याला परत जाण्याचा सल्ला देतो. तरी भिमाचे समाधान झालेले नव्हते, तो विचारतो, "अहो बजरंगबली, तुम्ही सांगितले किं, कृतयुगात माणूस व देव एकत्र फिरू शकत असतं परंतु, नंतरच्या युगात ते तसे राहिले नाही त्यावर मला विचारावयाचे आहे कीं, माणूस व देव ह्यात फरक काय"? मारुती सांगतो, "माणूस असा आत्मा, ज्याच्यात दोष उत्पन्न झाले आहेत, जसें अहंकार व त्या अनुषंगाने येणारे सहा दोष. देवांत अहंकार नसतो व त्या अनुषंगाने येणारे दोष त्यांच्यात नसतात. म्हणून देवांत वासना नसतात. अशामुळें माणसातूनच देव तयार झालेले आहेत, ज्या माणसांनी आपले दोष (अहंकार व सहा दोष) नष्ट केले आहेत त्यातून ज्यांना ब्रह्माने ह्या सृष्टीच्या व्यवस्थापनार्थ कांहीं कार्य करण्यासाठी निवडले ते देव बनतात. जेव्हां देवांत त्यांच्या चुकीच्या कृत्यामुळें ते दोष उत्पन्न होतात तेव्हां त्या देवाला माणसात जन्म घ्यावा लागतो व पुनः त्याच्या सुधारण्याची प्रक्रीया सुरु होते. हे असें अव्याहतपणे होत आहे. सर्वच मोक्षप्रद माणसांचे देव होत नाही. ज्यांची तशी नेमणूक झाली नाही ते प्रणव अवस्थेत नित्य असतात. जसे राखीव दल असावे. केव्हांही ब्रह्मदेव त्यांच्या पैकी कोणालाही दैविक कामासाठी आवाहन करू शकतो व त्यानंतर तो मुक्त आत्मा देवरुपांने प्रकट होऊ शकतो. देवांचे त्यांच्यावर टाकलेल्या जबाबदारीनुसार असंख्य प्रकार असतात. अशी ह्या सृष्टीच्या व्यवहाराची व्यवस्था असते".

लोमस सांगतात, त्या स्पष्टीकरणाने वृकोदराचे समाधान झाले आहे असें त्याच्या चेहर्यातून दिसत होते. अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील सत्तरावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग एकाहत्तरावा

ते मारुतीचे विवेचन ऐकल्यानंतर भिम त्याला लहान मुलाने जसा आग्रह करावा तसें बोलतो, "तरीसुद्धा मी तुमचे ते रुप पाहिल्याशिवाय परत जाणारच नाही. जर आपली माझ्यावर कृपा झाली असेल तर ते करणे आपल्याला खचितच अशक्य नाही".

वैशंपायन पुढे सांगतात, मारुती त्यावर स्मित करून, भिमाला त्यांचे ते रुद्र रुप मायावी पद्धतीने दाखवतात. मारुतीचे ते रुप फार विशाल होते. त्याचा आकार इतका वाढला किं, विंध्य पर्वत त्यापेक्षा लहान वाटावा. ते रुप पाहून भिमाच्या हृदयाची धडकन वाढली. कधी व कोणालाही न घाबरणारा तो पंडुपुत्र भयचकित झाला. त्याच्या अंगावरील रोम ताठ उभे झाले. त्याच्या तोंडाची बोबडी वळली. तरी ते स्वरुप वंदनीय होते. आपोआपच त्याचे दोनही हात जोडले गेले. मारुतीचे डोके गगनात भिडलेले होते. त्यानंतर बाजूला बसलेले मारुती त्याला म्हणाले, "अरें भिमा, तू माझे मस्तक पाहू शकणार नाहीस. मी असा वाढत गेलो व इतका मोठा झालो कीं, माझे एक पाऊल येथे व दुसरे पाऊल रावणाच्या लंकेत पडले त्यानंतर मी रावणाच्या लंकेत लहानशी उडी मारून गेलो व नंतर पुनः माझे रुप नेहमी सारखे केले. हि विद्या जिला अणिमा व गिरीमा असें म्हणतात ती कृतयुगात सहज होती. द्वापारात ते शक्य नाही". त्यावर भिम विचारतो, "ज्येष्ठ बंधू मला सांग, तू हे वानराचे रुप कां घेतले आहेस"? बजरंगबली सांगतात, "अरें ह्या सृष्टीतील प्रत्येक प्राणी कोणत्या ना कोणत्या दैविक शक्तीचे प्रतिनिधी स्वरुप आहेत. वानर हे महादेवाचे एक प्रातिनिधिक रुप आहे. (हल्लीची माकड व हे वानर ह्यात फरक आहे. हा वंश आता अस्तित्वात नाही.) निरनिराळ्या युगात निरनिराळे प्राणी, मासे, पक्षी देवांची प्रातिनिधिक असतात. जसें नारायणाचे प्रातिनिधिक रुप आहे सिंह. लक्ष्मीचे आहे घुबड".

वैशंपायन पुढे सांगतात, ते विलक्षण रुप पाहून तो वायुपुत्र विस्मय चकित झाला. त्याला कांहीं सुचेना. तो हात जोडून मारुतीला सांगतो, "अहो महामुनी, आता आपले सामान्य रुप धारण करावे मला तुमचे हे रुप जास्त काळ पहाता येणार नाही. अशा शक्तिमुळें आपण रामाला रावणाशी लढण्यात मदत केली ते समजणे आता मला सोपे झाले आहे.

अशा रुपात आपण संपूर्ण लंका सहज जाळू शकलात त्यात कांहीं नवल नाही. कोणताही शत्रू आपल्यासाठी कःपदार्थ ठरतो. ते बोलल्यानंतर भिम मारुतीला विचारतो, "आपण एकट्याने रावणाचा नाश लिलया करू शकला असतांना रामाची काय गरज झाली"? त्यावर हनुमान बोलतात किं, "प्रत्येकाचे कार्य आखून दिलेले असते, ते त्याने करावयाचे असते. रावणाचा निःपात करण्याचे काम रामाला दिले होते म्हणून मी म्हणजेच महादेव, त्याला ह्या रुपात सहाय्य करत होतो. जसें कौरवांचा नाश तुझ्या वडील भावाच्या करवे लिहीला आहे तेव्हां तोच ते करील व तुम्ही पांडव त्यात सहभागी असाल तसेंच ते होते. रामाचे महत्व वाढवण्याचे ठरले होते म्हणून तो पुढे झाला. तसें झाले नसते तर रामाची भक्ती कोणी केली नसती. कलीयुगासाठी विष्णूचे हे रुप ठरलेले आहे. हे सगळे ठरल्याप्रमाणे होत असते. सृष्टी चालवण्यासाठी अशा रचना आवश्यक असतात. बर्याच वेळा नायकाला मदत करणारा त्याच्या पेक्षा जास्त मोठा असतो परंतु, तो ठरलेल्या कार्यक्रमानुसार अंधारात रहाणे पसंत करत असतो. नायकापेक्षा नायक घडवणारे जास्त मोठे असतात पण ते मागे राहून काम पहात असतात. हि ह्या सृष्टीच्या कार्याची पद्धत आहे. ह्या पद्धतीमुळें सृष्टीचे कार्य निर्धोकपणे होत रहाते". एवढे सांगून मारुती भिमाला आदेश देतो किं आता त्याने निघावे. एका दिशेकडे बोट करून बजरंगबली भिमाला सांगतो, "त्या दिशेने जा म्हणजे तुला सौगंधिका अरण्य लागेल. त्याकडे कुबेराचे उपवन आहे. त्याचे संरक्षण यक्ष आणि राक्षस करत असतात. तेथे जाऊन तू स्वतः तेथील कमळ काढून घेऊ नकोस. कारण माणसाने असे केले तर देवांना ते रुचत नाही. त्यामुळें देवांचा अवमान झाला माणसाकडून असें समजले जाते. अशारितीने देवांची मर्जी राखलीस तर तुझी कामं लवकर होतील. कारण ह्या सृष्टीचे कार्य देवांकडे सुपुर्द केलेले आहे. ही व्यवस्था त्रेतायुगापासून कार्यरत आहे. म्हणून त्याप्रमाणे काम कर. देवांची एक कमजोरी आहे ती तुला सांगतो, त्यांची स्तुती करावी कीं, ते प्रसन्न होतात. त्यांना प्रश्न विचारावयाचे नाहीत कारण, ते त्यामुळें नाराज होत असतात. तुला तुझे काम करून घ्यावयाचे असेल तर त्यांची नाराजी ओढवून घेऊ नकोस असें तुला सुचवावयाचे कारण, तुझा अहंकार तू वाढवून घेतलेला आहेस तो तुझ्या कामात अडचणी उत्पन्न करू शकतो. त्याला नैतिकतेचे नियम असें समजले जाते, जे पाळणे तुला आवश्यक आहे. ब्रह्मदेवसुद्धा अशा स्तुतीने

संतुष्ट होतात. त्या देवांच्या प्रवृत्तीमुळें त्रेतायुगात कर्मकांड विकसित झाले. नंतरच्या युगात त्याचा पसारा आणखीन वाढला. यज्ञ विधी हे सगळ्या कर्मकांडाचे मूळ आहे. हित कशात आहे व नाही त्याचा अंदाज करणे कधी कधी प्रजापतीलासुद्धा अवघड होते. कारण, कधी पापकर्म पुण्याचा परिणाम देते व कधी पुण्यकर्म पापाला कारण होते ते समजण्यासाठी जो विवेक लागतो तो नसलेली माणसें गोंधळून जातात. त्यामुळें अधर्म बळावतो. तुझ्या मोठ्या भावाचा जो गोंधळ उडाला आहे त्याचे कारण तेंच आहे. केव्हां अधर्माने धर्म साध्य करावा व केव्हां धर्माने अधर्माचे निर्मुलन करावे ते तुझ्या दामोदराला चांगलेच ठाऊक आहे. हित आणि अहित कशात आहे ते समजणे म्हणजेच वेद ज्ञान आहे. कारण सत्यापेक्षा हित जास्त महत्वाचे असते. त्यासाठी प्रजापति व उशरसाने दिलेले नैतिकतेचे नियम पाळत जा. ह्या जगाचे व्यवहार परस्पर हित संबंधावर विसंबून असतात. त्यात नफा, तोटा, वेतन, करपट्टी, कृषी, गुरढोर सांभाळणे, ह्यातील हित संबंध ज्याला समजतात ते ब्रह्माला समजू शकतात. कारण त्यातच ब्रह्मा व गृहस्थाश्रम आहेत. म्हणून अरे भिमा, सर्व आश्रमात गृहस्थाश्रम श्रेष्ठ मानला आहे. ब्रह्मदेवाला गृहस्थ आवडतात कारण, ह्या जगात तो ब्रह्माचे काम करत असतो. राजा त्याचेच वाढवलेले रुप असते. ज्याला हित संबंध कसे राखावयाचे ते समजते तो जीवनात पुढे जातो. संयम आणि मर्यादा ह्यांच्या सहायाने ते साध्य होते". हनुमान पुढे सांगतात, "त्यासाठी प्रत्येकांनी त्याचे विहीत कार्य करणे ब्रह्माच्या कामासाठी गरजेचे असते. त्यांची विभागणी तीन उपक्रमांत केली आहे. विधात्याला जाणणे व ते ज्ञान समाजातील इतराना समजावणे हे प्रथम कार्य म्हणून सांगितले आहे. त्यात जे गुंततात ते ब्रह्मज्ञानार्जक म्हणून ब्राह्मण समजले जातात. त्या वर्णाच्या लोकांनी त्या ज्ञानानुसार विविध यज्ञविधी योजण्यास सुरुवात केली. त्याद्वारा देवता प्रसन्न होतील अशी धारणा होती. ते काम करणार्यांचा सन्मान करण्यासाठी त्यांना इतर लोक दानं करत असतं. ब्राह्मणांना तपोश्चरण, व्रतस्थता, सत्यशिलता अशांचे पालन बंधन कारक होते. पुढे त्रेता युगापासून ह्या ब्राह्मणांतून पुरोहित वर्ग निर्माण झाला. दुसरा वर्ण क्षत्रिय पिंडाचा होता. संरक्षण, व्यवस्थापन, नियमन, न्याय ही त्यातील लोकांची कामं होती. ते संरक्षणासाठी शस्त्रविद्या पारंगत होते. त्यानी शस्त्र, अस्त्र, मंत्र अशा विद्या शत्रूचा नाश करण्यासाठी विकसित केल्या. अरे भिमा, तू त्यातील आहेस. तुझे कार्य समाजात

चागुलपणा वाढवण्याचे आहे. कृतयुगातील राजे त्या प्रमाणे त्यांचे कार्य करत होते. परंतु, त्रेतायुगात जसा भ्रष्टाचार वाढला, क्षत्रिय भ्रष्ट झाले. ते भ्रष्ट होण्याचे प्रमाणे पुढील युगांत वाढत गेले. त्यामुळें कुलिन क्षत्रियांना भ्रष्ट क्षत्रियांची मुकाबला करावा लागू लागला. त्याचे उदाहरण, जामदग्न्य राम आहे. तिसरा वर्ण समाजाचे धन संवर्धन करणारा होता. धन आहे पशु पालनात, कृषी सावरण्यात व इतर आर्थिक व्यवहार करण्यात. ती सगळी कामं त्या वर्णातील लोक करत असतं. योगक्षेमात उपयुक्त अशा विविध विद्या, शास्त्रं ह्यांचा विकास करणारे ह्यातून तयार झाले. त्यात आयुर्वेद, ज्योतिष, नक्षत्रविद्या, गणित, रसायन, यंत्रविद्या इत्यादि येतात. त्रेतायुगा पर्यंत तो वर्ण चांगले काम करत असें परंतु, द्वापार युगात चोर प्रवृत्तीचे लोक वैश्य झाले व त्याप्रमाणे द्युत, सट्टा, जुगार अशा अवैध आर्थिक व्यवहाराचे महत्व वाढले. प्रामाणिकपणा कृत व त्रेतायुगात जो होता तो नंतरच्या युगांतून नाहीसा होईल. कलीयुगात व्यापार आणि चोरी एकच होईल. व्यवहारातील विश्वासार्हता नाहीशी झाल्यामुळें त्याची प्रतिक्रीया म्हणून युद्ध, मारामार्या, खूनखराबा, कटकारस्थानं ह्यांचे प्रमाण वाढले. पुण्याची जागा पापाने घेतली असे कलीयुगात होणार आहे. जरी कलीयुगात ते खूप वाढणार असले तरी त्याची सुरुवात द्वापार युगात होईल. तुमचे भांडण कौरवांशी जे आहे हे त्याचे उदाहरण आहे. ह्या तिनही वर्णाचा एक गुण समान असतो, तो आहे निर्णय घेण्याची क्षमता. म्हणून त्यांचा उल्लेख द्विज म्हणजे दोनदा जन्म ज्याना लाभतो तो. त्या त्या वर्णाच्या कार्यात वेळोवेळी विविध मुद्यांवर निर्णय घ्यावे लागतात, परंतु, समाजात असें लोक असतात, जे आत्मविश्वासाच्या अभावामुळें निर्णय घेऊ शकत नाहीत. त्यांचे कार्य समाजाने असें ठरवले होते कीं, त्या लोकांनी आधी सांगितलेल्या तीन वर्णाच्या, द्विजांच्या, लोकांना त्यांच्या कामात मदत करावी. तो चौथा वर्ण समजला जात होता. ते वर्ण कृतयुगात माणसाच्या गुणकर्मविभागशः न्यायाने कर्तृत्वाने ठरत होते. त्रेतायुगात जसें वैश्य लोक पौरोहित्याचा धंदा करू लागले. त्यांनी ते बदलून, जन्माने ठरवणे सुरू केले. त्याचे प्रमाण द्वापारात जास्त झाले व कलीयुगात तोंच नियम झाला. शुद्रांचे कार्य तीन वर्णाच्या लोकांना त्यांच्या कामात मदत करणे. राजाच्या कार्यांत संरक्षणाबरोबर न्याय देणे, शत्रूचे निर्दालन करणे, व्यापाराच्या विकासाची, अशी बरीच कामं असतात, त्यासाठी राजा जो क्षत्रिय वर्णाचा असतो तो त्या त्या कामानुसार ब्राह्मण, क्षत्रिय,

वैश्य वर्णाचे अधिकारी नेमतो व राज्यकारभार चालवतो. राजा भ्रष्ट क्षत्रिय असेल तर अन्याय, अत्याचार असें प्रकार द्वापार व नंतरच्या कली युगात आढळणार. अशारितीने कलीयुगात जन्मावर आधारित चार वर्णाची व्यवस्था कोलमडून जाईल. ब्राह्मणांच्या कामात त्याग, ज्ञानार्जन, ज्ञानदान, तपस्या हे महत्वाचे होते. क्षत्रियाच्या कामात साम, दाम, दंड, भेद हे नितीचे दंडक होते. त्यात क्षत्रियांना पुण्याचे संरक्षण व पापाचे निर्दालन करणे ही कर्तव्ये होती. जो पापाचरण करतो तो समाजाचा शत्रू समजला जाई व त्याचे नियंत्रण करणे हे क्षत्रियाचे कार्य असें, त्यात पुढे महत्वाकांक्षा महत्वाची ठरली व राजे स्वतः पापकृत्यात रमू लागले. कलीयुगात ह्याचा कहर होईल. कृत युगात व त्रेतायुगापर्यंत ब्राह्मण त्यांच्या सदसद्विवेक बुद्धी साठी विशेष आदरणीय होते त्यामुळें त्यांचे स्थान राजाच्या दरबारात खास होते परंतु, द्वापार व कली युगात वैश्य लोक ब्राह्मण झाल्यामुळें भ्रष्टाचार बोकाळेल. सदसद्विवेक बुद्धीपेक्षा स्वार्थबुद्धी, कपट कारस्थानं प्रधान होतील. कृतयुगात परमार्थ प्रधान उद्देश होता त्याचे प्रमाण कालमानानुसार कमी होत स्वार्थ प्रधान उद्देश होत गेला व कलीयुगात तोच प्रधान उद्देश म्हणून सर्वमान्य झाल्याने पापाचरण वाढून सृष्टीचा एकंदर अध्यात्मिक दर्जा खालावत जाईल. त्याची सुरुवात मात्र द्वापारयुगात झालेली असेल. त्याग, ममता हे कृतयुगातील त्यांची जागा  स्वार्थ आणि प्रेम अशा पापाला थारा देणार्या प्रवृत्ती घेतील. ब्राह्मण त्याग, तपस्या, ब्रह्मचर्य, सत्वशिलता अशा उत्तम गुणांनी स्वर्गात जातात. वैश्य दान, प्रामाणिकपणा, अनुकंपा, चांगुलपणा ह्यांच्या मुळें स्वर्गात जातील, क्षत्रिय न्याय, संरक्षण, दया, क्षमा, सहकर्य आणि देवांच्या कृपेने स्वर्ग प्राप्त करतील, शुद्र उत्तम सेवा करून आपला दर्जा सुधारतील व पुढच्या जन्मी वरच्या श्रेणीत जन्मतील. हे चार युगातील स्वभाव समजून तू तुझे काम कर म्हणजे तुला स्वर्ग प्राप्त होईल.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील एकाहत्तरावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग बाहत्तरावा

वैशंपायन पुढे सांगतात, असें सांगत असतांना हनुमान त्याचे मायावी विशाल रुप आवरते घेतो. त्यानंतर ते दोघे वायुपुत्र मिठी मारून परस्पराबद्दलची आपुलकी व्यक्त करतात. मारुतीच्या आलिंगनामुळें भिमाला शक्ती प्राप्त होते व त्याचा क्षीण नाहीसा होतो. त्याला जाणवते किं, त्याची ताकद खूप जास्त वाढली आहे. मारूती त्याच्या पाठीवर हात फिरवत सांगतो किं, भिमाने आता त्याच्या घरी परतावे. मारुती भिमाला बोलतो कीं, जर त्याला कोणाशी बोलण्याची वेळ आली तर त्या बोलण्यात तो कोणालाही सांगणार नाही कीं, बजरंगबली त्या कर्दळीच्या वनात आहे. भिम त्याला आश्वासन देतो कीं, तो कोणालाही त्यांच्या भेटीबद्दल सांगणार नाही. मारुती त्याला सांगतो, "देवांच्या बायका, गंधर्व येथे रात्रीच्या प्रहरी येत असतात. ते येण्या आधी तू निघून जा. बर्याच काळानंतर मला कोणी मानव भेटत आहे. त्या भेटीमुळें माझ्या रघूवंशी रामाबद्दलच्या आठवणी जागृत झाल्या आहेत. तो साक्षात विष्णू होता. त्याच्या येण्याने जगात आनंद वाढला होता. त्याच्या बायकोसाठी, सीतासाठी तो सूर्य होता. त्याचवेळी तो रावणासाठी अंधःकार होता. म्हणून आपल्या भेटीचा तू चांगला उपयोग करून घे. त्यानंतर आनंदी झालेले हनुमान त्याला विचारतात, "तुला माझ्याकडून काय पाहिजे ते सांग. मी त्या क्षुद्र धृतराष्ट्राच्या मुलांचा नाश करावा तर मी ते चटकन करून टाकतो, मला त्यासाठी फार वेळ लागणार नाही. जर तुझी इच्छा असेल कीं, मी त्या दुर्योधनाला बांधून तुझ्या पायाशी आणून टाकावे, तर ते सुद्धा क्षणात करून देईन. बोल तुझ्यासाठी मी काय करू"?

वैशंपायन पुढे सांगतात, मारुतीचे ते उद्गार ऐकून भिमाला फार संतोष होतो. मोठ्या उत्साहाने तो बोलतो, "अहो माझे वडील बंधू तुमच्या त्या बोलण्याचा मी असा अर्थ समजतो कीं, तसे आधीच झाले आहे. पुढे तो नम्रपणे बोलतो, माझी एवढीच इच्छा आहे किं, तुमची माझ्यावर सदैव कृपा असावी. आपण आमचे संरक्षक झाला अहात त्यातच सगळे कांहीं आले. तुमच्या हिमतीने आम्ही सगळे जग हरवू शकतो". ते ऐकल्यावर हनुमान त्याला सांगतो, "तुझा मोठा भाऊ म्हणून मी जे आवश्यक होईल ते करणार आहे जेव्हां

तुमचे युद्ध प्रारंभ होईल. त्यावेळी तू मला मोठी हाक मारशिल तेव्हां मी तुझ्यासाठी तेथे युद्धभूमीवर उपस्थित होईन. मी तुझ्या भावाच्या म्हणजे नराच्या रथावर ध्वजाच्या स्तंभावर बसेन. तेथून सगळ्यांना मारून टाकीन. तेथून मी ज्या गर्जना करीन त्यामुळें कौरवांचे सैन्य गारद होईल. असें बोलून हनुमान पुन्हा एकदा त्याचा जाण्याची खूण करतो व अदृष्य होतो.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील बाहत्तरावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग त्र्याहत्तरावा

वैशंपायन पुढे बोलतात, त्याचा भाऊ अंतर्धान पावल्यानंतर भिम गंधमादन पर्वताच्या प्रदेशांत भटकू लागतो. त्याच्या मनात हनुमान व दशरथाच्या मुलाबद्दलचे विचार घोळत होते. तसा जात असतांना त्याला ती कमळ दिसतात. तो परिसर अत्यंत प्रसन्न कारक होता. तेथील झरे, झाडे, सगळेंच आनंद देणारे होते. तो चिखलाने माखलेले प्रचंड आकाराचे जंगली हत्ती खेळतांना पहातो. त्या नदीच्या किनार्याने तो जात असतांना तो पहातो किं, पलिकडील किनार्यावर चरणारी हरणं त्याच्या कडे एकटक पहात होती. त्यांना तो वेगळा वाटत असावा कारण त्या भागात माणूस कधी गेला नव्हता. त्याच्या वागण्यावरून असें जाणवत होते किं, त्या हरणांना सांबराना त्याची भिती वाटत नसावी असे दिसत होते. ते त्याच्या जवळ येण्याचा प्रयत्न करत होते. भिम मात्र त्याच्या मार्गाने पुढे जात होता. त्या सुंदर अरण्यात तेथील सुगंधी वातावरणात तो हरवला होता. त्याला आजुबाजूला विविध हिंस्र श्वापदं, चित्ते, अस्वलं, गवा आणि हत्ती वावरत असलेले दिसत होते. तेथे असलेल्या पाण्यात ती कमळ भिमाचे स्वागत करत आहेत असें त्याला वाटत होते. त्याला द्रौपदीची आठवण होत होती. वेगांने तो त्या पर्वताच्या उतारावरून चालत होता. जसा सूर्य मावळतीला लागला, त्याला एक विस्तीर्ण नदी त्या जंगलातून वाहत होती. त्या जंगलात असंख्य हरणं, सांबरं चरत होती. त्या नदीत सोनेरी कमळ भरपूर होती. त्या नदीत हंस, करंदव, चक्रवाक बागडत होती. त्यात तो ती खास कमळं ज्यासाठी तो शोधत होता ती सौगंधिक कमळं होती. त्याला ती दिसल्यावर त्याचा शोध पूर्ण झाला असें वाटते, मनाने तो ते द्रौपदीला सांगतो.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील त्र्याहत्तरावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व
# भाग चौर्याहत्तरावा

वैशंपायन सांगतात, त्या सौगंधिक कमळांच्या जागी तो पोहोचतो. तो तलाव कैलास पर्वताच्या परिसरात होता. त्या कमळांचे संरक्षण राक्षस करत होते. तो तलाव कुबेराच्या वाड्याच्या परिसरातून येणार्या नदीच्या धबधब्यातील पाण्याचा बनला होता. ते दृष्य अतिशय सुंदर होते. त्याच्या सभोवार वाढलेल्या वनराईच्या सतत पडणार्या सावलीत ती सोनेरी कमळें विशेष चमकत होती. विविध प्रकारचे पक्षी तेथे बागडत होते. त्या तलावातील पाणी नितळ होते. ते सगळे विलोभनीय होते. ते पाणी तो भरपूर प्याला त्याला खाण्यासाठा कांहीं मिळाले नव्हते तरी त्या पाण्याने त्याचे पोट भरले. त्या सोनेरी कमळाचे देठ निलमणी सारखे नीळे होते. त्या भागात यक्षांचा राजा कुबेराचा वावर होता. तो गंधर्व, अप्सरा आणि देवांचा आवडीचा होता. येथे देवता, यक्ष, किंपुरुष आणि राक्षस, किन्नरं वावरतात. त्याचे संरक्षण कुबेराचे यक्ष करत असतात. भिमाला तो तलाव पाहून फार आनंद झाला परंतु, त्यातील कमळें काढणे सोपे नव्हते, त्यावर कुबेराचे सेवक क्रोधवसास प्रजातीचे राक्षस लक्ष देऊन होते. त्या राक्षसांच्या अंगावर त्यांचा गणवेष होता. त्यांच्या जवळ विविध आयुध होती.

सर्व शस्त्रानी सज्ज असा हरणाच्या कातड्याची वस्त्रं नेसलेला भिम त्या कमळांना काढण्यासाठी त्या तलावाकडे जाऊ लागला. त्या रक्षक राक्षसांनी त्याला पाहिले. ते एकमेकांत हा कोण माणूस येथे आला आहे व काय करू इच्छितो त्या बद्दल चर्चा करू लागतात. त्यातील एक राक्षस भिमाला विचारतो, "तू कोण आहेस? तू आमच्या प्रश्नाचे उत्तर दे. तू अंगावर संन्याशाचे वस्त्र घातलेला असलास तरी शस्त्रसज्ज आहेस. आम्हाला तू सांगशिल, तुझा इरादा येथे येण्या मागील काय आहे"?

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील चौर्याहत्तरावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व
## भाग पंच्याहत्तरावा

भिम त्यांना सांगतो, "मी पंडुचा मुलगा आहे. युधिष्ठीरापेक्षा लहान आहे. माझे नांव भिम आहे. अहो राक्षसानो, मी विशाल बोरीच्या झाडाकडे नर नारायणांच्या बद्री आश्रमात आलो आहे. माझी पत्नी पांचाली कडे वार्याने एक सौगंधिका कमळ उडत आले त्याप्रमाणे आणखीन कमळं तिला पाहिजेत म्हणून मी ती शोधत येथवर आलो आहे. माझ्या पत्नीला ह्या कमळांची लागवड कम्यक अरण्यात करावयाची आहेत. मी माझ्या पत्नीची इच्छा पूर्ण करण्यासाठी येथे आलो आहे". ते भिमाचे स्पष्टीकरण ऐकल्यावर तो राक्षस त्याला सांगतो, "हे यक्षांचा राजा कुबेर ह्याचे राखीव सरोवर आहे. येथे मर्त्य शिरू शकत नाहीत. हे सरोवर केवळ दैवी जे अमर आहेत त्यांच्यासाठी आहे. जर तुला ह्यात शिरावयाचे असेल तर राजाची वैश्रावणाची परवानगी घ्यावी लागेल. ह्या सरोवराचे पाणी पिण्यासाठी सिद्धानासुद्धा कुबेराची परवानगी घ्यावी लागते. त्यात तू शिरू शकणार नाहीस. कधी कधी गंधर्व आणि अप्सरा येथे येता त्यांना त्रास होता कामा नये. जो कोणी नतदृष्ट ह्यात शिरण्याचा प्रयत्न करील त्याचा नाश होईल. असें असतांना तू ह्यात शिरण्याचे धाडस कसा करत आहेस"? पुढे तो बोलतो, "तू स्वताला युधिष्ठीराचा भाऊ सांगतोस तर प्रथम वैश्रावणाची परवानगी घेऊन ये. तरच तुला त्या कमळांना घेता येईल व पाणी पिता येईल. नाहीतर त्या कमळांकडे साधे पहाण्याचे धाडस तू करू नकोस". ते ऐकल्यावर भिमसेन बोलतो, "अरे राक्षसा, मला येथे तुझा राजा दिसत नाही. जरी तो असतां तरी मी खरा क्षत्रिय असल्यामुळें त्याच्या परवानगीशिवाय ते पाणी व ती कमळं घेणार आहे. खरे क्षत्रिय कधी कोणाची परवानगी मागत नाहीत व आणखीन एक गोष्ट, हे पाणी त्या डोंगरावरून आलेले आहे, तुझ्या मालकाच्या मालकीचे ते नाही, उलट ते पाणी त्यांने कोणाच्या परवानगीने अडवले ते सांग. मी मानत नाही त्याला". असें बोलून भिमसेन त्या पाण्यात उडी मारतो.

वैशंपायन पुढे सांगतात, राक्षस त्याला पुनः बजावतात पण भिम कोणाला दाद देत नाही व कमळं काढू लागतो. राक्षस त्यांची भयंकर आयुध सरसावून पुढे होतात. त्याला पकडा,

त्याला पकडा, त्याला बांधा, असे ओरडू लागतात. त्याला भाजून आपण खाऊन टाकू असें ते दरडावत त्याच्या जवळ जाऊ लागतात. भिम त्याची गदा फिरवू लागतो. त्याच्या फटक्याने कित्येक राक्षस घायाळ होतात. राक्षस त्याचे भाले व कुर्हाडी त्याच्यावर फेकतात. परंतु, तो वायुपुत्र त्यांना दाद देत नाही. उलट भिमाच्या हल्ल्याने त्यांची त्रेधातिरपीट उडते. राक्षसांचा तो पराभव करतो. शंभराहून जास्त राक्षस त्यात कामी येतात. भिमाचा जोर व वेग पाहून ते धावत कुबेराकडे जातात व जे घडले ते सांगतात. शक्राने जसे दैत्यांचे सैन्य एकट्याने हरवले तसे तो करतो. राक्षस पळून गेले आहेत हे पाहिल्यावर भिम शांतपणे द्रौपदीसाठी कमळें गोळा करू लागतो. त्या सरोवरातील पाणी तो पुनः भरपेट पितो. त्यामुळें त्याला आणखीन शक्ति येते. सौगंधिक कमळं तो गोळा करत असतांना तेथे क्रोधवन राक्षस कुबेराला भेटून विचारतात, "आता काय करावे"? त्यांचे सगळे ऐकल्यावर कुबेर त्यांना सांगतो, भिमाला त्याच्या पत्नीसाठी ती कमळ हवीत तेव्हां त्याला पाहिजे तेवढी कमळ घेऊन जाऊद्या. ते ऐकल्यावर राक्षस मैत्रीच्या अविर्भावात भिमाला चांगले सहकर्य देऊ लागतात.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील पंच्याहत्तरावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग श्याहत्तरावा

वैशंपायन सांगत असतात, त्या नंतर भिम कमळं गोळा करू लागला. तो ते करत असतांना जेथे युधिष्ठीर बद्री आश्रमात रहात होता तेथे अचनकपणे जोराचा वारा सुरू झाला. त्या हवेचा जोर एवढा होता किं, छोटे मोठे दगड फेकले जाऊ लागले. जणूकाय कोणी युद्ध छेडले आहे. आकाशातून अशनि खाली पडू लागले. दिवसाचा प्रहर असूनही अंधार पसरला. आकाशातून गडगडाट ऐकू येत होते. पृथ्वी थरकापत आहे असें वाटत होते. ते अपशकून समजले गेले, काय वाईट घडत आहे त्याचा तो त्याचा पुतळा विचार करू लागला. त्याला शंका येते किं, भिमाला कांहीं धोका झाला असावा म्हणून तो त्याच्या लोकांना आज्ञा करतो किं, सगळे तयार व्हा आणि भिमाच्या शोधासाठी निघू. त्याप्रमाणें ते सगळे तयारीने शस्त्रासह भिम ज्या दिशेने गेला होता त्या दिशेने कूच करतात. त्यांच्या बरोबर त्यांचे वाटाडे ऋषी लोमस असतात. त्याशिवाय इतर ब्राह्मणसुद्धा निघतात. नकुल व सहदेव कृष्णाला घेऊन निघण्यासाठी तयार होतात. युधिष्ठीर विचारतो, "भिम कोठे गेला आहे व कां गेला आहे, त्याने मला विचारलेले नाही, असा तो कधी मला न सांगता जात नाही". ते ऐकल्यावर द्रौपदी भिम का गेला ते सांगते. ती सांगते, त्यात कसे सौगंधिका कमळ हवेत उडत तिच्याकडे आले व तिला ते आवडल्याने तिने आणखीन तशी कमळं भिमाला आणण्याची ती विनंती करते व त्यामुळे तो तडकाफडकी त्या दिशेने निघतो ज्या दिशेने ते कमळ आले होते. हे सगळे इतक्या लगबगीने घडले कीं, भिमास युधिष्ठीरीची संम्मती घेण्याचे आठवले नसावे. द्रौपदीने ते सांगितल्यावर युधिष्ठीर सांगतो कीं, त्या दिशेने आपण सगळ्यानी गेले पाहिजे ज्या दिशेने भिम गेला होता. तो तशी आज्ञा करताच भिमाचा मुलगा व त्याचे दोस्त राक्षस सगळ्यांना उचलतात व हवेत उडत भिम कोठे दिसतो कां ते शोधू लागतात. घटोत्कचाला व त्याच्या दोस्तांना गंधमादन पर्वताचा तो भाग व इतर परिसर चांगलाच परिचित होता. म्हणून भिमाला शोधणे सोपे झाले. तरीसुद्धा युधिष्ठीराला माहीत होते कीं, त्याचा भाऊ त्या भागात असलेल्या अरण्यातून वेगांने गेला होता जसे विनताचा मुलगा जात असें. त्याला शंका येते कदाचित भिमाने

त्याच्या रागीट स्वभावामुळें कोठे कांही आगळीक केली असेल कां? ज्यामुळें असें वारे पाहू लागले. घटोत्कचाचे दोस्त सांगतात त्यांना माहित आहे कुबेराचे सरोवर कोठे आहे व त्याप्रमाणे ते उडत त्या राक्षसांच्या पाठीवरून तेथे पोहोचले. ते त्या सरोवराचे दर्शन घेतात. ते विलोभनीय दृष्य होते. असें कधी कोणा पाहिलेले नव्हते. त्यानंतर त्यांना भिम दिसतो. त्याच्या हातात उगारलेल्या स्थितीत गदा होती. तो रागावलेले दिसत होता. त्याने ठार मारलेले शेकडो राक्षसांचे देह त्याच्या आजुबाजूस विखुरलेले होते. मोठे युद्धा झाले होते त्या कमळांसाठी असे दिसत होते. युधिष्ठीर त्याच्या जवळ जातो व त्याला आलिंगन देतो. त्याला व्यथित अंतःकरणाने बोलतो, "अरे भिमा, हे मी काय पहातो आहे? तू असे कां केलेस"? त्यानंतर ते अनवधानाने त्या सरोवरात खेळण्यासाठी उतरले. ते पहाताच कांहीं पहारेकरी जे राक्षस होते व आकाराने प्रचंड होते, पुढे आले व त्यांना तसे न करण्याबद्दल सांगू लागले. ते युधिष्ठीर व ऋषी लोमस ह्यांना पहातात व लवून नमस्कार करतात. बाजूला उभे रहातात. त्या वेळी आकाशातून एक आवाज येतो. त्याबरोबर त्या यात्रीना आश्चर्याचा धक्का बसतो. ते आकाशाकडे पहात रहातात. त्या आकाशवाणीत सांगितले जाते किं, "ही जागा कुबेराची राखीव आहे व येते विनापरवाना कोणी येत नाही. ताबडतोब येथून निघून जा".

ते ऐकल्यावर लोमस निर्णय घेतात कीं, त्या आकाशवाणी बरहुकूम आपण वागले पाहिजे, म्हणून ते सगळे त्या सरोवरातून बाहेर येतात व तेथे असलेल्या गंधमादन पर्वताच्या उतारावर असलेल्या वनात अर्जुनाची वाट पहात बसतात.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील श्याहत्तरावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्व

## भाग सत्त्याहत्तरावा

वैशंपायन बोलतात, एके काळी जेव्हां युधिष्ठीर तेथे असतांना कृष्णाला आणि इतर तेथे असलेल्या सगळ्यांना बोलतात, आपण सगळ्यांनी एक एक करून सगळी तीर्थक्षेत्रे पाहिली आहेत. त्याची वनं, नद्या, सरोवरं असें सगळे पाहिले आहे. जेथे जाण्याचा योग देवांना व उच्चदर्जाच्या सिद्धानाच फक्त प्राप्त होत असतो. आपण अशा कांहीं पवित्र क्षेत्री स्नान केले व पुजा केल्या जेथे क्वचितच कोणी जाऊन स्नान करू शकेल. आपण कांहीं राजर्षीच्या कथा ऐकल्या ह्या यात्रेच्या दरम्यान, असें बरेच कांही आपण सगळ्यांनी साध्य केले आहे. ठिकठिकाणी फळं कंदमुळं अर्पून आपण पितरांची श्राद्ध केली जे सहसा कोणाच्या भाग्यात नसते. पवित्र पर्वत, नद्या त्यांचे संगम, समुद्र किनारे, गंधमादनातील तो विशाल वृक्ष असें पाहू शकले लोमसांच्या मार्गदर्शनामुळें. आपण तीर्थयात्रा करतांना त्या शिवाय अशा कांहीं गोष्टींचा अनुभव घेतला जो सहसा कोणाला मिळणार नाही. आपले मोठे भाग्य किं, नर नारायणांच्या बद्री आश्रमात आपण राहू शकलो. त्यांनतर त्या कुबेराच्या राखीव तलावात पोहण्याचे भाग्य भिमामुळें आपल्याला लाभले, हे सगळे कोणा सामान्य यात्रींना शक्य नव्हते. ती सौगंधिक कमळें घेतली द्रौपदीसाठी व त्याला साक्षात वैश्रावणाने परवानगी दिली हे एरवी केवळ अशक्य होते. ते शक्य झाले हे आपले महद्भाग्य आहे. असें सांगून आपण ह्या तीर्थयात्रेने समाधानी आहोत असें युधिष्ठीर दाखवतो.

वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीर ते बोलतो त्यावेळी एक आकाशवाणी होते, "तुम्ही त्या सरोवराच्या अगम्य जागी जाऊ नका. आता तुम्ही खूप कांहीं अनुभवले आहे तेव्हा परत फिरा आणि बद्री आश्रमात जाऊन अर्जुनाची वाट पहात बसा. तेथे वृषपर्वाच्या आश्रमात जा. तेथे भरपूर फुलं फळं आहेत. तेथे सिद्ध व चरण रहातात त्यांच्या बरोबर जाऊन रहा. तेथे धनंजय तुम्हाला येऊन भेटेल. तेथून तुम्ही अर्ष्टीसेनाच्या मठात जा. तेथील सुंदर हवेचा अनुभव घ्या. असें ती आकाशवणी सांगत असतांना आकाशातून असा वारा वाहू लागला ज्यात विलक्षण सुगंध होता. आकाशातून पुष्पवृष्टी सुरु झाली. ते पाहून सगळे ब्राह्मण आश्चर्यचकीत झाले. ती आकाशवणी ऐकल्यावर धौम्य युधिष्ठीराला सांगतात,

"आता एवढीच आपली तिर्थयात्रा आहे. येथून परत फिरण्याचे आदेश दिले गेले आहेत त्या प्रमाणे आपण केले पाहिजे. राजा युधिष्ठीर ती आज्ञा प्रमाण मानून सगळ्यांना ती सुचना देतो. ते सगळे बद्रीकाश्रमाकडे निघतात. तेथे धनंजयची प्रतिक्षा करत ते आपला समग्र ब्राह्मण, पांचाली व इतर पांडव राहू लागतात.

तीर्थयात्रा पर्व  भाग सत्त्याहत्तरावा संपला.

## - महाभारत तिर्थयात्रा पर्व खंड दुसरा संपला -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे २५ खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चाने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id.com. esahity.www.esahitybooks

ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद